(प्रकीर्ण-गुच्छ.)

जबाबदार राज्य-पद्धति.

७३

श्रीसयाजी साहित्यमाला.

श्रीसयाजी साहित्यमाला-पुष्प ७३ वें.

(प्रकीर्ण–गुच्छ.)

जबाबदार राज्य-पद्धति.

लेखक.

महादेव रामचंद्र भिडे, एम्. ए.,

'A guide to British Constitutional Law.'

यांचे लेखक.

प्रकाशक.

मिसेस् ताराबाई भिडे,

३६८ सदाशिव पेठ, पुणें.

पुणें येथें

आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक

पटवर्धन यांनीं छापिलें.

इ. स. १९२१
वि. सं. १९७७

किंमत
०–१३–६.

प्रथमावृत्ति.
प्रती ५००

श्री

जाहिरात.

आपल्या देशी भाषांच्या साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें श्रीमंत महाराजा साहेब सर सयाजीराव गायकवाड, सेनाखासखेल, समशेरबहादूर, जी. सी. एस. आय्., जी. सी. आय्. ई. ह्यांनीं कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम अनामत ठेविली आहे तिच्या व्याजांतून " **श्रीसयाजी साहित्यमालेंत** " विविध विषयांवर पुस्तकें तयार करण्यांत येत असतात.

हें पुस्तक स्व. रा. महादेव रामचंद्र भिडे, एम्. ए., पुणें, ह्यांनीं तयार केलें असून उक्त मालेंतील प्रकीर्ण–गुच्छांत पुष्प त्र्याहत्तरावें म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

भाषांतर शाखा
विद्याधिकारी कचेरी
बडोदें.
ता. १४–६–१९२१

ज. पु. जोषीपुरा.
भा. म.

A. M. Masani
विद्याधिकारी
बडोदें राज्य.

ऊ/३१

अर्पणपत्रिका.

माझे परमपूज्य आजोबा कै. गंगाधरपंत ऊर्फ काकासाहेब भिडे यांस ही अल्पकृति आदर-पूर्वक अर्पिली आहे.

लेखक.

ओम्

"जबाबदार राज्यपद्धति" या विषयावरील हा छोटेखानी निबंध माझे मामेबंधू कै. श्री. महादेव रामचंद्र भिडे यांनीं लिहिला. मुंबईत कायद्याचा अभ्यास करून वेळांत वेळ काढून सदरहू निबंधलेखन त्यांनीं डिसेंबर १९२० अखेर संपविलें. लगेच त्यांना 'Anæmia' चा विकार जडल्यामुळें पुनः तो निबंध त्यांच्याकडून तपासला गेला नाहीं. यामुळें पुस्तकांत कांहीं क्लिष्ट भाषा व अवघड वाक्यरचना आढळते. 'Anæmia' च्या विकारानेंच पुढें ग्रन्थकर्त्यास लोणावळे येथें ता. २९ एप्रिल १९२१ रोजीं देवाज्ञा झाली ! प्रस्तावना लिहिण्याचें काम मजकडे येण्याचें कारण म्हणजे श्री. भिडे यांचा अपमृत्यू होय ! असो.

गायकवाड सरकारनें निबंधादाखल लेखकांस बक्षीस दिलें असून इतरही मार्गांनीं पुस्तक छापण्याच्या कामीं त्यांस उत्तेजन दिलें आहे. तेव्हां श्रीसयाजीसाहित्यमालेंतील ७३ वें पुष्प म्हणून आज हें पुस्तक जगापुढें येत आहे. या कामीं गायकवाड सरकारचे आभार मानावे तितके थोडेच आहेत.

नागपूर येथील अधिवेशनांत कॉंग्रेसनें आपलें ध्येय बदलल्यामुळें 'जबाबदार राज्यपद्धति' ची ओळख हिंदुस्थानांतील सामान्य जनसमूहांस होण्याची आवश्यकता नाहीं, असें म्हणणें चुकीचें होईल. कारण, या लोकशाहीच्या काळांत कोणत्याही देशाची राज्यघटना लोकतंत्रानुसारच रचावी लागणार. अर्थात हिंदुस्थानदेशाही या नियमास अपवाद होऊं शकणार नाहीं. व

वरीलप्रमाणें राज्यपद्धति अमलांत आणण्यास, पाश्चिमात्य देशांत चालू असलेल्या जबाबदार राज्यपद्धतींचीं मूलतत्त्वें आपणांस शिकावीं लागणारच. हिंदुस्थानांत नुकतीच सुरू केलेली द्विदलराज्यपद्धति, पाश्चिमात्य देशांतील राज्यपद्धतीशीं व विशेषतः ब्रिटिश राज्यपद्धतीशीं ताडून पाहिली असतां कितपत सरस अगर निरस ठरते, हें ठरविण्यास या पुस्तकाचा विशेष उपयोग होईल. उपयुक्ततेसंबंधीं याहून ज्यास्त लिहिणें नकोच.

द्वितीय आवृत्तीचा सुयोग आल्यास योग्य व शक्य त्या सुधारणा पुस्तकांत केल्या जातील. पुस्तक प्रसिद्ध करण्याच्या कामीं माझे मित्र रा. रा. दत्तात्रय विश्वनाथ नरवणे यांनीं लेखकांस व मला अथपासून इतिपर्यंत जें अमोलिक साहाय्य केलें त्याबद्दल मी त्यांचा अतिशय ऋणी आहें. तसेंच 'आर्यभूषण' छापखान्याचे व्यवस्थापक यांनीं लेखकाच्या अकस्मात् मृत्यूमुळें उद्भवलेल्या अनेक अडचणी सोसून, स्वीकृत काम बिनशर्त व सफाईनें करून दिल्याबद्दल, त्यांचा मी आभारी आहें. लेखकाची ही अल्पशी वाङ्मयसेवा वाचकवृन्द गोड करून घेईल अशी आशा प्रदर्शित करून हे प्रस्तावनेदाखलचे चार शब्द पुरे करितों.

३६८ सदाशिव पेठ
पुणें शहर.
ता. २० जून १९२१

आपला
महादेव सखाराम मोडक.

अनुक्रमणिका

जबाबदार राज्य-पद्धति.

विषय-प्रवेश.

हिंदुस्थानांतील लोकांना स्वराज्याचा पहिला हप्ता मिळाला; व तो निराशाजनक असो, अपुरा असो अगर असमाधानकारक असो. कसाही असला तरी हिंदुस्थानांतील लोकांच्या बहुमतानें तो स्वीकारावा असें ठरलें होतें. हल्लीं आकस्मिक कारणांनीं जरी देशांतील बराचसा मोठा पक्ष या देशांतिल या नव्या मिळालेल्या क्षुल्लक स्वराज्याच्या तुकड्यासाठीं भांडण्याविषयीं पराङ्मुख झालेला असला, तरी हा स्वराज्याचा हक्क अधिक विस्तृत अशा राजकाजाच्या भागावर गाजवितां आला तर, किंवा अन्य कारणपरंपरेचा परिणाम म्हणून, हिंदुस्थानांतील सर्व लोकांचें लक्ष या ' स्वराज्याच्या हक्कांकडे, ' फिरून वेधण्याचा बराच संभव आहे. कसें जरी झालें तरी, स्वराज्याचा भाग मोठा असो अगर लहान असो, त्याची वांटणी कशी करावयाची हा प्रश्न शिल्लक राहतोच. हा हप्ता किंवा याहून मोठा हप्ता जरी झाला, तरी तो कांहीं ऋणकोनें धनकोस दिलेली पैशाची पिशवी नव्हे. त्या कर्जाच्या हप्त्यासारखा कांहीं हा हप्ता पटकन् उचलून खिशांत टाकतां येणार नाहीं. हिंदुस्थानांतील निदान बहुजनसमाजाच्या दृष्टीला तरी हें नाणें अपरिचित आहे. तर हें नाणें आहे काय ? कोठें प्रचलित आहे ? तेथें त्या नाण्याची काय किंमत आहे ? त्याचा विनियोग

कोणच्या रीतीनें करण्यांत येतो वगैरे गोष्टी नीट समजल्या शिवाय आपणांस मिळावयाच्या सगळ्या रकमेंपैकीं हल्लीं मिळालेला कमी किंमतीचा असो, किंवा पुढें मिळणारा याहून महत्त्वाचा असो, हप्ता तरी उपयोगांत कसा आणावयाचा हें समजणार नाहीं.

हा जो हप्ता मिळावयाचा त्यांत साऱ्या हिंदुस्थानची भागी आहे. जातिविशिष्ट व धर्मविशिष्ट भागीदारींची वांटणी झाली आहे. पण आतां निरनिराळ्या व्यक्तींच्या ओढाताणींत प्रत्येक व्यक्तीच्या वांटणीला काय येणार तें पाहिलें पाहिजे. व न्यायतः प्रत्येक व्यक्तीला जें मिळावयाचें ते दुसऱ्या कोणी हिरावून घेऊं नये म्हणून काय काय खबरदारी घेतली पाहिजे वगैरे गोष्टींचाही विचार करणें जरूर आहे.

हिंदुस्थानाला स्वराज्य मिळालें म्हणजे मिळालें तरी काय, या प्रश्नाचें थोडक्यांत उत्तर म्हणजे हिंदुस्थानाची, विशेषतः आपापल्या प्रांतांची कांहीं कांहीं बाबतींत राज्यव्यवस्था कशी चालावी हें ठरविण्याचा अधिकार एका विवक्षित दर्ज्याच्या नागरिकांस मिळाला हें सांगावयाचें. आतां हें ठरवावयाचें कसें ? तर त्या राज्य-व्यवस्थेच्या बाबतींत आपलें मत देऊन, यालाच मताधिकार म्हणतात. हा मताधिकार हिंदुस्थानांतील लोकांस मिळाला.

हा मताधिकार म्हणजे कांहीं प्रत्येक सरकारी अधिकारी, समजा, कलेक्टर, हा कांहीं आपल्या अधिकारांतील कोठली-ही गोष्ट करितांना जिल्ह्यांतील प्रत्येक व्यक्तीला विचारावयाला येईल असें नव्हे.

तो कलेक्टर किंवा तो सरकारी अधिकारी ज्यांच्या हुकमानें काम करितो, जे कायदे अमलांत आणितो, ते हुकूम देणारे सरकारी अधिकारी व ते कायदे करणारी सभा यांच्या कृत्यांसंबंधानें मत देण्याचा अधिकार म्हणजेच, आज आपल्यांत प्रचलित असलेल्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे, स्वराज्याचा अधिकार. म्हणजे सुद्धां ही कायदासभा, किंवा हें सरकार प्रत्येक गोष्ट करितांना प्रत्येक मतदारीचा हक्क असलेल्या व्यक्तीला ' तुझें काय मत आहें ' असें विचारणार नाहीं. तर ही कायदासभा, मतदारांच्या वतीनें निरनिराळ्या प्रश्नांवर मतें देण्याकरितां, मतदारांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींची बनलेली असते. ही कायदासभा म्हणजे लोकप्रतिनिधिसभाच होय. व ही लोकप्रतिनिधिसभा जे कायदे पास करिते तेच अमलांत आणण्याचें काम, ज्याला आपण सरकार म्हणतों, त्या अंमलबजावणी खात्याचें असल्यामुळें, प्रतिनिधिसभेचा दुसरा कांहीं त्याचेवर अधिकार चालत नसला तरी, तें खातें पतिनिधिसभेला नमून असतें.

पण युरोपीय राष्ट्रांमध्यें प्रचलित असलेल्या जबाबदार राज्यपद्धतीप्रमाणें दुसऱ्याही एका रीतीनें अंमलबजावणी खात्यावर कायदेमंडळाचा ताबा चालतो. कायदेमंडळ हें लोकांच्या प्रतिनिधींचें बनलेलें असतें असें वर सांगितलेंच व जबाबदार राज्यपद्धतींत या कायदेमंडळाला उर्फ प्रतिनिधिसभेला प्रधानमंडळ जबाबदार असतें. प्रधानमंडळाच्या प्रत्येक कृत्यावर प्रतिनिधिसभेला देखरेख ठेवण्याचा अधिकार निदान इंग्लंडमध्यें आज तरी आहे. अशी देखरेख असते एवढेंच नव्हे तर जर प्रधानमंडळ प्रतिनिधिसभेंतील

बहुमताविरुद्ध वागेल, तर पर्यायानें त्या प्रधानमंडळाला काढून टाकण्याचा अधिकारही या प्रतिनिधिसभेला असतो. तेव्हां ही कायदासभा कायद्यांच्या द्वारें अप्रत्यक्षतः व अंमलबजाणीवर देखरेख ठेवण्याच्या रीतीनें प्रत्यक्षतः मध्यवर्ती राज्यसंस्थेवर अधिकार चालविते असें म्हणण्यास हरकत नाहीं.

अशा प्रतिनिधि सभा निवडण्याचा अधिकार हिंदुस्थानांतील एका विवक्षित दर्जाच्या माणसांस मिळाला. हिंदुस्थानासारख्या विस्तृत प्रदेशांत एकच मध्यवर्ती राज्ययंत्र स्थापून, त्याचे हातीं राज्यव्यवस्था देणें शक्य नसल्यामुळें हल्लीं ज्याप्रमाणें कांहीं कांहीं राज्यव्यवस्थेच्या बाबी निरनिराळ्या प्रांतिक सरकारांकडे सोंपविण्यांत आल्या आहेत; त्यांत थोडा फेरफार करून यापुढेंही प्रांतिक सरकारें व हिंदुस्थानसरकार यांमध्यें राज्यकारभार वांटला जाणार आहे. मात्र या ज्या नवीन स्वराज्याच्या सुधारणा अमलांत येणार आहेत, त्याप्रमाणें नवीन ज्या कायदेसभा या सरकारांना मदत करण्याकरितां स्थापिल्या जाणार, त्या आधिक प्रातिनिधिक केल्या जाणार आहेत. ही सुधारणा विशेषतः प्रांतिक सरकारच्या बाबतींत बरीच पुढें जाणार आहे. प्रांतिक कायदे कौन्सिलांतील जवळ जवळ शें. ८० सभासद मतदारीचा नवीन हक्क मिळालेल्या हिंदुस्थानांतील लोकांनीं निवडावे असें ठरलें आहे. बाकीचे सभासद सरकार-नियुक्त असून त्यांतच सरकारी अधिकाऱ्यांचा अन्तर्भाव होणार आहे. वरिष्ठ कायदेमंडळांतील सभासदही प्रांतिक कायदे-कौन्सिलच्या मतदारांच्या दर्जाहून ज्यांचा आर्थिक दर्जा अधिक आहे अशा मत-

दारांस बऱ्याचशा मोठ्या प्रमाणांत निवडण्याचा अधिकार दिलेला आहे. असो, प्रांतिक कौन्सिलांत याप्रमाणें मताधिक्य आहे एवढेंच नव्हे तर तेथें जबाबदार राज्यपद्धतीचाही उपक्रम करण्यांत आला आहे. ज्या बाबी वर सांगितल्या-प्रमाणें राज्यकारभाराचे सोयीसाठीं प्रांतिक सरकारच्याकडे सोंपविल्या आहेत, त्यांपैकीं दोनचार बाबींची व्यवस्था ज्यांचेवर सोंपविली आहे अशा एक दोन प्रधानांच्या कारभारावर पूर्णपणें देखरेख ठेवून, अप्रत्यक्षतः त्यांना प्रधानकीच्या जागेवरून कमी करण्याचाही अधिकार या नवीन प्रांतिक कौन्सिलांकडे देण्यांत आलेला आहे.

जबाबदार राज्यपद्धति नीट रीतीनें अमलांत यावी म्हणून इंग्लंडमधील कायद्यानें व रूढीनें घालून दिलेल्या राज्यघटनेच्या नियमांतही इंग्लंडमधील मतदारांची दोन मोठ्या राजकीय पक्षांत विभागणी झाली आहे असें गृहीत धरलें जातें. किंवा, हे दोन पक्ष अस्तित्वांत होतेच, व त्यांच्याच अनुषंगानें इंग्लिश जबाबदार राज्यसंस्थेची उभारणी केली गेली आहे, असें म्हटलें तरी चालेल. पण कसेंही म्हटलें तरी प्रचलित नियमानुसार बोलावयाचें म्हणजे आज तरी इंग्लंडमधील जबाबदार राज्यपद्धति व मतदारांची दोनच मुख्य राजकीय पक्षांत अथवा पक्षसमूहांत विभागणी, या गोष्टींचा नित्यसंबंध आहे. तेथील कायदेवजा रूढिनियमानें असें ठरलें आहे कीं, निवडणुकीनंतर ज्या पक्षाचें प्रतिनिधि-सभेंत बहुमत आहे असें आढळून येईल त्या पक्षाचे पुढाऱ्यांवर राजानें राज्यव्यवस्था सोंपविली पाहिजे.

हिंदुस्थानांतीलही प्रातिनिधिक पद्धतीची अशीच परिणति व्हावी अशी इच्छा मूर्त, अमूर्त स्वरूपांत व्यक्त होत आहे. तें

कसेंही असलें तरी दोन चार बाबी ज्यांचेवर सोंपविल्या आहेत अशा प्रधानांना प्रतिनिधिसभेला जबाबदार करण्याचें तत्त्व इकडे सुरूं करण्यांत येणार आहे. या ज्या दोन चार बाबी प्रधानांच्या हवालीं करण्यांत येणार आहेत, त्यावरच आपलें राज्य—स्वराज्य—प्रातिनिधिक तत्त्वावर उभारलेल्या जबाबदार राज्य-पद्धतीनें चालावयाचें. यालाच स्वराज्याचा पहिला हप्ता असें नांव देण्यांत आलें आहे.

हिंदुस्थानाला याप्रमाणें पाश्चिमात्य जबाबदार राज्यपद्धतीच्या तत्त्वानुसार अगदीं अल्पसा ताबा प्रांतिक राज्यकारभारांत मिळाला आहे. असें जरी असलें तरी या मिळालेल्या भागांतच आपली कर्तबगारी दाखवून म्हणा किंवा हा अर्धवट राज्यकारभार कांहीं अधिक सवलती, अधिक हक्क दिल्याशिवाय चालविणें कसें अशक्य आहे हें सरकारच्या निदर्शनास आणून देऊन म्हणा, किंवा अन्य कांहीं कारणसमुच्चयांचा परिणाम म्हणून म्हणा, हें प्रातिनिधिक तत्त्वावर चालविलेलें जबाबदारीचें राज्यच हिंदुस्थानांत पूर्णपणें अमलांत आणावें लागणार. अशा स्थितींत या जबाबदार राज्य-पद्धतीचीं मूलभूत तत्त्वें काय ? ह्यापासून लोकांचा ताबा सरकारवर कस बजावला जातो ? ह्या पद्धतींत हितावह अशा काय गोष्टी आहेत ? कायद्यानें अमलांत आणलेल्या राज्यघटनेला मदत करण्याकरितां कायदा—बाह्य अशा पक्षसंस्था कशा व कां निर्माण झाल्या ? त्यांपासून होणारे फायदे व तोटे इत्यादि विषयांचा विचार-म्हणजे थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे प्रतिनिधिसत्ताक जबाबदार राज्य-पद्धतीचें व्यावहारिक स्वरूप काय हें पाहणें अप्रासंगिक होणार नाहीं.

प्रतिनिधिसत्ताक जबाबदार राज्यपद्धति असो,—किंवा भिन्न भिन्न परिस्थितींना साजेशा इतर कोणत्याही राज्य-पद्धति असोत—ती प्रचारांत आणण्याच्या किंवा परिस्थितीला अनुसरून प्रचारांत येण्याच्या वेळेला, पूर्वी कधीं त्या लोकांनीं या तऱ्हेची राज्य-पद्धति चालविली आहे काय हा प्रश्नच मुळीं अनवश्यक आहे. येथें एवढेंच सांगावयाचें कीं, अशा तऱ्हेचे नसते प्रश्न उपस्थित करून, त्यापासून भलतेच सिद्धांत करणें किंवा अंधश्रद्धेनें मेंदूचें कवाट बंद करून घेणें, यापासून कांहींही फायदा होणें शक्य नाहीं. राजकीय संस्था व त्यांचें कमी अधिक महत्त्व, हीं परिस्थितीप्रमाणें बदलत असतात. राजनीतितत्त्वांत कायमचें असें कांहींच नाहीं. निरनिराळ्या राज्यसंस्था निरनिराळ्या परिस्थितींनीं घडविलेल्या असतात. प्रेसिडेंट विल्सन यांनीं फ्रान्सच्या नवीन स्थानिक राज्य-पद्धतीसंबंधीं जें म्हटलें आहे कीं 'ती पद्धति नवीन संस्कारांवर व नित्य बदलणाऱ्या नवीन स्वभावपरिपोषावर रचलेली आहे, तिचे निरनिराळे घटक नव्या सोयीप्रमाणें घडले जात आहेत' त्यावरून या गोष्टीची साक्ष पटेल. Political expediency राजकीय कारभारांतील चाल-चलाऊ तरतूद हीच सगळ्या राज्य-संस्थांच्या बुडाशीं असते. हिंदुस्थानदेश ज्या वेळीं सर्व तऱ्हेच्या विद्या व कला यांत पारंगततेच्या अत्युच्च शिखरावर विराजत होता त्यावेळीं जर या प्रातिनिधिक तत्त्वाची जरून भासती तर हें तत्त्व अमलांत आल्यावांचून राहिलें नसतें. त्यावेळीं, ज्या ज्या वेळीं लोकांचे मत एकादा सार्वजनिक कृत्यावर घेण्याची जरूर लागे. त्या वेळीं सर्व लोकांना एकत्र जमवितां येत असे. आपल्याकडेही ही रीति

प्रचलित होती हे बौद्धकालीन 'संथागारा' सारख्या लोकसभांवरून सिद्ध होतें. रोमन प्रजासत्ताक पद्धतींत ज्याप्रमाणें सुरवातीस जो कॉन्सल नेमीत तो कांहीं ठराविक घराण्यांतलाच 'Patrician' असे. त्याप्रमाणेंच आपल्या इकडेही कांहीं उच्च घराण्यांतलाच पुरुष आळीपाळीनें निवडून त्याच्याकडे नगर-शासनची जबाबदारी सोंपविण्यांत येत असे. याचें एक उदाहरण म्हणजे बुद्ध ज्या घराण्यांत जन्मला त्या घराण्याला हा मान आळीपाळीनें मिळत असे. पुष्कळ ठिकाणीं वंशपरंपरागत एकतंत्री राज्यपद्धति चालू होती तरी अशा ठिकाणींही लोकमत अजमावण्याकरितां निरनिराळ्या जातींतून कुशल सचीव निवडीत असत असा दाखला सांपडतो.

अशा रीतीनें त्या त्या परिस्थितीला योग्य असें राजनीतिकौशल्य हिंदुस्थानांतील लोकांनीं पूर्वकालीं दाखविलेंच आहे. व आजच्या परिस्थितीला योग्य असें आजचें स्वराज्य चालविण्यासही ते खास अपात्र ठरणार नाहींत. तरी पण आज अमलांत येऊं पाहणाऱ्या या पद्धतीचें नाविन्य त्यांनीं विसरतां कामा नये. ही पद्धति युरोप व अमेरिका या देशांत रूढ होऊन बरीच परिणत स्वरूपास पोंचली आहे. पण ज्या परिस्थितींत तिचा युरोपांत उपक्रम झाला तशी परिस्थिति हिंदुस्थानाला आजपर्यंत प्राप्त न झाल्याकारणानें आपल्याला आज ती नवीनच आहे; व असें असणें हें इतकें स्वाभाविक आहे कीं असें म्हणण्यांत काडीचाही कमीपणा नाहीं.

पण यांत कांहींतरी कमीपणा आहे असें आपणांपैकीं पुष्कळांना वाटतें व याचें कारण दुसरें कांहीं नसून युरोपियन लोकांची साधारणातः बढाईखोर अशी लेखनपद्धतिच होय. ते लोक आपणांस असें सांगतात कीं, युरोप देश हा प्रथमपासून राजकीय स्वातंत्र्याचें माहेरघर आहे. (अर्थात् आणखी इतर पुष्कळ गोष्टींचें जनकत्वही हे लोक बिचाऱ्या युरोपवर लादतात; पण आपल्याला आज त्याच्याशीं कांहीं कर्तव्य नाहीं.) असें असल्यामुळें राजकीय स्वातंत्र्याचें रक्षण करण्यास योग्य अशा लोकमतानुसार चालविलेल्या राज्यसंस्था युरोपच्या बाळपणापासूनच त्यांच्या आंगवळणीं पडल्या आहेत. म्हणून युरोपांत जरी प्रातिनिधिक-तत्त्वावर चालविलेली स्वतंत्र राज्यपद्धति यशस्वी झाली असली तरी आशिया खंडांत, जेथील देश जगाच्या आरंभापासून एकतंत्री राजांच्या गुलामगिरींत खितपत पडलेले, ज्या लोकांना स्वातंत्र्य कशाशीं खातात हेंसुद्धां कळत नाहीं, त्यांना असली स्वतंत्र राज्यरीति कशी चालवितां येणार ? असल्या प्रश्नास, उत्तरास प्रत्युत्तर या न्यायानें व आपला स्वाभिमान व ऐतिहासिक सत्य म्हणून आपल्या जुन्या ग्रंथांतून आपल्या राजकीय व्यवहारांतील परिणतीविषयीं दाखला देणें केव्हांही अयोग्य होणार नाहीं.

पण त्याच वेळीं या नवीन प्रातिनिधिक जबाबदार राज्ययंत्राची उभारणी कोणकोणत्या तत्त्वांवर केली आहे हें समजून घेण्यास आपण नेहमीं तत्पर असलें पाहिजे. ही पद्धति आपणांसच नवीन आहे असें नव्हे. तर प्रांजलपणें विचार करणारे कांहीं पाश्चिमात्य लेखकही ही पद्धति युरोपांत सुद्धां १७–१८ व्या शतकापर्यंत

अगदीं नवीन पद्धति अशीच गणली जात असे असें कबूल करितात. 'आम्हां युरोपीयांना स्वतंत्र राज्यपद्धतीचें मानवोत्पत्तीपासूनच बाळकडू आहे. आमच्या ग्रीस देशांत व रोमन लोकशाहींत आमची स्वतंत्र राजपद्धति बरीच परिपक्व दशेस पोंचली होती' वगैरे विधानें करून त्या पद्धतीचा व हल्लीं युरोपांत प्रचलित असलेल्या राज्यपद्धतीचा संबंध जोडण्याचा प्रयत्न करणें म्हणजे वडाची साल पिंपळाला लावण्याइतकेंच हास्यास्पद आहे.

असो. या प्रकारच्या या रोमन किंवा ग्रीसच्या स्वतंत्र राज्यांचा व युरोपांत आज सत्ता गाजवीत असलेल्या राजपद्धतीचा अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं. या बाबतींत प्रे. विल्सन आपल्या 'स्टेट' नामक पुस्तकांत म्हणतातः—रोमन साम्राज्यानें स्थानिक स्वातंत्र्य धुळीस मिळवून, प्रांतरूपी निरनिराळ्या घटकांत निरनिराळ्या लोकसमुदायांची भेसळ करून, राष्ट्रीयत्वाच्या रूपरेषा आंखल्या; फ्यडलसिस्टमनें या राष्ट्रघटकांस दृढता आणिली; मध्य व आधुनिक युगांतील बलाढ्य व एकतंत्री राजांच्या अमलाखालीं सर्वजण सारखे चुरडले गेल्यामुळें बहुजनसमाजांत एकीची भावना जागृत झाली; जुन्या ज्ञानाचें पुनरुज्जीवन व धर्मसुधारणा यांनीं नवीन जोम उत्पन्न झाला आणि शेवटीं प्रतिनिधिसत्ताक राज्यव्यवस्थेचीं, आधुनिक राष्ट्रीय लोकशाहीचीं तत्त्वें अमलांत आलीं. या सर्व गोष्टी घडून येण्यापूर्वी जगांत लहान लहान नगरस्वराज्याशिवाय—अत्यंत लहानशा प्रदेशावर एकोप्यानें सहकारी तत्त्वावर राहाणाऱ्या स्वतंत्र जनसमूहांशिवाय—राजकीय जीवित कोठेंही दृष्टीस पडत नसे. राजकारणां-Politics-मधून [Politics-

हा शब्द नगराची (Polis ची) व्यवस्था या शब्दापासून आलेला आहे.] नगरव्यवस्थेचा भाग वगळला म्हणजे तो शब्द अर्थ-शून्यच होत असे. स्थानिक व्यवस्थेच्या बाबतींत व्यक्तिसमुदायांच्या साहचर्याचें व राष्ट्रीय व्यवहारांच्या बाबतींत प्रतिनिधिद्वार. सहकार्य करावयाचें हीं तत्त्वें राष्ट्रांना पटल्या नंतरच Politics शब्दानें अलीकडचा अर्थबोध होऊं लागला. जर युरोपांतील राष्ट्रें या निरनिराळ्या परिस्थितींतून बाहेर पडून, किंबहुना तीं तशीं बाहेर पडल्यामुळेंच तीं प्रातिनिधिक स्वराज्याला पात्र झालीं—त्यांनीं स्वराज्याचे धडे रोमन लोकशाहीपासून गिरविले होते म्हणून नव्हे—जर परिस्थितींत बदल पडत गेल्यामुळेंच ही पद्धति उत्पन्न झाली व वाढली—तर बौद्धिक प्रगतीमध्यें कोणासही हार न जाणाऱ्या हिंदी राष्ट्राला परिस्थितीला अनुसरून ती कां मानवणार नाहीं ?

प्रे. विल्सन त्याच पुस्तकांत फ्रान्ससंबंधीं लिहितांना म्हणतातः— ' फ्रान्समध्यें जें आज पूर्णलोकमतानुवर्ती व स्वतंत्र राज्य स्थापिलें जात आहे,- अशी निदान आशा बाळगण्याला तरी बरीच जागा आहे—तें कांहीं रूढी व पूर्वग्रह यांच्या भूमींत भक्कम रीतीनें खचलेल्या संवयीच्या पायावर रचलें जात आहे असें नाहीं. तें नवीन संवयीच्या पायावर रचलें जात आहे. या नवीन मार्गाचा जुन्या रूढीशीं कांहीं संबंध नाहीं. नवीन स्वभाव-परिपोष, नवीन इच्छा, नवीन अभिलाष, यांनीं बनलेल्या अस्थिर जमिनींत या संवयीचा पाया खणलेला आहे. फ्रेंचलोकांच्या इतिहासप्रसिद्ध स्वभावाशीं अगदीं विसंगत अशी ही संवय आहे.

त्यांचें स्वराज्य हें जुनाट पायावर रचलें जात नसून तें नवीनच घडलें जात आहे.'

तेव्हां ही पद्धति नवीन असली तरी परिस्थितिभेदानुरूप व स्वभावभिन्नत्वाला अनुसरून कांहीं थोड्याफार फरकानिशीं ती अगदीं भिन्न संस्कृतीच्या माणसांनाही अमलांत आणणें शक्य आहे. या गोष्टीचा कोणीकडूनही विचार केला तरी हिंदुस्थानांतील लोक या प्रकारच्या स्वराज्यास अपात्र असणें शक्य नाहीं; तेव्हां आतां या पद्धतीचा मूळ पाया जो मतदार त्यासंबंधीं आपण विचार करूं.

---

१ लोकशाही आणि मतदार.

प्रथम स्वराज्याची, लोकांनीं आपलें राज्य आपणच चालविण्याच्या तत्त्वाची, उभारणी कशावर केली आहे हें पाहूं. राज्यसंस्थेची उभारणी नागरिकांनीं बुद्धिपुरःसर दिलेल्या संमतीवर केली पाहिजे हें तत्त्व आधुनिक लोकशाहीच्या बुडाशीं असतें. नागरिकांची त्या राज्यव्यवस्थेखालीं 'राजीखुषींनें व अक्कलहुषारीनें' राहण्याची कबुली पाहिजे. म्हणजे कांहीं एका विवक्षित रीतीनें प्रयत्न करून राज्यव्यवस्थेंत पालट घडवून आणणें पूर्ण कायदेशीर आहे अशी त्यांना जाणीव असून त्यांनीं प्रचलित राज्यपद्धतीस संमति दिलेली असली पाहिजे. व एकाच गोष्टीला सर्वांची संमति मिळणें सहसा शक्य नसल्यामुळें अशा तऱ्हेच्या संमतीवर अवलंबून असलेली राज्यव्यवस्था नागरिकांपैकीं बहु-मतवाल्यांच्या तंत्रानें चालविली जाते.

अर्थात् या बहुमतवाल्यांचा अल्पमतवाल्यांवर जुलूम होणार नाहीं असें नाहीं. पण एकतंत्री राज्यव्यवस्थेमध्यें केवळ एकाच्याच मर्जीनें सारे बांधले गेले असतात व सर्वांसच प्रतिकूल असे कायदेही मानावे लागतात, तर लोकसत्ताकपद्धतींत निदान बहुजनसमाज तरी ते कायदे करण्यांत भाग घेत असल्यामुळें ते कायदे निदान देशांतील बऱ्याच मोठ्या पक्षांवर तरी लादले गेले असें होत नाहीं.

दुसरें असें कीं, हा जो बहुमतवाला पक्ष एका वेळीं कायद्याचीं सूत्रें हातीं असल्यामुळें प्रबळ असतो तो अगदींच जुलमी कायदे अल्पमतवाल्या पक्षावर लादण्याला धजत नाहीं. कारण पुढें स्पष्ट होईल त्याप्रमाणें कोणच्याही काळीं प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धतिप्रमाणें बहुमतवाल्यांची सत्ता म्हणजे केवळ अळवावरचें पाणी असतें, व कोणत्या वेळीं त्यांचेवर बाजू उलटेल व अल्पमतवाले आपल्या बाजूला बहुमत करून घेऊन राज्यधुरा पटकावतील याचा नियम नसतो, व असें होण्याची भीति नेहेमीं असल्यामुळें कोणचाही अधिकारारूढ पक्ष अगदींच जुलमी होऊं शकत नाहीं.

राज्यकर्ता एक असो वा अनेक असोत, त्याच्या किंवा त्यांच्या हातांत मोठी सत्ता द्यावी लागतेच. सबंध सैन्यबल, कायद्याचें बल, व परंपरागत रूढीचें बल, त्या राज्यव्यवस्थेच्या पाठीशीं असतें. त्याच्यावर दाब मात्र दोन असतात. एक राज्यकर्त्यांच्या घटनेमुळें उत्पन्न होणारा, व एक प्रजेच्या संमति–असंमतीचा.

राज्यकर्ता किंवा राज्यकर्ते कांहीं कांहीं गोष्टी तो किंवा ते ज्या परिस्थितींत वाढले असतील, ज्या परिस्थितीचा ते परिणाम असतील, त्याप्रमाणें करणारच नाहींत; व कांहीं कांहीं गोष्टी, ते ज्या लोकांच्या संमतीवरच त्यांचें राज्य अवलंबून असतें त्यांना ती संमती काढून घेण्याइतकें त्यांच्या मनाविरुद्ध कांहीं करणार नाहींत. एकतंत्री राज्यपद्धतीखालीं राजाची खुषी प्रजेच्या खुषीच्या रेषेचा फारच अतिक्रम करीत असेल. प्रतिनिधिसत्ताक पद्धति शक्य तेवढी राज्यकर्त्यांच्या व प्रजेच्या खुषीची रेषा एकच राहावी यासाठीं योजिलेली युक्ति आहे.

मतदानाचा हक्क, जो नुकत्याच हिंदुस्थानांत ज्या सुधारणा अमलांत आणण्याचा ठराव झाला त्याप्रमाणें, हिंदुस्थानांतील लोकांस मिळाला त्या बाबतींत अगदीं प्रथम अशी गोष्ट लक्षांत येते कीं, हा हक्क सर्वांस सारखा वांटण्यांत आलेला नाहीं. कांहीं ठिकाणीं ३२ रुपये सारा देणाऱ्या जमिनीच्या मालकाला, तर कांहीं ठिकाणीं १६ रुपये सारा देणाऱ्याला, कांहीं ठिकाणीं ५ रुपये भाडें देणाऱ्या भाडेकऱ्याला, तर कांहीं ठिकाणीं ३ रुपये भाडें देणाऱ्याला, (मुंबईंत १० रुपये भाडें देणाऱ्याला), पण जो प्रत्यक्ष साराही देत नसेल व प्रत्यक्ष भाडेंही अथवा इन्कम्-टॅक्सही देत नसेल त्याला कांहीं हा हक्क नाहीं. शिवाय अगर सारा देत असूनही मनुष्य—पुरुष १८ वर्षांचा असला पाहिजे; म्हणजे वयांत आलेला असला पाहिजे. स्त्रिया तर या हक्कदारींतून अजीबातच वगळल्या आहेत. कांहीं कांहीं लोकांना सारा, भाडें किंवा इन्कम्टॅक्सचें एक मत असून शिवाय युनिव्हर्सिटीचें किंवा चेंबर ऑफ् कॉमर्सच्या तर्फेचें दुसरेंही मत देण्याचा अधिकार असतो. एकंदरींत काय कीं ही मतदारीची वांटणी सर्वत्र सरसकट सारखी केलेली नाहीं. अशा स्थितींत स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आह या शिकवणीचा अर्थ काय ? स्वराज्याचा मूळ पाया जो मतदानाचा हक्क तोच जर जन्मसिद्ध नाहीं, तोच जर निवडानिवडीनें करावयाचा तर 'स्वराज्य' हा जन्मसिद्ध हक्क कसा ?

पण हा जो आपल्याला अन्याय दिसतो, तो हिंदुस्थानावर परकी सत्ता आहे याच्या पुष्कळ तोट्यांपैकीं एक आहे असें मात्र

नव्हे. बऱ्याच पाश्चिमात्य देशांच्या प्रातिनिधिक संस्थांच्या इतके दिवस प्रचलित असलेल्या तत्त्वांस अनुसरूनही हा अन्याय समूळ काढून टाकणें शक्य नाहीं. सिज्विक् म्हणतो, "कोणाही मनुष्याला प्रत्यक्ष त्याच्या किंवा त्यांच्या प्रतिनिधींच्या संमतीवांचून केलेले कायदे किंवा लादलेला कर यांना कबुली देणें भाग पडूं नये, हें जें आधुनिक राजकीय संस्थांचें मूलभूत तत्त्व तें मला बऱ्याच अंशानें ग्राह्य आहे. पण राजकीय संस्थांसंबंधींचा परमन्यायतः प्राप्त होणारा असा हा सिद्धांत आहे, असें मात्र मला वाटत नाहीं; एवढेंच नव्हे तर दुसऱ्या कांहीं गोष्टींचा विचार केला असतां या नियमाचें महत्त्व बरेंच कमी होईल. कोठल्याही विवक्षित लोकसमुदायाची किंवा त्यापैकीं बऱ्याच मोठ्या भागाची स्थिति, बौद्धिक किंवा नैतिकदृष्ट्या त्यानें निवडलेल्या कायदेमंडळापेक्षां त्याचा ताबा नसलेल्या कायदेमंडळाकडून त्याच्या हितसंबंधाचा परिपोष अधिक चांगला होईल, अशी नाहीं हें असिद्धच राहतें. मग ही स्थिति त्याच्या बुद्धिमांद्याचा, बेलगामी वृत्तीचा, राष्ट्रीय ऐक्याचा अभाव अगर इतर कशाचाही परिणाम असो."

याप्रमाणें राजकीय मतदानाचा हक्क हा कांहीं परमन्यायतः प्राप्त होणारा जन्मतः सिद्ध असा हक्क नव्हे. याच्या विरुद्ध विचारसरणी प्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ रूसो व त्याचा अनुवाद करणारे लोकशाहीचे पुरस्कर्ते पुढें मांडतात. युरोपांतील सुधारणेच्या वाढीबरोबर मनुष्यमात्राला मतदानाचा हक्क असावा या तत्त्वाचें प्राबल्यही युरोपांत वाढूं लागलें आहे. हल्लीं इंग्लंडमध्यें स्त्रियांनाही मतदानाचा हक्क आहे.

आज युरोपांत जरी ही स्थिति असली, तरी प्रतिनिधि-संस्थात्मक स्वतंत्र राज्यपद्धतीचा उगम, ज्या कल्पनेपासून झाला त्याचा विचार केला असतां हा मतदारीचा हक्क सर्वांना सारखा मिळण्यास इतके दिवस कां लागले, व हिंदुस्थानच्या आजच्या स्थितीच्या दृष्टीनेंही युरोपांतील प्रतिनिधिसंस्थांच्या वाढीची शेवटची पायरी एकदम चढणें कसें अशक्य आहे तेंही कळून येईल.

मध्ययुगांत मध्य युरोपांत जीं राज्यें होतीं त्यांत ब्रिटिश पार्लमेंट हा ज्यांचा विकास आहे अशा प्रातिनिधिक संस्था अस्तित्वांत होत्या. राजाला राज्यकारभारांत मदत करण्याचें त्यांचें काम असे. त्यांपैकीं लॉर्ड्स् हे बडे जहागिरदार जातीनें हजर असत व 'थर्ड एस्टेट' चे प्रतिनिधि लहान लहान जमीनदारांच्याच वतीनें निवडले जात असत. या पार्लमेंटची निवड अशीच करण्याच्या मुळाशीं एक तत्त्व होतें. या पार्लमेंटच्या सभासदांचा व त्यांना निवडून देणाऱ्या मतदारांचा देशाच्या जमिनीशीं निकट संबंध असल्यामुळें, देशाची म्हणजे देशाच्या जमिनीची सुरक्षितता राखण्याचें, त्यांच्या हिताचें, व त्याच्या साहाय्यावांचून अशक्य असें काम होतें. हीच रीति इंग्लंडमध्यें पुष्कळ दिवस प्रचलित होती. पुढें व्यापार व उद्योगधंदे यांची वाढ होऊन इंग्लंडचें—इंग्लिश व्यापाऱ्यांचें—हित केवळ जमिनीशीं निगडित असें राहिलें नाहीं. त्यांचा समुद्राशीं व व्यापारी पेठांशीं संबंध आला, व या समुद्रावर व व्यापारी पेठांवर ताबा ठेवणें हें इंग्रज व्यापारी व गिरणीवाले, यांच्या अतिशय जिव्हाळ्याचें

झालें, व इंग्लंड त्यांच्या व्यापारावर अवलंबून असल्यामुळें, यां नवीन उत्पन्न झालेल्या व्यापारी लोकांस अधिक विस्तृत रीतीनें हक्क देणें भाग झालें. अशा रीतीनें देशाची सुरक्षितता, देशाचें राजकीय आस्तित्व व सामर्थ्य हीं ज्यांच्या अत्यंत हिताचीं आहेत, तीं तशीं आहेत अशी जाणीव ज्यांच्यामध्यें उत्पन्न झाली आहे, अशा लोकसमूहानांच मतदानाचा हक्क देणें इष्ट आहे, हें तत्त्वच यूरोपांतील प्रतिनिधिसत्ताक राज्यव्यवस्थेचा पाया आहे, हें लक्षांत येईल. तेव्हां आजच्या परिस्थितींत हिंदुस्थानांतही देशाच्या जमिनीवर ताबा आहे म्हणून सरदार, जहागिरदार यांना, देशाच्या सुरक्षिततेवर देशांतील अत्यंत मोठा उद्योग जी शेती तिचें हित हेंच त्यांचें हित; अशा सुखवस्तु शेतकऱ्यांना, देशांतील व्यापार व उद्योग यांच्या वाढीची काळजी वहाणारे व्यापारी व उद्योगधंदेवाले यांना व पारतंत्र्याचे तोटे कळून स्वातंत्र्याविषयीं जिवास तळमळ लागून राहिलेल्या सुशिक्षितांना-एकंदरींत देशाचें हित तेंच आपलेंही हित ही भावना ज्यांच्या मनांत बिंबलेली आहे किंवा नवीन जागृत झाली आहे अशा लोकांना मतदानाचा हक्क दिल्यास व ज्यांच्या मनांत राष्ट्रभावनाच उद्भूत झाली नाहीं व देशहिताची चाड नाहीं त्यांना त्यांतून वगळलें तर त्यांत विशेष वावगें असें कांहींही नाहीं. अशा लोकांच्या राष्ट्रभावना जागृत करणें, त्यासाठीं त्यांना शिक्षण देणें व देशाचें हित कशांत आहे हें त्यांना समजावून सांगणें, हें सुशिक्षित लोकांचें कर्तव्य आहे, व हें शिक्षण त्यांच्या मनावर त्रिंबल्यानंतर ते मतदारीचा राजकीय हक्क घेतल्याशिवाय कधींही रहावयाचे नाहींत. मतदारीच्या हकाची उभारणी,

राष्ट्रभावनेची जागृति, राष्ट्रहिताची चाड व राष्ट्रासाठीं त्याग करण्याची तयारी यांवर केलेली असते. स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे, याचा अर्थ समजून जो जो हे शब्द उच्चारील त्याचा तो हक्क त्या भावनेच्या जन्मापासून सिद्ध आहे.

व्यक्तिमात्रांस हा अधिकार असावा, असें म्हणणारास असा प्रश्न आहे कीं, जन्मलेला अमक्या एका वयोमर्यादेपर्यंत असें मत देण्यास नालायक आहे असें ठरविण्याचा अधिकार तरी कायदे करणारांना कोणी दिला ? त्या हक्कांतून मूर्ख लोक कां वगळावयाचे; इतके दिवस स्त्रिया कां वगळल्या जात असत; चोर दरवडेखोर कां वगळतात ? व्यक्तिमात्रांस मताधिकार असावा, असें प्रतिपादणाऱ्या राष्ट्रांतही हे निर्बंध आहेतच. या सर्व प्रश्नांना त्यांना एकच उत्तर द्यावें लागेल कीं, या सर्व लोकांस त्या हक्काची योग्य बजावणी करावयास, देशाच्या हिताबद्दल जेवढी कळकळ अवश्य आहे तेवढी कळकळ नसते. पहिल्या दोन वर्गांना त्याचा अर्थच कळत नाहीं; स्त्रियांचे हितसंबंध युरोपांतही गेल्या शतकाच्या शेवटच्या पंचविशीपर्यंत पुरुषाच्या हितसंबंधापासून भिन्न नव्हते म्हणून एकाच सामाजिक दर्जाच्या स्त्रियांस व पुरुषांस निराळा हक्क देण्याची अवश्यकता भासली नाहीं. स्त्रीपुरुषांच्या विरोधी हितसंबंधाची वाढ **डायसी** म्हणतो त्याप्रमाणें अगदीं अलीकडील आहे. व हिच्या मुळाशीं, स्त्रियांना स्वतंत्र रीतीनें द्रव्यार्जन करण्याची जरूरी तिकडे उत्पन्न झाली व त्याचीं कांहीं साधनें जरी त्यांना अनुकूल झालीं तरी पण पुष्कळ बाबतींत पुरुषांच्या बरोबरीनें त्यांना या साधनांचा उपयोग करण्याची सवड

मिळाली नाहीं हीच गोष्ट होती. यामुळें त्यांना वाटलें कीं आपल्याला पार्लमेंटच्या मतदारीचा हक्क मिळून प्रतिनिधि आपणास जबाबदार होईपर्यंत आपलीं गाऱ्हाणीं दूर व्हावयाचीं नाहींत व त्याप्रमाणें दीर्घ प्रयत्नानें त्यांनीं हा हक्क मिळविला. याप्रमाणें प्रत्यक्ष द्रव्यार्जन करून देशाच्या संपत्तींत भर टाकून व अन्य रीतींनीं, पुरुषांवर अवलंबून नव्हे, तर स्वावलंबनानें व स्वतंत्र रीतीनें देशहित साधूं लागल्यामुळें व स्वतःच्या हिताची व हक्कांची पूर्ण जाणीव व तीव्र कळकळ उत्पन्न झाल्यामुळें देशहिताची ही कळकळ बाळगण्यास त्या योग्य झाल्यामुळेंच त्यांना हा हक्क मिळाला.

'**स्टोरी**' हा युनाइटेडस्टेट्सच्या राज्य-घटनेसंबंधीच्या आपल्या पुस्तकांत म्हणतो, 'मत देण्याचा हक्क निसर्ग-नियमाच्या भक्कम पायावर रचलेला असो, वा नसो, निदान नेहमींच्या व्यवहारांत तरी त्याची बजावणी, तो एक समाजापासूनच उगम पावणारा, प्रत्येक समाजानें आपली स्थिति व आपल्या हिताहितास अनुसरून नियमित केलेला असा राजकीय हक्क आहे याच समजुतीवर होते.'

कांहीं लोक असें म्हणतात कीं, या हक्काचा उपयोग करण्यास शिकविण्याचें उत्तम साधन म्हणजे तो हक्क देऊन लोकांच्या अंगावर जबाबदारी टाकणें हेंच होय.

जबाबदारीनें आपलें राज्य आपण चालविण्याचा अधिकार म्हणजे चुका करून त्या सुधारण्याचा अधिकारच होय. ज्याप्रमाणें पाण्यांत शिरल्यावांचून पोहावयास येत नाहीं त्याप्रमाणेंच प्रत्यक्ष मतदारीचा उपयोग केल्यावांचून त्याची किंमत कळत नाहीं.

अशी जबाबदारी अंगावर टाकली असतां सार्वजनिक कामांत भाग घेण्याची संवय लागते. पण **सिजविक्** म्हणतो "अशा तऱ्हेनें सार्वजनिक कामांत लक्ष घालून मिळावयाचें तें बऱ्याच अंशीं प्रत्येक सार्वजनिक प्रश्नावरील साधक बाधक प्रमाणांचा विचार करून निकाल देण्याची पात्रता आंगीं असल्याशिवाय असें सार्वजनिक काम करण्यानेंच निष्पन्न होत नाहीं; कारण, शिक्षणाचें मुख्य अंग म्हणजे अमका हा चुकीचा परिणाम अमक्या ह्या कारण–समुच्चयांपासून घडला असें मनांत आणून मनुष्यांनें स्वतःस सुधारणें; पण राजकारणीं चुका करणाऱ्या मनुष्याला आपल्या चुकांचे परिणाम अवचित बदललेल्या परिस्थितीच्या अगर दुसऱ्यांच्या हेकेखोरपणाच्या किंवा मूर्खपणाच्या माथीं खुशाल मारतां येतात."

म्हणून मतदारीचें हत्यार उपयोगांत कसें आणावयाचें हें जरी तें प्रत्यक्ष हातांत देऊनच शिकविलें पाहिजे तरी तें हातीं येण्यासही एक प्रकारची पात्रता अंगीं लागते.

अशा रीतीनें हा राजकीय मतदानाचा हक्क देण्याचें कारण काय तर ज्याचें त्याचें हित त्याला अधिक चांगल्या रीतीनें कळतें; ज्या कायद्याला त्या मतदाराची अनुमति प्रत्यक्ष अगर अप्रत्यक्ष रीत्या होती ते कायदे तो निमूटपणें पाळतो. जे कर लादण्यांत त्याचाही हात होता ते तो निमूटपणें भरतो व ज्या अधिकाऱ्यांवर पर्यायानें त्याचीच हुकमत चालते, त्या अधिकाऱ्यांचे हुकूम व्यक्तिशः मानण्यास तो नाखूष नसतो. तिऱ्हाइतानें घातलेलीं बंधनें दुःसह होतात; आपलेच नियम पाळण्यांत आपल्याला आनंद होतो.

पण या नूतन राष्ट्रीय प्रातिनिधिक राज्यपद्धतींत आपले कायदे प्रत्यक्ष आपल्याला करण्यास वाव नसतो. पण अशा रीतीनें प्रत्यक्ष या राजकीय हक्काची बजावणी करणें पूर्वकालीन लहान लहान संस्थानांत शक्य होतें, तरी राष्ट्रीय ऐक्याच्या भावनेनें निगडित झालेले असंख्य जनसमूह व विस्तृत प्रांत यांनीं बनलेल्या राज्यांत हें किती अव्यवहार्य आहे हें तत्काळ लक्ष्यांत येईल. या कारणाकरितां व दुसऱ्याही पुष्कळ कारणांकरितां प्रतिनिधि निवडणें अधिक श्रेयस्कर आहे असें आढळून येतें. आपण जे नियम पाळावयाचे, जो खर्च करावयाचा, जी शिल्लक टाकावयाची किंवा जे नोकर नेमावयाचे, ते नियम, ती काटकसर, किंवा तो नोकर, जरी स्वतःला ठरवितां आला नाहीं तरी निदान आपल्या विश्वासांतील कोणी मनुष्यानें या गोष्टी कराव्यात असें कोणाही मनुष्यास वाटेल; व उत्तम गोष्ट करितां आली नाहीं तरी कमी योग्यतेच्या गोष्टींत समाधान मानणें हेंच राजकीय व्यवहारांत योग्य असतें म्हणून जर कायदे करणें, व अंमलबजावणीकरितां अधिकारी नेमणें या गोष्टी प्रत्येक व्यक्तीला प्रत्यक्ष करितां आल्या नाहींत तरी आजच्या स्थितींत ही गोष्ट आपल्या विश्वासांतील प्रतिनिधीच्या द्वारेंच करणें केव्हांही रास्त होईल.

कोठल्याही देशाचें राज्य सुरळीत रीतीनें चालण्याकरितां कायद्यांची—कांहीं ठराविक नियमांची—जरूरी असते. आणि यामुळें कायदे करणें हें राज्यकारभाराचें सर्वांत महत्त्वाचें अंग होऊन बसलें आहे. आणि या दृष्टीनें ही राज्य चालविण्याची जबाबदारी मतदारावर न सोंपवितां त्यांच्या विश्वासांतील प्रतिनिधींवर सोंपविणें अधिक इष्ट झालें आहे. जे. एस्. मिल्ल् म्हणतो कीं "कायदे करणें हें बुद्धिमत्तेचें सर्वांत अवघड असें काम आहे; यांत अनु-

भव वॅ मानसिक विकास हीं दोन्हीं लागतातच, पण त्याशिवाय त्या कामाची संवय व सतत अभ्यास हींही लागतात." तेव्हां हें काम कसें सर्वस्वी साधारण मनुष्याच्या आटोक्याबाहेरचें आहे हें तात्काल लक्षांत येईल.

आणखी असें कीं, आजच्या श्रमविभागाच्या काळांत व ज्यावेळीं प्रत्येकजण आपल्या कलेंत पारंगत असावा लागतो अशा वेळीं, प्रत्येकाला कायदे करण्यास योग्य तें ज्ञान व फुरसत मिळणेंही शक्य नाहीं. या दृष्टीनेंही हें काम प्रतिनिधींवर सोंपविणें-च अधिक इष्ट आहे. प्रतिनिधी निवडण्याचा दुसराही असा फायदा सांगण्यांत येतो कीं, प्रतिनिधी निवडण्यामुळें लोकांमध्यें स्वातंत्र्यानें स्वावलंबन, निरलसपणा व आत्मविश्वास इत्यादि जे गुण अंगीं बाणतात त्यांनीं होणाऱ्या मानवी उत्कर्षालाही मदत होते. येथें हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, राजकीय स्वातंत्र्य म्हणजे वाटेल त्यास वाटेल तसें वागूं देणें नव्हे. एकतंत्री अमलाखालीं असणाऱ्या देशांत जर साऱ्या लोकांना केवळ एका राजानें केलेल्या कायद्याखालीं राहावें लागतें तर प्रतिनिधिक पद्धतीच्या लोकशाही-खालींही अल्पसंख्याकांना पुष्कळ वेळेला बहुसंख्याकांच्या हुकमतींत राहणें भाग पडतें. तरी पण या दुसऱ्या तऱ्हेच्या पद्धतीला राजकीय दृष्ट्या स्वतंत्र राजपद्धतीच म्हणतात. प्राति-निधिक पद्धतीनें ज्यांचा अंमलबजावणीवर ताबा चालतो त्यांना त्याबद्दल आपलेपणा वाटणें, त्यांनीं देशाच्या कल्याणार्थ झटणें व प्रसंगीं त्याकरितां त्यागही करण्यास तयार असणें हें साहाजिक आहे. पण म्हणून राजकीय स्वातंत्र्यामुळें व्यक्ति-मात्र आपल्या खासगी व्यवहारांतही अधिक आत्मनिष्ठ व

अधिक स्वावलंबी होतात हें निष्पन्न होत नाहीं. प्रत्येक मनुष्याला स्वहिताच्या वाढीविषयीं तत्पर करण्याचा उत्तम मार्ग म्हटला म्हणजे त्याला सार्वजनिक हिताकडे लक्ष पुरविण्यास सांगणें, व त्याला त्याची स्वतःची स्थिती सुधारण्याचा उत्तम मार्ग ह्मणजे सरकारचें मन वळविणें, किंवा सरकारला तसें करण्यास भाग पाडणें हें होय, असें सांगणें, असें म्हणणें मूर्खपणाचें होईल. आतां असें म्हणतां येईल कीं उद्योगी–स्वावलंबी व आत्मनिष्ठ लोकांना कोणत्याही विवक्षित तऱ्हेचा लोकमताचा दाब सरकारवर नीटपणें राखितां येईल; पण यावरून हे गुणच त्यांना मतदारीचा उपयोग केल्यापासून मिळतील असें म्हणण्यापेक्षां अशा प्रकारचा स्वभाव असलेले लोक अशा तऱ्हेच्या राजकीय हकाची आकांक्षा धरितील व तो मिळेपर्यंत समाधान पावणार नाहींत असें ह्मणणें सयुक्तिक होईल. निदान एवढें तरी खास कीं अशा स्वभावाच्या राष्ट्राला एकदां कायदेमंडळावर ताबा मिळाल्यानंतर– व हा ताबा प्रतिनिधींचें कायदेमंडळ नेमिल्यानें मिळतो–त्या राष्ट्राला ज्यांत लोकमत प्रतिबिंबित झालेलें नाहीं अशा कायदेमंडळाच्या दाबाखालीं ठेवून चिरकाल व सार्वत्रिक शांतता राखणें फार अवघड जाईल.

सारांश काय कीं, आपल्या देशाचें राज्य कसें चालावें हें सांगण्याचा हक्क म्हणजे राजकीय मतदारीचा हक्क. हा हक्क देशहिताशीं ज्याचें हित निगडित झालेलें आहे व आपल्या देशाच्या हिताविषयीं ज्यांना कळकळ वाटत आहे अशांना देण्यांत येतो. तो जन्मसिद्ध नाहीं. प्रतिनिधि निवडण्याची जरूर राष्ट्रांच्या विस्तारामुळें, व सामान्यजनतेच्या कायदे करण्याबाबतच्या अज्ञानामुळें व जनतेच्या विविध व्यापारांमुळें उत्पन्न होतें. आतां पुढील भागांत या प्रतिनिधीसंबंधीं अधिक विचार करूं.

२ निवडणूक.

अशा मतदारांनीं प्रतिनिधी निवडावयाचें कारण प्रतिनिधी-शिवाय, प्रत्यक्ष कोणत्याही राजकीय प्रश्नावर प्रत्येक व्यक्तिमात्राचें मत घेणें शक्य नाहीं हें आपण पाहिलेंच. तरी एवढ्या विस्तृत प्रदेशांतील मतदारांच्या तर्फे त्यांचे प्रतिनिधी तरी कसे निवडावयाचे हा प्रश्न शिल्लक राहतोच. पूर्वी रोमनलोकशाहींत व ग्रीसच्या नगरराज्यांतून अधिकारी निवडीत ते 'अमका अधिकारी पाहिजे' का दुसरा पाहिजे असा प्रश्न विचारून ज्याला सगळ्यांत अधिक मोठ्यानें ' होय ' अशी संमति येईल तो निवडला गेला असें समजत असत. कोणत्याही प्रश्नावर होकारार्थी आवाज मोठा होतो का नकारार्थी आवाज मोठा होतो यावरच निकाल अवलंबून असे. हल्लींही पार्लमेंटमध्यें व त्यासारख्या लहान लहान सभांतून, उदाहरणार्थ—कौन्सिलमधून, याच रीतीचा अवलंब केला जातो. पण अशा पद्धतींत सर्व मतदारांची प्रत्यक्ष एकाच वेळीं एकाच ठिकाणीं जरूरी लागते व ज्या कारणाकरितां प्रतिनिधी नेमण्याची अवश्यकता उत्पन्न झाली त्याच कारणाकरितां ही निवडणुकीची पद्धतही स्वीकारतां येणें अशक्य आहे हें तात्काळ लक्षांत येईल.

सर्व देशाचे अमके इतके प्रतिनिधि सभेमध्यें असावे असें जरी ठरलें तरी ते कोण असावे हें ठरविणें लोकमतावर अवलंबून असल्यामुळें निरनिराळ्या सोईवार विभागांतून तेथील मतदारांच्या

संख्येच्या प्रमाणानें त्यांनी अमके इतके प्रतिनिधि निवडण्याचा हक्क आहे असें जाहीर करण्यांत येतं. व नंतर त्या प्रत्येक विभागानें आपल्या-तर्फे कोण प्रतिनिधी जावे हें ठरवावयाचें असतें. या भागांतील सर्व मतदारांना एका कालीं एकत्र जमणें अशक्य असल्यामुळें या भागाचेही पोटविभाग केलेले असतात व प्रत्येक पोटविभागांत मतें देण्याच्या जागा ठरविण्यांत येतात. यास पोलिंगसेंटर असें म्हणतात. येथें व्यक्तिशः मतदारांनीं जाऊन आपलें मत द्यावयाचें असतें.

हें मत त्या मतदाराचे तर्फे अमका प्रतिनिधी कौन्सिलांत जावा एवढें सांगण्यापुरतेंच असतें. जे कौन्सिलांत जाण्यासाठीं उमेदवार असतात त्यांच्या नांवांच्या पाट्या असलेल्या पेट्या अज्ञ लोकांच्या सोयीसाठीं विवक्षित रंगांच्या केलेल्या असतात व अमक्या रंगाची पेटी रा. अची, अमक्या रंगाची रा. क्षची असें आधीं जाहीर केलेलें असतें, अशा पेट्यांतून मतदारांनीं मताच्या चिठ्या टाकावयाच्या असतात.

पूर्वीं या चिठ्या टाकण्याचें काम जाहीर रीतीनें होत असे व हल्लींही बरेच ठिकाणीं होतें. पण या पद्धतींत एक खोड आहे. ती अशी कीं उघड उघड मत द्यावयाचें असलें म्हणजे भीड बळजबरी लांचलुचपत इ. प्रकारांना वाव सांपडते. असें उघड मत देतांना जरी भीड बळजबरी याचा प्रयोग झाला नाहीं तरी मताच्या चिठ्यांवर असलेल्या सह्यांवरून कोणी कोणाला मत दिलें हें तात्काळ कळत असल्यावरून ज्याच्या विरुद्ध कांहीं मतदारांनीं मत दिलें असेल तो त्या मतदारांचा द्वेष करूं लागतो व सूड घेण्याची संधीच

पाहात असतो. अशा रीतीनें उघड दहशत देण्यांत गरीब लोकांनां व नोकर वगैरेनांही मोकळेपणानें मतें देतां येत नाहींत व निवडणूक खरी लोकमतनिदर्शक होत नाहीं.

म्हणून गुप्त मतदानाची पद्धति अमलांत आली. या पद्धतींत मताच्या चिठ्या टाकण्याची जागा असेल ती झांकलेली असते. या झांकलेल्या जागीं वर सांगितलेल्या उमेदवारांच्या नांवांच्या–रंगांच्या–पेट्या ठेविलेल्या असतात. मतदार मत द्यावयाला आला म्हणजे मताधिकाऱ्यास त्यानें आपलें नांव सांगावयाचें व तो जो कागद देईल तो कागद-यांवर मतदारानें कांहींही लिहावयाचें नसतें–त्यानें आंत नेऊन त्याला ज्या उमेदवाराला मत द्यावयाचें असेल त्या उमेदवाराचे पेटींत नेऊन टाकावयाचा.

अशा रीतीनें आपण असें समजूं कीं, चार उमेदवारांपैकीं एका उमेदवाराला बाकी तिघांपैकीं प्रत्येकाहून आधिक मतें मिळालीं. असें झालें म्हणजे तो उमेदवार बहुमतानें निवडून आला असें जाहीर करण्यांत येतें. पण त्याला खरोखरच बहुमत–मतदारांपैकीं निम्याहून अधिक लोकांचें मत–अनुकूल असेल कां नाहीं हें निश्चित सांगतां येणार नाहीं. कारण बाकीच्या ज्या मतदारांनीं न निवडून आलेल्या तिघांना मतें दिलीं त्यांच्यापैकीं बहुतेकांच्या किंबहुना सर्वांच्याच मतें त्या तिघांपैकीं कोणीही त्या निवडून आलेल्या मनुष्यापेक्षां अधिक योग्य ठरवण्याचा संभव आहे व अशी स्थिती असली म्हणजे जो निवडून आला त्याच्या विरुद्धच बहुमत आहे असें होणार.

ही स्थिती सुधारण्याकरितां एकाहून अधिक प्रतिनिधी निवडून देणारे मतदारसंघ निर्माण करण्यांत येतात. व जितके प्रतिनिधी निवडून द्यावयाचे तितकीं मतें प्रत्येक मतदाराला असतात व मतदाराच्या आवडीप्रमाणें त्याला उमेदवारांना कमी अधिक मतें वांटून देण्याचा अधिकार असतो. समजा, एका भागांतून चार प्रतिनिधी निवडावयाचे आहेत तर त्या भागांपैकीं प्रत्येक मतदाराला ४ मतें असतील व त्या मतदारांच्या मनास येईल त्याप्रमाणें त्याला एका उमेदवाराला ३ तर दुसऱ्याला एक व अशाच रीतीनें निरनिराळ्या प्रमाणानें मतें वांटतां येतात. तर प्रत्येक मतदाराची मतसंख्या त्याच्या रुचिभिन्नत्वाप्रमाणें कमी अधिक प्रमाणांत वांटली जाऊन वर सांगितला इतका लोकमताचा विपर्यास होणार नाहीं.

एकच प्रतिनिधी निवडून देणारा मतदार संघ बनवूनही वरील विपर्यास घालविण्याकरितां आणखी एक युक्ति योजण्यांत येते. ती अशी कीं वर सांगितल्याप्रमाणें चार उमेदवारांना वांटून गेल्यानंतर ज्या दोन उमेदवारांना बाकीच्या दोन उमेदवारांहून अधिक मतें मिळालीं असतील त्यांना फिरून एकदां मतें देण्यांत येतात व त्यांपैकीं ज्याला बहुमत मिळेल तोच निवडून आला असें समजतात. याला सिस्टम ऑफ् सेकंड बॅलट म्हणतात.

निवडणुकींतून वरील किंतु सर्वस्वी किंवा बऱ्याच अंशीं घालवावा म्हणून आणखी एक निवडणुकीची पद्धति योजतात. ती प्रपोर्शनल् रेप्रेझेंटेशन म्हणून प्रसिद्ध आहे. या

पद्धतीचा मुख्य कटाक्ष देशांत ज्या प्रमाणांत निरनिराळीं मतें प्रचलित असतील त्या प्रमाणांत त्याच्या प्रातिनिधिसभेंत दिग्दर्शन व्हावें या गोष्टीकडे आहे. उदाहरणार्थ राष्ट्रीय पक्ष, नेमस्त पक्ष व ब्राह्मणेतर पक्ष हे जर संस्थेच्या दृष्टीनें ३: २: १: या प्रमाणांत देशांत असतील तर त्यांच्यातर्फे निवडून येणाऱ्या प्रतिनिधींमध्येंही हेंच प्रमाण असलें पाहिजे. याला प्रथम देशांतील हे पक्षभेद त्याच प्रमाणांत दृश्य होतील असे मतदारसंघ निर्माण केले पाहिजेत; एकाद्या ठिकाणीं राष्ट्रीयांचें बाकीच्या दोन पक्षांशीं मिळून २।१ असें तर दुसरे ठिकाणीं अगदीं समान असें प्रमाण असून चालायचें नाहीं.

या मोठ्या विभागांतून प्रतिनिधी निवडून द्यावयाचे ते सुद्धां बरेच असले पाहिजेत. उदाहरणार्थ जर वरील ३: २: १ हेंच प्रमाण धरलें तर ६ प्रतिनिधि निवडून देईल एवढा मोठा मतदारसंघ केला तरच योग्य प्रमाणांत सर्व पक्षांचे लोक येणार. जर तीनच प्रतिनिधी निवडून द्यावयाचे असतील तर शेवटच्या पक्षाचीं सर्वच्या सर्वच मतें फुकट जाणार. अशा रीतीनें पुष्कळ प्रतिनिधी निवडणारे मतदार संघ निर्माण करून प्रत्येक मतदारास प्रसंगीं दुसऱ्यास उपयोगी पडेल असें एकच मत देण्यांत येतें; यास सिंगल ट्रान्स्फरेबल् व्होट म्हणतात. समजा अ, ब, क ड, इ, फ, असे उमेदवार उभे आहेत तर एकाद्या मतदाराला अ सर्वस्वी पसंत असा उमेदवार आहे व चालेल असें वाटतें, क कांहीं नापसंत नाहीं, पण बाकीचे मात्र बिलकूल पसंत नाहींत. तर तो आपलें मत प्रथम अला देईल. त्याला जर तें निरुपयोगी

ठरलें किंवा नको असलें तर त्याचा उपयोग बला करण्याची सवड देण्याकरितां बची दुसरी निवड करील व कची ती तिसरी निवड करील. मतें मोजण्याच्या वेळीं अशी व्यवस्था करण्यांत येते. निवडावयाच्या प्रतिनिधींच्या संख्येंत १ मिळवून त्या संख्येनें मतदारसंख्येस भागावयाचें व भागाकारांत १ मिळवून जी संख्या येईल तितकीं मतें ज्यास मिळतील तो निवडून आला असें समजावयाचें.

१०० मतें असल्यास व ५ प्रतिनिधि निवडावयाचे असल्यास प्रथम ६ नीं १००स भागावयाचें म्हणजे १६; व नंतर त्यांत १ मिळवावयाचा म्हणजे किमान १७ मतें मिळतील तो निवडून आला असें समजावयाचें. कारण एकाला १७ मतें मिळाल्यास बाकी राहिलेल्या ८३ मतांतून १७ मतें मिळवून आणखी चार जणांनांच निवडून येतां येईल.

ही किमान संख्या ठरली म्हणजे पाहिल्या मोजणींत ज्यांना हीं किमान मतें मिळालीं ते निवडून येतातच. पण इतर ज्यांना दुसरीं किंवा तिसरीं मतें मिळालीं असतील त्यांना त्या किमान संख्येपेक्षां अधिक मतें पाहिल्या निवडून येणाऱ्यास निरुपयोगी असल्यामुळें उपयोगी पडतात. तेव्हां प्रथम दुसऱ्या मिळालेल्या मतांची मोजदाद करून त्याप्रमाणें कोण निवडून आला हें जाहीर होतें.

आतां या अ, ब, क, ड, इ, फ यांपैकीं पाहिल्या मतांचीं वांटणी खालीलप्रमाणें झाली आहे असें समजूं. अ २५–१७= ८ ब २०–१७ = ३ क १५ ड १८– १७ = १ इ १० फ १२. यांपैकीं १७ मतें ज्यांस मिळालीं ते निवडून आले

असें समजावयाचें व या निवडून आलेल्यांचीं फुकट गेलेलीं मतें त्या मतपत्रिकांवरील दुसऱ्या मतांच्या प्रमाणांत वांटून द्यावयाचीं. या दुसऱ्या मतांची वाटणी करण्यासंबंधानें तीं बरोबर प्रमाणांत होण्याकारितां खालील उपाय योजितात. अच्या २५ मतपत्रिकांवर दुसरें मत जर १० जणांनीं कला व १५ जणांनीं इला दिलें असेल तर अ, चीं फुकट गेलेलीं मतें याच प्रमाणांत (क १०: इ १५) वांटून द्यावयाचीं. अशीं फुकट गेलेलीं मतें निवडून देऊन इष्ट ते ५ प्रतिनिधि निवडून आल्यास जो निवडून येणें शक्य नाहीं त्याचीं मतें निरुपयोगी ठरल्यामुळें वरीलप्रमाणें तीं बाकीच्या उमेदवारांस वांटून देतात (याचें सविस्तर विवेचन 'चित्रमय' जगत्च्या आक्टोबर १९१६ च्या अंकांत रा. म. रा. परांजपे एम. ए., बी. एस्सी. यांनीं केलेलें आहे तें पाहावें). याप्रमाणें जितके प्रतिनिधि द्यावयाचे असतील तितके येईपर्यंत करावयाचें. ही प्रपोर्शनल् रेप्रेझेंटेशनची एक पद्धत आहे. ही अद्यापि सर्वमान्य झाली नाहीं. याचें कारण खालीलप्रमाणें आहे. तींत मतें मोजण्याची रीति फार घोंटाळ्याची आहे. **डायसी**च्या मतें जितके म्हणून देशांत पंथ अगर पक्ष असतील तितक्या सर्वांचें दिग्दर्शन प्रातिनिधिसभेंत झालें नाहीं तरी प्रातिनिधिक राज्यपद्धति कुचकामाची ठरते असें नाहीं. व कोणताही पक्ष जोरावला म्हणजे तो कोणत्याही पद्धतींत प्रतिनिधींच्या जागा काबीज करूं शकतोच.

मतदारांची संख्या मोठी व निवडावयाचे प्रतिनिधी थोडे अशी स्थिती असली तर, अप्रत्यक्ष निवडणुकीची रीति बरेच

ठिकाणीं अमलांत आणतात. उदाहरणार्थ, अमेरिकेंतील प्रेसिडेंटच्या दर चार वर्षांनीं होणाऱ्या निवडणुकीकरिता निवडून देणारे लोक प्रथम सगळ्या मतदारसंघांतर्फे निवडतात. व नंतर हे निवडून देणारे आपल्या बहुमतानें अध्यक्षाची निवडणूक कारितात. हिंदुस्थानाला लेजिस्लेटिव्ह असेंब्ली व कौन्सिल ऑफ् स्टेट या सर्व देशाच्या कायदासभांकारितां जे सर्व हिंदुस्थानातर्फे प्रतिनिधि निवडावयाचे ते अर्थात् प्रांतिक कायदे कौंसिलच्या प्रमाणानें बरेच कमी असणार. पण यासाठीं नवीन सुधारणांना अनुसरून या सभांची मतदारी प्रांतिक कौन्सिलाच्या मतदारीपेक्षां आर्थिक-दृष्ट्या जे अधिक योग्यतेचे आहेत अशांनाच देण्यांत आलेली आहे. कौन्सिल ऑफ् स्टेट ही तर फारच वरिष्ठ दर्जाच्या लोकांनीं निवडलेले जवळ जवळ निम्मे सभासद व सरकारनें नेमलेले निम्मे सभासद अशांची बनणार आहे.

वरील अप्रत्यक्ष निवडणुकीची पद्धति स्वीकारून निदान लेजिस्लेटिव्ह असेंब्ली तरी अधिक लोकमतनिदर्शक झाल्यास बरें. प्रांतिक कौन्सिलाकरितां मतदारांचा हक्क मिळण्याला एक तर, तो मनुष्य ३२ रुपये सारा देत असला पाहिजे; किंवा ज्याचें भाडें तीन किंवा अधिक रुपये असेल अशा घरांत तरी राहात असला पाहिजे अगर इन्कम्टॅक्स भरीत असला पाहिजे. मुंबईचा भाडेकरी दर महिन्यास दहा रुपये भाडें भरीत असला पाहिजे. हें साधारण मतदारसंघांसंबंधीं झालें. यांत जरी या लायकीच्या अटींपैकीं दोन किंवा तीन अटी पुऱ्या करणारा एखादा इसम असेल तरी त्यास दोन अगर तीन मतें मिळणार नाहींत. त्याला

कोठें तरी साधारण संघांत एकच मत देतां येईल. किंवा जर तो ज्या विभागाच्या वतीनें दोन किंवा अधिक प्रतीनिधि निवडून द्यावयाचे अशा संघांत असेल तर त्याला तितकीं मतें मिळतील. पण दुसऱ्या मतदारसंघांत त्याला हक्क मिळूं शकणार नाहीं.

पण युनिव्हर्सिटी किंवा चेंबर ऑफ कॉमर्स अशासारख्या विशिष्ट मतदारसंघांत, नांव दाखल होण्याची लायकी असेल तर साधारण संघांत मत असूनही अशा विशिष्ट संघांतही एकाच मनुष्यास मत देतां येईल.

---

३ प्रतिनिधि.

अशा रीतीनें हे प्रतिनिधि निरनिराळ्या मतदारसंघांतर्फे निवडले जातात. वर सांगितलेंच आहे कीं, या प्रतिनिधींचें मुख्य काम म्हणजे कायदे करणें. आपण निवडून देतों तीं कायदामंडळें होत. या कायदामंडळाच्या द्वारें सर्व राजकीय ढवळाढवळ केली जाते. या गोष्टीचा फायदा घेऊन, कोणीही कायदेबाज वकील पुढें येईल, व म्हणेल कीं, प्रतिनिधि जे निवडावयाचे ते अर्थातच वकील– कायदा जाणणारे– हवेत. कारण कोठल्याही कायद्याची योजना, तो पास झाल्यास त्याचे परिणाम काय होतील याचा दूरवर विचार करून करावयाची असते. कोठलाही नवा कायदा पूर्वीच्या कायद्यांशीं सुसंबद्ध असावा लागतो. पण अस्तित्वांत असलेल्या कायद्यांतील दुर्ज्ञेय असे नियमही बिनचूक व प्रामाणिकपणानें एकाद्या घडलेल्या गोष्टीला लागू करणें, व असलेल्या कायद्यांचे परिणाम संकलित करून, तुलनात्मक दृष्टीनें त्यांचें व नवीन योजिल्या जाणाऱ्या कायद्याच्या परिणामांचें महत्त्वमापन करून नवीन कायदा कसा असावा हें ठरविणें यांत फार अंतर आहे. अस्तित्वांत असलेल्या कायद्यान्वयें न्याय देण्यास कायद्याचा काटेकोरपणानें अर्थ करण्यांत व शब्दांचा कीस काढण्यांत, वाकबगार वकील व न्यायाधीश किती जरी तरबेज असले तरी कायदे करण्याच्या कामीं खरोखर उपयोगी असे जे गुण ते त्यांचे आंगीं असतीलच असें नाहीं. त्याला फक्त कायद्याच्या ज्ञानाहूनही अधिक

कांहीं तरी लागतें. कायद्याचा व त्या कायद्यानें शासित अशा समाजाच्या स्थितीचा परस्परसंबंध कोणत्या प्रकारचा आहे, व्यक्तिमात्राच्या वागणुकीवर त्यांचा कसा व काय परिणाम होतो, नवीन कायद्यानें केल्या जाणाऱ्या फरकाचे तात्कालिक किंवा कालांतरानें होणारे परिणाम काय, इत्यादि गोष्टींचें त्यांना यथार्थ ज्ञान लागतें. व तें प्रत्यक्ष अनुभवावांचून किंवा अनुभविक लोकांच्या सहवासावांचून मिळत नाहीं. अशा रीतीनें सर्वस्वीं राजकारणकुशल व बहुश्रुत अशीं माणसें मिळणें किती अवघड आहे हें सांगावयास पाहिजे असें नाहीं. असें जर आहे तर कायदासभेचे प्रतिनिधि निवडतांना सर्वसाधारण विद्वत्ता असलेलीं अशीं माणसें निरनिराळ्या भागांतून योग्य प्रमाणांत निवडण्याकडे लक्ष दिलें पाहिजे. ठराविक मतदारसंख्येच्या निरानिराळ्या भागांतून ठराविक मुदतीपुरते कायदेकार निवडण्यानें जरी आपणांस सर्वतोपरी राजकार्यधुरंधर अशीं माणसें मिळालीं नाहींत तरी जरूरीपुरतें निरानिराळ्या शाखांचें प्रत्यक्ष ज्ञान असलेले असे लोकप्रतिनिधि आपणाला मिळतात.

निरनिराळ्या भागांतले लोकप्रतिनिधि असले, म्हणजे ते आपापल्या भागाविषयीं तरी बरेच माहितगार असतात व ते ज्या भागांतून निवडले गेले असतील तेथील लोकांच्या आकांक्षांबद्दलही त्यांना कळकळ असते. ही कळकळ कायम राहण्याला प्रातिनिधिसत्ताक राज्य–संस्थांसंबंधीं वर जो **ठराविक मुदतीकरितां** प्रतिनिधि निवडण्यासंबंधींचा उल्लेख केला त्याचा फार उपयोग होतो. हीं कायदामंडळें कांहीं एका ठराविक मुदती-

पुरतींच निवडलीं जातात. उदाहरणार्थ, अमेरिकेंतील प्रतिनिधि-सभेची नवी निवडणूक दर दोन वर्षांनीं झालीच पाहिजे असा नियम आहे. इंग्लंडमधील हाउस ऑफ कामन्सची निवडणूक पांच वर्षांनीं झालीच पाहिजे असा नियम आहे. अर्थात् जर हाउस ऑफ कॉमन्स या मुदतीच्या आंतच कांहीं विशेष कारणास्तव मोडण्याचें राजाच्या (म्हणजे प्रधानाच्या) मनांत आलें तर तो तसें करूं शकतो. आपलीं कौन्सिलें तीन वर्षांपुरतीं निवडलीं जाणार आहेत; तेव्हां या निवडलेल्या मुदतींत, त्या प्रतिनिधीला जर पुनः निवडून येण्याबद्दल कांहीं चाड असेल, तर, तो ज्या मतदारसंघानें त्याला निवडलें असेल त्यांच्या हितासंबंधानें नेहमीं दक्ष राहीलही. **सिजविक** म्हणतो'जर कायदासभेंतील जागा, पगार किंवा अधिकार व सामाजिक दर्जा या दृष्टींनीं योग्य तेवढी स्पृहणीय असेल तर पुनर्निवडणुकींत निवडून येण्याच्या इच्छेनें तरी तो सभासद त्याला निवडून देणाऱ्यांच्या हिताबद्दल दक्ष राहील.

पण अशा रीतीनें तो जरी त्याला निवडून देणाऱ्यांच्या मताविरुद्ध वागणार नाहीं अशी या नियमांनीं खबरदारी घेतली आहे, तरी तो ज्यांचा प्रतिनिधि असतो त्याच्या सामुदायिक मतामध्यें व त्याच्या स्वतःच्या प्रामाणिक मतामध्यें भेद उत्पन्न होण्याचा संभव आहे. लोकशाहींत जनतेच्या मताची मोजदाद करितांना, ती व्यक्तिशः न करितां प्रातिनिधींचे द्वारांच करणें कां अधिक इष्ट आहे, याचीं कारणें देतांना वर सांगितलेंच आहे कीं, ज्यांना राजकीय मतदानाचा हक्क दिलेला असतो त्या सर्व

लोकांस प्रत्येक राजकीय प्रश्नावर मत बनविणें शक्य नसतें. फार झालें तर कांहीं सामान्य तत्त्वांसंबंधीं त्यांचीं मतें ठाम असूं शकतील व त्या बाबतींत त्यांचें मतैक्य असूं शकेल. आणि त्या सामान्य तत्त्वांच्या अनुरोधानें जे प्रश्न कायदेमंडळापुढें येतील त्यांवर प्रतिनिधीला, त्याला निवडून देणाऱ्या मतदार-संघाच्या मताला अनुसरूनच वागावें लागेल. पण पुष्कळ वेळेला असे प्रश्न उपस्थित होतात कीं, ज्या बाबतींत असा सामान्य असा कांहींच मार्ग आंखून ठेविलेलाही नसतो, किंवा तो प्रश्न त्यावेळीं मतदारांना पूर्णपणें समजाऊनही देणें शक्य नसतें. अशा वेळीं अर्थातच प्रतिनिधीला स्वमतानुरोधानेंच वागण्यास मोकळीक पाहिजे; पण याहूनही पुढें जाऊन असें म्हणतां येईल कीं, मतदार जो प्रतिनिधि निवडतात तो त्यानें अमक्या अमक्या प्रचलित विषयांवर मी अमुक अमुक प्रकारचें धोरण स्वीकारीन असें जाहीर केल्यावरच निवडतात हें जरी खरें असलें तरी अशा निवडणुकीनें मतदार ज्याच्या त्याच्या विषयांसंबंधींच्या धोरणाचीच फक्त पसंती दाखवितात असें नसून, साधारणतः तो मनुष्य त्यांच्या विश्वासास पात्र आहे असेंही जाहीर करितात. त्याची निवड केल्यास तो मतदारांच्या कल्याणाकरितां झटेल अशी मतदारांची खात्री असते. त्या निवडणुकीच्या वेळेस तरी निदान हा विश्वास इतका दृढ असतो कीं तो ज्या मुदतीकरितां निवडून दिलेला असतो तेवढ्या ठरलेल्या मुदतींत त्यांच्या वतीनें त्यानें कांहींही करावें अशीही मुभा ते मतदार त्या प्रतिनिधीला देतात. देशकल्याणाच्या बाबतींत, जर त्याच्या प्रामाणिक मताचा व

त्याला निवडून देणाऱ्या मतदारांच्या मताचा विरोध आला तर मतदारांना संमत नाहीं, असा देशहिताचा मार्गही आक्रमण्यास त्याला पूर्ण मोकळीक त्या ठरलेल्या मुदतीपुरती प्रातिनिधिक राज्यसंस्थांच्या नियमांप्रमाणें ठेविलेली आहे. व मतदारांच्या संमती-विरुद्ध अशा गोष्टी प्रत्येक प्रातिनिधिक संस्थेच्या इतिहासांत पदोपदीं पहावयाला सांपडतात. बहुतेक प्रत्येक नवीन निवडणुकींत आपल्याला असें आढळून येतें कीं, पूर्वींच्याच निवडणुकींत जो पक्ष बऱ्याचशा बहुमतानें निवडून आलेला असतो, तो या नवीन निवडणुकींत पराजित झालेला असतो. आणि याचें कारण पहिल्या निवडणुकींत ज्या पक्षाचे हातांत अधिकारसूत्रें होतीं, तो पक्ष मतदारांचे मताविरुद्ध वागला असला पाहिजे किंवा वागत असला पाहिजे, याशिवाय दुसरें काय असणार ?

याचें आणखी एक ढळढळीत उदाहरण इंग्रजी पार्लमेंटच्या इतिहासांत आढळून येतें. हें उदाहरण म्हणजे इ. स. १७१६ त त्या पार्लमेंटनें पास केलेला, एका पार्लमेंटचें आयुष्य तीन वर्षांपासून सात वर्षांपर्यंत वाढविणारा कायदा, होय. हा इंग्रजी इतिहासांत Septennial act म्हणून प्रसिद्ध आहे. या बाबतींत विशेष गोष्ट अशी कीं, हा कायदा ज्या पार्लमेंटनें पास केला त्या पार्लमेंटनें तो स्वतःसच लागू करून घेतला ! म्हणजे तीन वर्षांपुरतें निवडलेलें पार्लमेंट मतदारांच्या संमतीशिवाय सात वर्षें अधिकारारूढ राहिलें ! या रीतीनें ब्रिटिश पार्लमेंटची, व आजच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे हाउस् ऑफ कॉमन्स या

केवळ प्रतिनिधिसभेची—कारण आज पार्लमेंटचे दुसरे जे दोन कायदेशीर भाग राजा व हाउस् ऑफ् लॉर्डस् ते नामशेषच आहेत—कांहीं एका ठरलेल्या मुदतींतील कर्तुमकर्तुमन्यथाकर्तुं शक्ति दिसून येते.

१९११ च्या पार्लमेंटच्या कायद्यामध्यें तर हाउस ऑफ् कॉमन्स एकदां निवडून दिल्यानंतर पुनः तें मोडेपर्यंत पूर्ण मुखत्यार आहे अशा अर्थाचें कलमच घातलें आहे!

प्रातिनिधिक संस्थांचीं अशीं तत्त्वें असल्यामुळें व हुषार, विद्वान्, स्वाभिमानी, प्रामाणिक व देशहितदक्ष अशा लोकांस याच गोष्टीनें पुढें येण्यास उत्साह असल्यामुळें प्रतिनिधीला प्रत्येक बाबतींत मतदाराचा बंदा गुलाम, केवळ प्रत्येक बाबतींत त्याचेच शब्द उच्चारणारा ग्रामोफोन, व त्यांनीं कळ दाबतांच हात उचलणारें कळसूत्री बाहुलें करून ठेवणें कधींही रास्त होणार नाहीं. कोठल्याही राज्यसंस्थेंतील स्थैर्याच्या दृष्टीनेंही प्रतिनिधीला मतदारांच्या प्रत्येक लहरीबरोबर हेलकावे खात ठेवणें बरोबर होणार नाहीं. हें जरी खरें असलें तरी एवढ्यानेंच कांहीं मतदारांनीं निराश होऊन जाण्याचें कारण नाहीं. एलिहरूट नांवाचे एक अमेरिकन ग्रंथकार आपल्या 'सिटिझन्स पार्ट इन गव्हर्मेंट' या पुस्तकांत म्हणतात, एकाद्या मोठ्या जनसमूहामध्यें दिसून येणारे अनुभव, व्यवहारचातुर्य, सूचक कल्पनांचें वैपुल्य व चिकित्सक बुद्धीची परिणति या गुणांचें एकीकरण कोणत्याही एका मनुष्याच्या—मग तो मनुष्य कितीही हुशार अगर सुशिक्षित असो—इतकें आटोक्याबाहेरचें असतें कीं, तो, त्या जनसमूहाला शिक्षण

दऊन त्यांचा मार्गदर्शी होण्याचा जों जों प्रयत्न करूं लागेल तों तों हळूंहळूं त्याच्या विचारांचें ग्रहण करून त्यांचेंच शिष्यत्व पत्करण्यास तो प्रवृत्त होईल. या योगानें ज्यामुळें एका मनुष्याच्या दुसऱ्यावरील वजनाचा नाश होतो अशा, शहाणपणा व सद्गुण या बाबतींतील स्वयंमन्य श्रेष्ठत्वाचें प्रदर्शन करण्याच्या घातुक प्रवृत्तीपासून त्याचा बचाव होतो. अशा रीतीनें लोकमताची छाप, मतांची याचना करण्यास येणाऱ्या उमेदवारांवर, प्रतिनिधींवर, व फिरून उमेदवारीचा प्रसंग डोळ्यांपुढें असणाऱ्यांवर पडल्याशिवाय कधींही रहावयाची नाहीं.

प्रतिनिधीनें राष्ट्राचा प्रतिनिधि या नात्यानें काम करावयाचें का तो केवळ ज्या भागातर्फे निवडला गेला असेल त्या भागाचाच प्रतिनिधि ? **लॉवेल** यानें या प्रश्नाची अशी मांडणी केली आहे— 'आधुनिक कायदे-मंडळ हें राष्ट्रमतनिदर्शक आहे तें, जरी त्याचा प्रत्येक सभासद निरनिराळ्या भागांतून निवडला जातो तरी तो एक राष्ट्रीय अधिकारी असतो म्हणून, कीं प्रत्येक सभासद हा निरनिराळ्या भागाचाच प्रतिनिधि, व ते समवायिक रीतीनें राष्ट्रीय-मत-निदर्शक होतात म्हणून ? प्रतिनिधींच्या विचारांत आधीं राष्ट्राला प्राधान्य मिळावयाचें कां आधीं ज्या देशविभागांतून तो निवडला गेला असेल त्या देशविभागाला ? या प्रश्नाचें निर्णयात्मक उत्तर देणें त्यांचे मतें अशक्य आहे. एक गोष्ट खरी कीं, इंग्लंडमध्यें राष्ट्रीय प्रतिनिधित्वावर विशेष भर दिला जातो, तर अमेरिकेंत स्थानिक प्रतिनिधित्वाचें विशेष महत्त्व आहे. अर्थात् अशा रीतीनें भेद करणें फारसें शक्य नसतें. तरी पण इंग्लंडमध्यें प्रतिनिधि हा पार्लमेंट-

मध्यें गेल्यावरही पक्ष-संघटनेनें बांधला गेला असल्याकारणानें व पक्ष-घटना अधिक राष्ट्रीय असल्यामुळें प्रतिनिधि हा स्थानिक जबाबदारींतून बराच अधिक—अमेरिकेंत तो असतो त्याहून अधिक—मोकळा असतो. अमेरिकेंतील पक्षभेदाचें कार्य निवडणुकी-बरोबर संपतें. पुढील राज्यघटना पक्षभेदाच्या पायावर रच-लेली नाहीं. यामुळें इंग्लंडमधील पक्षभेदाला जें कायदेशीर स्वरूप प्राप्त झालें आहे तसें अमेरिकेंतील पक्षभेदाला नाहीं. असो. यामुळें अमेरिकेंत प्रतिनिधीला स्थानिक जबाबदारीकडे लक्ष देण्यास अधिक सवड सांपडते. अमेरिकेंत दुसऱ्या एका दृष्टीनेंही प्रतिनिधि निवळ राष्ट्रीय होऊं शकत नाहीं. कारण सबंध अमेरिकेची राज्यसंस्था ही पुष्कळ संस्थानांची मिळून संयुक्त राज्यसंस्था आहे. निरनिराळ्या संस्थानांचें स्वातंत्र्य व संयुक्त राज्यसंस्थेचे हक्क यांत सामान्यतः कांहीं तरी, विरोध हा असणारच. याच विरोधावर मूळ सुरवातीस तरी हल्लींचे जे दोन पक्ष अमेरिकेंत आहेत त्यांची उभारणी झालेली होती. हल्लीं हा विरोध कमी होत आहे. संयुक्त संस्थानांच्या राष्ट्रीय तत्त्वावर विशेष भर दिला जात आहे; निरनिराळ्या संस्थानांच्या व्यक्तिस्वातंत्र्यावर नव्हे.

अशा तऱ्हेचा विरोध, निरनिराळे, स्वतंत्र राजकीय संस्थांनीं शासित असे प्रांत फक्त कांहीं राजकीय बाबतीपुरतेच स्वसं-रक्षणाकरितां संयुक्त होतात, अशा राष्ट्रांत उत्पन्न होणें साहाजिक आहे. अमेरिकेंतील निरनिराळीं संस्थानें स्वतःचा स्वतंत्र राज्यका-रभार आधींच चालवीत होतीं व नंतर सर्वांचें संरक्षण परशत्रूपासून

करणें अधिक सोयीचें जावें म्हणून आपखुषीनें त्यांनीं आपली संयुक्त राज्यसंस्था तेवढ्याच बाबीपुरती बनविली.

हिंदुस्थानापुढेंही आज भिन्न भिन्न स्वतंत्र प्रांतिक संस्थानांची एक संयुक्त राष्ट्रीय राज्यघटना हेंच ध्येय आहे. हें साध्य झाल्यावर पुढें प्रतिनिधींची जबाबदारी अधिक राष्ट्रीय राहते का अधिक स्थानिक राहाते तें दिसेलच.

हा प्रश्न हिंदुस्थानासारख्या, नवीन राजकीय संस्था अमलांत आणणाऱ्या राष्ट्रास, फार महत्त्वाचा आहे. अमेरिका काय किंवा इंग्लंड काय, राष्ट्रीय ऐक्याची भावना त्यांच्यांत आधींच जागृत झाली आहे. त्यांना हा प्रश्न गौणच असणार.

प्रतिनिधीचें वेतन.

प्रतिनिधी हे साधारण समाजांतूनच विभागशः निवडावयाचे असल्यामुळें त्यांच्या उपजीविकेचा प्रश्न शिल्लक राहतोच. हा प्रश्न तीन रीतींनीं सोडवितां येणें शक्य आहे. प्रतिनिधी हा एक तर उपजीविकेकरितां मतदारांवर अवलंबून न राहण्याइतका श्रीमंत असला पाहिजे. व पहिले पहिले पार्लमेंटचे सभासद तसे असतही. त्यामुळें पार्लमेंटच्या सभासदांना, मतदारांना कांहींच द्यावें लागत नसे. हे सभासद प्रथम प्रथम जरी सुखवस्तु घराण्यांतले असत व म्हणून त्यांना उपजीविकेचें अन्य साधन लागत नसे तरी १८३२ च्या सुधारणेनंतर जे सुखवस्तु अशातऱ्हेनें वरच्या दर्जाचे लोक असत, त्यांना निवडून देण्याला नवीन मताचा हक्क मिळालेले लोक, नाखूष असत. व मतदारांनीं ही उपजीविकेची तरतूद करण्याचा परिपाठ नसल्यामुळें असें झालें कीं, हे सभासद लंडनमध्येंच कांहीं धंदा करून राहूं लागले व लंडनमध्येंच वर्षांतून बरेच दिवस राहावें लागल्यामुळें ते लंडनचे रहिवाशीच बनले व फक्त निवडणुकीच्या वेळींच ते ज्या भागांतर्फे निवडून येण्याची इच्छा करीत त्या भागांचें ते दर्शन घेत. याप्रमाणें ते खरोखर त्या विभागातर्फे बोलण्यास नालायक असत.

अशी स्थिति न व्हावी म्हणून प्रतिनिधीच्या उपजीविकेची तरतूद मतदारांनीं केली पाहिजे. पण असें झालें म्हणजे प्रतिनिधि हा मतदारांचा केवळ मिंधा होऊन राहातो. प्रतिनिधीला

सरकारांतून पगार देऊन त्याच्या उपजीविकेचा प्रश्न सोडविण्याचा तिसरा उपाय १९११ च्या पार्लमेंटच्या कायद्यानें अमलांत आणिला आहे. यामुळें प्रतिनिधी अधिक राष्ट्रीय होतो, प्रतिनिधिसभा अधिक स्वतंत्र होते, व प्रतिनिधिसभा ठराविक मुदतीच्या आंत मोडून देणें प्रतिनिधींच्या हिताचें असल्यामुळें, शक्य तोंवर अधिकारारूढ पक्षाला उलथून पाडण्याचे प्रयत्न कमी होतात. पण एवढ्यानें प्रतिनिधीच्या जबाबदारीचा विचार संपला नाहीं. तो स्वतःच्या सदसद्विवेकबुद्धीला जबाबदार असतो, तो त्याला निवडून देणाऱ्यांना जबाबदार असतो, तो ज्या विभागांतून निवडला गेला असतो त्या विभागाचें कल्याण साधण्याची जबाबदारी त्यावर असते, राष्ट्रीय हिताची जबाबदारीही त्याच्यावर असते, व या सगळ्याहून अधिक हें सगळें साधण्याचें मुख्य साधन जें प्रतिनिधित्व तेंच त्याला मिळावें व त्याच्याकडे कायम राहावें म्हणून तो त्याच्या पक्षास सर्वस्वी जबाबदार असतो. त्या जबाबदारीपुढें दुसरी कसलीही जबाबदारी तो ओळखूं शकत नाहीं.

किंवा हेंच निराळ्या शब्दांत सांगावयाचें म्हणजे, या बाकीच्या जबाबदाऱ्यांतून त्यानें कसें मुक्त व्हावें हें त्याच्यासाठीं त्याचा पक्षच ठरवितो. त्याच्या पक्षानें पुकारलेल्या मतांनीं व धोरणानें तो पूर्णपणें बांधला गेलेला असतो. पक्षांचे विवेचन पुढील भागावर सोंपवून प्रतिनिधीबद्दलचा हा भाग येथेंच पूर्ण करूं.

---

४ पक्षभेद.

अलीकडील लोकशाहींत जर कोणताही अत्यंत महत्त्वाचा व बिकट प्रश्न असेल तर तो हा पक्षभेदाचा आहे. पक्षभेद चांगला का वाईट, हल्लीं परिणत झालेल्या पक्षभेदांचा इतिहास, त्यांचा उगम केव्हां झाला, कां झाला त्यांचें त्या वेळेचें कार्य, पुढें त्याची वाढ कसकशी होत गेली, आज त्यांची स्थिति काय आहे, आज त्यांच्यापासून काय कार्य घडतें, त्यांच्या योगानें तोटे काय होतात व आज जी ही एक पक्षभेदाची यांत्रिक सर्वभक्षक शक्ति होऊन बसली आहे, यावर आधुनिक लोकशाहीवरील बरेंचसें वाङ्मय खर्ची पडलें आहे. या प्रश्नाची तीव्रता इंग्लंड किंवा इतर युरोपीयन राष्ट्रांपेक्षां अमेरिकन संयुक्त संस्थानांत विशेष भासूं लागली आहे.

आजच्या स्थितींत, मागचे भागाचे शेवटीं म्हटल्याप्रमाणें निवडणुकीसाठीं उभे राहिल्यानें, उमेदवार निवडून आल्यानंतर, प्रतिनिधी हे पक्षभेदाच्या या यांत्रिक घटनेनें पूर्णपणें बांधले गेले असतात. आज अमेरिका व इंग्लंड या देशांतून मुख्यतः दोन पक्षांच्या द्वारां प्रतिनिधीवर हा दाब राखिला जातो.

इंग्लंडमधील हे दोन पक्ष म्हणजे कॉंझर्व्हेटिव्ह व लिबरल हे होत. यांपैकीं पाहिला स्थायीभावाचा निदर्शक असा संरक्षक पक्ष व दुसरा उदार मतवादी प्रगतिपर पक्ष होय.– येथें या दोन पक्षांस कांहीं दिवसांपूर्वीं लावीत असलेलीं नांवें

सोयीसाठीं वापरलीं आहेत. हल्लीं या दोन पक्षांत, ते वापरतात त्या नांवांत, व त्यांनीं प्रतिपादिलेल्या मतांत झपाट्यानें क्रांति होत आहे. उदाहरणार्थ, आयर्लंडसंबंधींच्या धोरणांतील भिन्नत्वाप्रमाणें युनियनिस्ट्स् व होमरूलर्स असें पक्ष कांहीं दिवसांपूर्वीं होते. आज मजूरपक्षाच्या वाढीमुळें या पक्षांची पुनः नवीन रचना होणार किंवा कसें असें वाटूं लागलें आहे. असे त्या त्या वेळांच्या महत्त्वाच्या प्रश्नांप्रमाणें निरनिराळे पक्ष जरी अस्तित्वांत आले तरी इंग्लंडमधील एकंदर राज्यघटनेस अनुसरून मुख्य दोन पक्षांनाच प्राधान्य देण्यांत येतें. किंवा कारणपरत्वें तेवढ्यापुरता जरी या पक्षांचा निरनिराळ्या नांवांनीं बोध होत असला तरी त्यांचें मूळचें अस्तित्व तसेंच कायम असतें असें म्हटलें तरी चालेल. निदान कॉन्झर्व्हेटिव्ह व लिबरल या नांवांसंबंधानें तरी अशी स्थिति झालेली दिसून येईल. कॉन्झर्व्हेटिव्ह पक्षाला अलीकडच्या त्यांच्या इतिहासांत त्यांच्या त्या त्या वेळच्या इष्ट हेतूप्रमाणें कधीं इंपीरियालिस्ट्स् साम्राज्यवादी तर कधीं यूनियनिस्ट्स्—म्हणजे आयर्लंडला स्वातंत्र्य देऊन विभक्त होऊं देण्याच्या विरुद्ध असणारे अशीं निरनिराळीं नांवें दिलीं गेलीं आहेत. लिबरल पक्षही वसाहतींच्या स्वातंत्र्याचा कैवारी व आयर्लंडला स्वराज्य देण्यास तयार म्हणून त्याला तद्विरुद्ध नांवांनीं संबोधित असत, पण अजून तरी या दोन्ही पक्षांचीं साधारण १८३२ सालापासून चालत आलेलीं नांवें—लिबरल व कॉन्झर्व्हेटिव्ह वापरण्यास हरकत नाहीं. पण येथें हें लक्षांत ठेवावें कीं, हे दोन्ही पक्ष

याच नांवांनीं इतकीं वर्षें अस्तित्वांत आहेत येवढ्यावरून त्या पक्षांतील लोकही कायम असतात असें नव्हे. एका पक्षांतून दुसऱ्या पक्षांत परिवर्तनें होतातच. पण मूळ जी पक्षसंघटना असते ती कायम असते व तीच पक्षांचें अखंड अस्तित्व कायम राखिते.

या पक्षांची संघटना व त्यांचें महत्त्व व त्यांची काम करण्याची रीति या गोष्टी इतक्या आज पूर्णतेस पोंचल्या आहेत कीं दोन देशांत तरी या दोन पक्षांच्या—किंवा आणखी एखाद्या पक्षानें तत्त्वांच्या बळावर डोकें वर काढिलें तर त्या—द्वारांच जे निवडणुकीस उभे राहतील त्यांनाच निवडून येण्याचा कांहीं तरी संभव असतो. उमेदवार पुढें येऊन आपलीं मतें प्रतिपादन करून नंतर त्याचीं ज्या प्रकारचीं मतें असतील त्याप्रमाणें तो या किंवा त्या पक्षाचा गणला जातो अशी जर कोणीं या पक्षांसंबंधीं समजूत करून घेतली असेल तर ती चुकीची आहे. पक्षयंत्र तयार असतें. प्रत्येक निवडणुकीच्या क्षेत्रांत तेथील पक्षाची कचेरी असते. त्याचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सेक्रेटरी व सभासद वर्षानुवर्षें हें काम करून तरबेज झालेले असतात. ते उमेदवार पुढें येईपर्यंत वाट पाहात नाहींत किंवा आधीं परीक्षा घेतल्याशिवाय त्याला पुढेंच येऊं देत नाहींत असें म्हटलें तरी चालेल. **बीकन्सफील्ड ऊर्फ डिसूरायली** या कादंबरीकारानें—हा दोन वेळ इंग्लंडचा मुख्य प्रधानही होता—आपल्या 'कोनिंग्सबाय' नामक कादंबरींत या विभाग कमिटीच्या प्रेसिडेंट, सेक्रेटरी वगैरेंची जी प्रतिनिधी निवडण्याची रीति आहे तिचें डार्लफर्ड हें कल्पित गांव उदाहरणार्थ

घेऊन फार चांगलें वर्णन केलें आहे. या डार्लफर्डचे हे पुढारी लिबरल पक्षाचे होते. निवडणुकीची वेळ जसजशी जवळ येत चालली तसतसें यांना आपल्या विभागातर्फे कोण लिबरल उभा करावा म्हणून काळजी पडली. म्हणून हे लोक लंडनला गेले व तेथील लिबरलपक्षाच्या मुख्य सभेच्या ठिकाणीं डार्लफर्डतर्फे उमेदवार म्हणून येऊं इच्छिणाऱ्या उमेदवारांची परीक्षा घेऊं लागले. तों काय; त्यांनां सर्वगुणसंपन्न असा मनुष्यच मिळेना. ज्याचीं तत्त्वें समजतील असा मनुष्य मिळाला म्हणजे कमिटी सांगेल त्याबरहुकूम वागण्यास तयार होई तर तो कमिटीच्या फंडाला पैसे देण्याला समर्थ नसे. बरें, कमिटीला मदत करायला कबूल व समर्थ असा मनुष्य पुढें आलाच तर तो कमिटीच्या कह्यांत राहीलच अशी खात्री देतां येत नसे. बरें, असा या दोन्हींचा कपिलाषष्ठीचा योग जुळून आलाच तर तो मनुष्य प्रतिनिधी या नात्यानें मतदारांना पटेल कीं नाहीं याबद्दल शंका उत्पन्न होई. असो. अशा रीतीनें एक आहे तिथें दुसरें नाहीं अशा स्थितींत उमेदवारांची परीक्षा घेतां घेतां पायपिटी करून व फराळाचीं दुकानें पालथीं घालून हे लोक जेरीस आले इत्यादि इत्यादि.

अशी सामान्य प्रतिनिधींच्या बाबतींत इंग्लंड व अमेरिका या दोन्ही देशांतील स्थिति आहे. तरी या दोन्ही देशांतील पक्षांवर हुकमत चालविण्याच्या बाबतींत फार फरक आहे. अमेरिकेंत हा अधिकार केवळ बेजबाब पक्षांच्या कचेऱ्यांच्या अधिकाऱ्यां-कडे असतो. लहानापासून थोरांपर्यंत, प्रत्येक संस्थानच्या, अत्यंत हीन दर्जाच्या—तेथें कोर्टाचे बेलिफ सुद्धां निवडले

जातात, बहुमतानें निवडल्या जाणाऱ्या अधिकाऱ्यापासून तों तहत सर्व अमेरिकन संस्थानांचा मुख्य अधिकारी जो प्रेसिडेंट ज्याला इंग्लंडमधील राजापेक्षांही अंमलबजावणी खात्यांत अधिक महत्व आहे, अशा अधिकाऱ्यापर्यंत सर्व, या क्षुद्र आपमतलबी व बेजबाबदार अधिकाऱ्याच्या शब्दावर अवलंबून असतात. या पक्षांची वाढ आजच्या इतकी प्रबल झाली नव्हती व अशा काळींही आपल्याच पक्षांतील लायक मनुष्याला बाजूस सारून प्रसिडेंट होण्यास नालायक अशा मनुष्याची फक्त पक्ष–संघटने-च्या जोरावर निवड झाल्याचीं उदाहरणें अमेरिकेच्या इतिहासांत आहेत. आणि याला कारण काय तर जो सर्वस्वी लायक मनुष्य त्यानें या सुलतानी पक्ष-संस्थेची लहर जेवढी संभाळण्यास हवी होती तेवढी संभाळली नाहीं. अशा रीतीनें अमेरिकेंत प्रत्यक्ष अध्यक्षाच्या निवडणुकींतही ही पक्षघटना ढवळाढवळ करूं शकते.

अशी स्थिति इंग्लंडमधील पक्ष-संस्थांच्या संघटनेमुळें सहसा येत नाहीं. इंग्लंडमधील लोकमतानुबंधी अशी झालेली अत्यंत महत्त्वाची जागा म्हणजे मुख्य प्रधानाची होय. पण मुख्य प्रधान होण्याच्या लायकीला जो मनुष्य पोंचलेला असतो तोच त्यावेळीं आपल्या पक्षाच्या मध्यवर्ती संस्थेचा अध्यक्ष असतो. म्हणून निवडणु-कीच्या वेळीं जीं तत्त्वें व जीं मतें त्या पक्षाचीं असें समजावयाचें तीं तत्त्वें व तीं मतें पुकारण्याचा अधिकार तरी त्याचेकडे असतो. निदान तो व त्याचे वरच्या दर्जाचे कांहीं अनुयायी तरी या पक्षांच्या सुलतानी सत्तेपासून मुक्त असतात.

अशा तऱ्हेनें जुलूम चालविणाऱ्या या पक्षांची उभारणी तरी कांहीं तत्त्वांवर केलेली असते, असें म्हणावें तर तसेंही नाहीं. ब्रिटिश पक्षांचा इतिहास या बाबतींत फार मनोरंजक आहे. या पक्षांतील विरोध जेव्हां विकोपास गेले त्या वेळीं म्हणजे पहिल्या चार्लसचे कारकीर्दींत या पक्षांस कॅव्हॅलिअर्स व राउंडहेड्स् अशीं नांवें प्राप्त झालीं. यांपैकीं पहिले राजपक्षीय व रोमन कॅथॉलिक धर्माभिमानी, व दुसरे प्रजापक्षीय व प्रॉटेस्टंट धर्मानुयायी. यांनाच पुढें टोरी व व्हिग अशीं नांवें प्राप्त झालीं. पण पुढें असें झालें कीं, स्टुअर्ट वंशांतील दुसऱ्या **जेम्स**ला हाकून लावण्यांत ज्यांनीं महत्त्वाचा भाग घेतला होता ते व्हिग त्यांनींच गादीवर बसविलेल्या तिसऱ्या **वुइल्यम**चे मित्र बनले. व टोरी हे त्याचेच विरोधी झाले. अशा रीतीनें जे इतके दिवस प्रजेच्या हक्कांचे पुरस्कर्ते म्हणून गणले जात असत ते आतां राजाचे कैवारी झाले.

हा फरक घडून आल्यावर कांहीं दिवसांनीं, व्हिग हे राजपक्षाचे कैवारी व टोरी हे त्या वेळच्या राजपक्षाचे विरोधी ही आठवण हळूहळू बुजली. याचें एक मुख्य कारण म्हणजे व्हिग सरदारांचा सासूपणा तिसऱ्या जॉर्जच्या कारकीर्दीपर्यंत अगदीं असह्य कोटीपर्यंत वाढल्यामुळें तिसऱ्या जॉर्ज राजानें टोरी सरदारांना जवळ करून त्यांचें सामर्थ्य वाढविण्याला मदत केली. व जुन्या प्रजापक्षीयांनीं म्हणजे व्हिग लोकांनीं पुनः प्रजेचीं गाऱ्हाणीं दूर करण्याची खटपट सुरू केली. वर एके ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें राजकीय मतदारांचा हक्क हा कांहीं एक किमान जमीनधारा देणाऱ्यांसच बरींच वर्षें इंग्लंडांत होता.

असे जमीनधाऱ्याच्या तत्त्वावर प्रतिनिधी निवडून देण्याचा अधिकार असलेले गांवचे गांव गडप करून गबर बनलेल्या उमरावांच्या हातांत बरेच प्रतिनिधी निवडण्याचा हक्क केंद्रीभूत झाला, व हाउस् ऑफ् कॉमन्समधील जवळ जवळ एक तृतीयांश प्रतिनिधी केवळ या सरदारांचीं बाहुलीं बनले. ज्या निवडणुकीच्या भागांतील प्रतिनिधी अशा रीतीनें एकाद्या उमरावाच्या केवळ हुकमतींत असत त्या भागांना पॉकेट बॉरोज् म्हणत. अशा पॉकेट बॉरोचें प्रमाण १८३०-३२ सालांपर्यंत फारच वाढलें व दुसऱ्या पक्षीं मँचेस्टरसारखीं जीं नवीन औद्योगिक शहरें त्या वेळीं उत्पन्न झालेलीं होतीं त्यांना त्यांच्या श्रीमंतीच्या व लोकसंख्येच्या प्रमाणांत प्रतिनिधी निवडण्याचा अधिकार नव्हता. १८३२ सालीं, या नवीन शहरांना हा अधिकार देणारा व मतदारींच्या बाबतींत महत्त्वाचा फेरफार करणारा 'रिफॉर्म ॲक्ट' पास झाला. पूर्वीं मुख्यतः जमीनधारा भरणाऱ्यांना मतदानाचा हक्क असे; तो आतां जमीन कौलानें करणारासही, त्याचें शेतींचें उत्पन्न ५० पौंडांपेक्षां अधिक असेल तर देण्यांत आला. शहरांत ज्यांच्या घराचें भाडें १० पौंड तरी येईल अशा घरवाल्यांसही हा हक्क मिळाला. ज्या प्रतिनिधींच्या जागा पूर्वीं केवळ एकाद्या श्रीमंत जहागिरदाराच्या हातांत असत त्या कमी करण्यांत आल्या. नवीन शहरांस प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार योग्य प्रमाणांत देण्यांत आला. अशा रीतीनें मतदारीच्या लायकींत व वांटणींत हा एवढा महत्त्वाचा व तात्त्विक फरक झाल्यामुळें सर्वत्र बरीच खळबळ उडून गेली. टोरी पक्षानें

आतां नवीन नांव घेतलें. ते स्वतःला कॉन्झर्व्हेटिव्ह—संरक्षक म्हणवूं लागले. वर सांगितल्याप्रमाणें हा पक्ष जरी पुनः राजाच्या कृपाछत्राखालीं आला होता, तरी नेपोलियनच्या वेळच्या लढायांमुळें झालेल्या विचारक्रांतीच्या काळांत जनतेला खूष करण्याकरितां कांहीं कांहीं सुधारणांसही त्यांनीं हातभार लावला. पण अशा सुधारणा अमलांत आणतांना लोकप्रियतेच्या भरीस भरल्यामुळें त्यांना आपल्या संरक्षक तत्त्वाचें मुळींच भान राहिलें नाहीं. इंग्लिश चर्च या विशिष्ट धर्मपंथाचे, उमराव सभेचे व राजाचे हितसंबंध रक्षण करण्याचें या पक्षाचें तत्त्व १८२९ सालच्या आयरिश् डिसेस्टॅब्लिश्मेंट कायद्याचे वेळीं व १८३२ च्या रिफॉर्म ॲक्टाचे वेळीं हा पक्ष पार विसरून गेला. १८२९ च्या कायद्यानें यांनीं इंग्लिश चर्चचें महत्त्व कमी होऊं दिलें व दुसऱ्या कायद्यानें एका धडाक्यासरशी उमराव व राजा या दोघांचेंही महत्त्व कमी झालें. कोनिंग्सबाय या कादंबरींत १८३४ मधील कॉंझर्व्हेटिव्ह पक्षाच्या मुख्य जाहीरनाम्या(Tam worth main fests)संबंधानें लिहितांना **बीकन्सफील्ड** म्हणतो—त्यावेळीं कांझर्व्हेटिव्ह 'संरक्षक' तत्त्वांसंबंधीं बरीच ओरड चालली होती; पण जेथें तेथें 'तुम्ही संरक्षण कशाचें करणार?' हा प्रश्न आडवा येत असे. राजाच्या अधिकारांचें? हो, पण ते अधिकार उपयोगांत आणले जात नाहींत तोंपर्यंत; उमराव सभेच्या स्वातंत्र्याचें? हो, पण तेंही ती स्वतंत्रेनें वागत नाहीं त्यापुरतेंच! संस्थापित धर्माचें? हो, पण त्याची व्यवस्था सामान्य लोकांच्या कमिशननें पाहिली पाहिजे! थोडक्य.त सांगावयाचें म्हणजे सर्व

संस्थापित गोष्टींचें संरक्षण करावयाचें; मात्र त्या गोष्टींत शब्दांव्यतिरिक्त महत्त्वाचें असें कांहींच असूं नये. याच कादंबरींत आणखी एके ठिकाणीं म्हटलें आहे. 'कॉंझर्वेटिव्ह पक्ष म्हणजे काय तर टोरी माणसें व व्हिग मतें यांची भेसळ'! या दृष्टीनें विचार करितां अशा तत्त्वाविषयीं अशा उपरोधिक रीतीनें लिहिणारे **डिझरायली** ऊर्फ **बीकन्सफील्ड** साहेब हे स्वतःच १८६७ सालीं याच संरक्षक पक्षाचे पुढारी असतांना कसे वागले याचा इतिहास फार मजेदार आहे. स्वतः लोकांना विशेष उदारतेनें मतदारीचा हक्क देण्याच्या विरुद्ध असलेल्या पक्षाचे धुरीण व मुख्य प्रधान असूनही केवळ राज्यसूत्रें तात्पुरतीं तरी आपल्या हातांतून जाऊं नयेत म्हणून विरोधी उदारमतवादी पक्षानें सुचविलेल्या सर्व उपसूचना मुकाट्यानें मान्य करून तो १८३२ च्या कायद्याहूनही अधिक क्रांतिकारक सुधारणा अमलांत आणणारा कायदा पास होऊं दिला.

असो. या सर्वांचा निष्कर्ष काय कीं, हें जें सगळ्या प्रातिनिधिक संस्थांचें उगमस्थान असें ब्रिटिश पार्लमेंट त्यांतील इतिहासप्रसिद्ध पक्षांतही एका पक्षाचीं तत्त्वेंच प्रसंगीं दुसऱ्यानें उचलावयाचीं. एका तत्त्वाला चिकटून राहावयाचें नाहीं. 'पक्षाचें तत्त्व' या शब्दसमुच्चयाला संज्ञेशिवाय इतर कांहींही अर्थ नाहीं. अशा तऱ्हेची स्थिति आहे.

ऑस्ट्रो गॉस्कि म्हणतो कीं, कॉंझर्व्हेटिझम्, लिबरॅलिझम् हीं मुळीं तत्त्वेंच नव्हत. हे शब्द फक्त विचारांच्या दिशा दाखवितात.

मॅक्लॉक्लिन हा अमेरिकक लेखन, कोर्ट्स् कॉन्स्टिट्यूशन्स अॅण्ड पार्टीज् या आपल्या पुस्तकांत पक्षांचा आणि तत्त्वांचा कांहीं संबंध नसतो हें दाखविण्याकरितां खालीलप्रमाणें लिहितो.

आपल्याला, पुनः पुनः इंग्लंडमध्यें एखादा पक्ष तत्त्वांचा शोध करीत आहे असा हास्यास्पद देखावा पाहाण्यास सांपडतो. आपणही आपल्याशींच अगदीं सहज असा प्रश्न करितों कीं, कॉंझर्व्हेटिव पक्षानें किंवा लिबरल पक्षानें अधिकारारूढ होण्यासाठीं कोठलीं तत्त्वें पुढें करावीं ! आपल्याला पुष्कळ वेळेला असेंही आढळून येतें कीं, अधिकारारूढ पक्ष त्याच्या प्रतिपक्षाचीं तत्त्वें उचलून धरितो आणि त्याच तत्त्वांचा पुरस्कार करून, अधिकारारूढ होऊं पाहाणाऱ्या प्रतिपक्षाच्या रागाच्या ओरडाओरडींत, त्या कल्पनांचें कृतींत रूपांतरही करून टाकतो.

पुढें एके ठिकाणीं त्यानें असें म्हटलें आहे. (अमेरिकेंतील पक्षांचीं नांवें डेमोक्रॅटिक व रिपब्लिक अशीं आहेत.) "आपण ज्यावेळीं, डेमोक्रॅटिक पक्ष निवडणुकीच्या वेळीं कोठल्या प्रश्नावर मत द्यावें याचा विचार करितो आहे, असें म्हणतों त्यावेळीं आपण असेंच गृहीत धरीत नाहीं काय कीं, पक्षाची घटना व पक्षाचें अस्तित्व यांचा एकाद्या तत्त्वसमूहाशीं अगर विशिष्ट कायदे करण्याच्या आशेशीं अगर राजकीय आकांक्षांशीं कांहींही संबंध नाहीं ? एकाद्या तत्त्वाची परंपरा त्याच्या तत्त्वांहून त्याच्या गुणधर्मांवरून ठरविणें अधिक सोपें आहे.

अशा रीतीनें आज तरी या दोन कायमच्या पक्षांच्या ओढाताणीवर प्रातिनिधिसत्ताक राज्यपद्धति चालू आहे. त्या पक्षांना

कायमचीं अशीं तत्त्वें नाहींत. बर्कनें केलेली जुनी पक्षांची व्याख्या, ‘ कांहीं विशिष्ट सर्वसंमत तत्त्वांवर राष्ट्रहित साधण्यास एकत्र झालेला जनसमूह ’ आज फोल ठरून—ती कधीं काळीं या पक्षांस पूर्णपणें लागू होती कां नाहीं हें संशयात्मकच आहे— **मॅक्लॉक्लिन** यानें केलेली अनिश्चित व्याख्याच (Indefinite definition) खरी ठरूं पाहात आहे. त्याच्या मतें पक्ष म्हणजे ज्याच्यांतील व्याक्ति किंवा संख्या कांहींशा बदलत असतात, ज्यांनीं कांहीं राजकीय कार्य घडवून आणण्यासाठीं किंवा दुसऱ्या कांहीं कारणासाठीं ज्यांना ते शत्रू समजतात अशा कांहीं लोकांना विरोध करण्यासाठीं,—एकोप्यानें काम करण्यास सुरवात केली आहे असा लोकसमूह.’

दुसरें असें कीं, पक्षाला कायमचीं तत्त्वें नाहींत, म्हणून व **ब्राइस**नें अमेरिकन राज्यव्यवस्थेसंबंधीं म्हटल्याप्रमाणें अमेरिकन पक्षसंस्था मतांविषयीं फारच थोडा विचार करितात; पक्षातर्फे होणाऱ्या व्याख्यानांचा हेतु तत्त्वांची व्याख्या करून लोकांची खात्री पटविणें हा नसून केवळ लोकांचें चित्ताकर्षण करून त्यांना आधिकच घोंटाळ्यांत पाडणें, हा असल्यामुळें निवडणुकीचा निकाल तत्त्वांपेक्षां निवडणुकीस जीं माणसें उभीं असतात त्यांच्यावरच विशेष अवलंबून असतो. सामान्य मतदाराला तत्त्वांचा घोंटाळा समजत नाहीं, पण अमका मनुष्य त्याच्यातर्फे कौन्सिलांत जावा किंवा दुसरा जावा हें सहज समजतें. ए. एल्. **लॉवेल** हा आपल्या पब्लिक ओपिनियन ॲण्ड पोलिटिकल गव्हर्मेंट या पुस्तकांत म्हणतो लोक ज्या मुख्य प्रश्नावर निर्णय देतात तो,

जरी त्या निर्णयाचीं कारणें त्यांना कळलीं नाहींत तरी कोणत्या पक्षानें किंवा कोणत्या अध्यक्षानें त्यांच्यावर राज्य करावें या-संबंधीं असतो.

याप्रमाणें या दोन देशांतून जरी ही द्विपक्षसंघटना प्रतिनिधींवर ताबा चालविते तरी निवडणुकींतील जयापजय शेवटीं उमेदवारांच्या लोकांवरील कमीअधिक वजनावरच बराचसा अवलंबून असतो; असें असल्यामुळें ज्या प्रतिनिधींचें अशा रीतीनें लोकांवर वजन पडतें ते अगदींच सामान्य प्रतीचे असणें शक्य नाहीं. असें जर आहे तर हे असले कर्तबगार प्रतिनिधी निदान सगळ्या प्रतिनिधींपैकीं कांहींजण तरी–या द्विपक्ष-संघटनेच्या यंत्राखालींच कां दबून जातात ? यांना स्वतःचीं मतें नाहींत कीं काय ? या प्रतिनिधींपैकीं कोणालाच आपल्या देशांतील एकादा दारूबाजीसारख्या दुर्गुण कायद्याच्या द्वारें घालविण्याची तळमळ लागून राहिली नाहीं काय? कांहीं विशिष्ट तऱ्हेनें आपल्या राष्ट्राची श्रेष्ठता वाढवावी अशी आकांक्षा त्यांच्या मनांत उद्भूत होत नाहीं काय ? कां हीं सर्व मतें, ही सारी तळमळ, या साऱ्या आकांक्षा त्यांना या दोन प्रबळ पक्षांच्याच द्वारें पूर्ण करितां येतात.

यांपैकीं कांहीं आकांक्षा, मतें व इच्छा जरी कोणत्या तरी एका पक्षाच्या द्वारें सफल झाल्या तरी त्यांचे सर्वच बेत त्या पक्षांत राहून सिद्धीस जातात असें नाहीं.

मग या लोकांनीं या पक्षांसच कां चिकटून राहावें ? जर यांना आपलीं कांहीं मतें या तत्त्वहीन अक्षय्य पक्षांवर लादून

आपल्या कांहीं आकांक्षा तरी याच पक्षांच्या द्वाराच पूर्ण करून घेण्यास लागणारी कर्तबगारी आहे तर, त्यांनीं आपले सर्व इष्ट हेतु सफळ करण्याकरितां आपल्याशीं पूर्ण ऐकमत्य असलेल्या लोकांना एकत्र जमवून निराळा पक्षच स्थापून आपल्या मतांचा पुरस्कार कां करूं नये ?

सिज्विक्च्या मतें निरनिराळ्या मतमतांतराचे व निरनिराळ्या हितसंबंधांमुळें बनलेले असे अनेक भिन्न पक्ष होणें, हीच अत्यंत स्वाभाविक अशी गोष्ट आहे. ठरलेल्या मुदतीनंतर पुनः नवीन निवडणूक झालीच पाहिजे. या एका नियमाशिवाय दोन कायमचे पक्ष बनण्यास त्याच्या मतें दुसरें कांहीं एक कारण नाहीं.

कारण उघडच आहे कीं, ज्या मनुष्याला, किंवा दहापांच मनुष्यांना एकाद्या प्रश्नाविषयीं विशेष कळकळ वाटत असेल ते, आपलें मत पुकारून आपल्याभोंवतीं समान मतांचे लोक जमवून त्या मताचे शक्य तेवढे प्रतिनिधी कायदासभेंत पाठवून, तो प्रश्न कायद्याच्या द्वारां सोडविण्याचा प्रयत्न करणारच. किंवा दुसऱ्या रीतीनें एकोप्यानें वागल्यास कांहीं फायदा होतो हे तत्त्व मनांत बिंबून एकोप्यानें वागून कायद्याच्या द्वारा खासगी फायदा करून घेण्याच्या इच्छेनेंही अशा तऱ्हेचे लहान पक्ष होणें साहजिक आहे.

दुसरें असें कीं, व्यक्ति तितक्या प्रकृति या न्यायानें प्रत्येक व्यक्तीगणिक एक निराळेंच मत साधारणतः गृहीत धरण्याला हरकत नाहीं. असें जर आहे, तर ज्यांना ज्यांना मताधिकार आहे त्यांच्या त्यांच्या मताचा राज्यघटनेवर कसा काय परिणाम व्हाव-

याचा ? प्रत्येकजण जर राजकीय बाबतींत माझें अमुक अमुक मत आहे असें सांगावयाला लागला–तसें सांगण्याइतकें ज्ञान प्रत्येक मतदाराला आहे असें क्षणभर आपण समजूं तरी कोण बजबजपुरी माजेल! एकाची दाद दुसऱ्यास राहाणार नाहीं. याकरितां साधारण कांहीं ठळक व त्यावेळीं अगदीं विचारार्ह अशा प्रश्नांवर त्यांचें साधारण एकमत आहे असे लोक एकत्र होण्यांतच कांहीं सोय आहे असें तात्काळ कळेल. यामुळें वर म्हटल्याप्रमाणें स्वाभाविकतःच अनेक भिन्न पक्ष होतील, हें उघड आहे. तेव्हां **मॅक्लॉक्लिन्** अमेरिकन राज्यघटनेविषयीं म्हणतो त्याप्रमाणें, लोकांना मतदारीचा हक्क तरी राज्यघटनेच्या कायद्यानें दिला, तरी लोकांचीं हीं मतें–या इच्छा–मुख्य राज्यसंस्थेपर्यंत नेऊन पोंचविण्याचें अत्यंत बिकट–लोकशाहींतील अद्यापि न सुटलेलें कोडें-काम स्वेच्छेनें एकत्रित झालेल्या या संस्थांकडे सोंपविण्यांत आलें. म्हणून कांहीं पुढाऱ्यांनीं आपलीं मतें जाहीर करून त्या मतांच्या सर्व लोकांना एकत्रित करण्यानें लोकशाहींतील एक अत्यंत महत्त्वाचें कार्य तडीस जातें.

पण या रीतीनें अनेक पक्ष होण्याची जी सहजप्रवृत्ति ती प्रातिनिधिक संस्थांच्या बाबतींत फार उपयोगाची आहे, एवढेंच सिद्ध झालें. दोन पक्षांनाच लोकांनीं चिकटून राहाणें हें निवडणुकींत जय मिळविण्याच्या आशेचेंच द्योतक आहे किंवा कसें ? व असें जरी असलें तरी या पद्धतींतही विशेष गुण काय आहे हें स्पष्ट होत नाहीं.

हें पाहण्याच्या पूर्वी वर जे अनेक पक्ष सांगितले ते पक्ष, प्रत्येक मतदारानें निरनिराळा प्रतिनिधी सुचविण्याचे व प्रत्येकानें निरानिराळी मतपत्रिका पुढें मांडूं नये म्हणून काय उपाय योजितात तें पाहूं. अनेक पक्ष पुष्कळ देशांतून आहेत. फ्रान्समधील याच्या परिमाणामांचा विचार पुढें येईलच. वर सांगितल्याप्रमाणें प्रत्येक मनुष्याला कांहीं निवडणुकीच्या वेळीं मला अमुक अमुक गोष्टी घडावयाला हव्यात व अमुक अमुक नकोत असें सांगतां येणें शक्य नाहीं. त्याला फक्त एखाद्या प्रश्नावर त्याचें उत्तर आस्तिपक्षी आहे किंवा नास्तिपक्षी आहे, एवढेंच सांगतां येईल. तसेंच प्रतिनिधीच्या बाबतींतही पुढें आलेल्या उमेदवारांपैकीं अमका माझ्या तर्फे प्रतिनिधी होण्यास लायक आहे एवढेंच त्याला मत देऊन मतदाराला सांगतां येईल. असे प्रतिनिधी व लोकांना समजतील-निदान लोकांना न समजतांही पसंती-नापसंती दर्शवितां येईल, अशा प्रश्नमालिका पुढें करण्याचें काम हे पक्ष करितात.

पुष्कळ वेळेला असें होतें कीं, कांहीं प्रश्नावर लोकांचें असें स्पष्ट मत कांहींच नसतें. किंबहुना कांहीं कांहीं प्रश्नच लोकांच्या विचारपंथांत क्वचित् येतात. मनुष्याच्या मनांत त्याला न कळत पुष्कळ कल्पना वास करीत असतात. दुसरा कोणी तरी तीच कल्पना स्पष्ट शब्दांत बोलूं लागला म्हणजे ऐकणाराला आपल्या मनाची साक्ष पटते. तशीच कांहींशी स्थिति या मतांच्या व प्रश्नांच्या बाबतींत घडते. कोणी तरी एकादा प्रश्न उपस्थित केला, त्यावर कांहीं मत प्रतिपादन केलें कीं, लोहचुंबकाला ज्याप्रमाणें लोखंडाचे कण येऊन चिकटतात त्याप्रमाणें समान मताचे लोक

त्याला येऊन मिळतात. कोणी तरी स्पष्ट शब्दांत बोलावयास पाहिजे यासंबंधीं बेजहॉटनें म्हटलें आहे. 'सामान्य मनुष्याला कोणत्या राजकीय अडचणी इतक्या निकराला आल्या आहेत कीं त्यांचा निकाल लावलाच पाहिजे हेंच कळत नाहीं. एवढेंच नव्हे तर पुढें आलेल्या प्रश्नांवर कोणत्या बाजूला मत द्यावें हेंही त्याला समजत नाहीं. सुज्ञ पुढाऱ्यांनीं या बाबतींत त्यांचे मार्गदर्शी होणें हें त्यांचें कर्तव्य आहे.'

असो, हें काम हे पक्ष करितात. मग ते दोनच असोत वा दोहोंहून अधिक असोत.

पक्षसंघटनेची जरूरी **लॉवेलनें** दुसऱ्या एका रीतीनें प्रतिपादिली आहे. तो म्हणतो, हा काल जाहिरातींचा व दलालांचा आहे. कोणताही मनुष्य इतक्या निरनिराळ्या व्यवसायांत गुरफटलेला असतो कीं कोणचीही गोष्ट त्याच्या डोळ्यांपुढें पुनः पुनः आल्याशिवाय त्याचें मन त्या गोष्टीकडे वेधलें जात नाहीं. तसेंच जगाचा व्यवहार फारच विस्तृत प्रमाणावर चालला असल्यामुळें पैशाच्या घडामोडी व भांडवलाची देवघेव निरनिराळ्या दूरदूरच्या देशांतून सोयीनें करण्याकरितां दलालांची जरूरी उत्पन्न झाली. तसेंच राजकीय संस्थांचें क्षेत्रही अत्यंत विस्तृत अशा राष्ट्रभर पसरल्यामुळें तेथेंही या जाहिरातींची व दलालांची आवश्यकता उत्पन्न झाली आहे. कोठलाही निवडणुकीचा उमेदवार मी अमका तमका आहें, मी अशा अशा रीतीनें देशकार्यासाठीं झटलों आहें, माझीं मतें अशीं अशीं आहेत; मी अशा अशा रीतीनें मतदारांचें कल्याण करण्यास झटेन, अशा जाहिराती वरचेवर देत असतो

हें आपण पाहातोंच. पण या जाहिराती देण्याच्या आधीं जी दलाली ठरते ती अशी डोळ्यांपुढें येत नाहीं. प्रतिनिधीचें साध्य, आपल्या मतांप्रमाणें सुधारणा घडवून आणणें व त्याच्या अनुषंगानें जे त्याचे स्वतःचे व स्वकीयांचे फायदे होतील ते, हें असतें. पण हें घडवून आणण्याची मतदारांच्या मतांची शक्ति ती त्याला हवी असते. तेव्हां आतां या मतदारांच्या मतांच्या शक्तीचा, त्यांच्या तर्फेच्या प्रतिनिधित्वाचा व त्याचें जें स्वमताप्रमाणें साधावयाचें साध्य यांचा सौदा ठरावयाचा असतो. व हा सौदा, त्याच्या स्वतःच्या पूर्ण साध्यांतून लोकांचीं मतें विकत घेण्याकरितां कांहीं दलाली वजा करून जें साध्य ठरतें तें, ज्या ज्या लोकांस पटण्यासारखा असेल त्यांच्या माहितीकरितां जाहिरनाम्याच्या रूपानें जाहीर केला जातो. सरळ शब्दांत सांगावयाचें म्हणजे, पक्षाचा पुढारी, किंवा व्यक्तिशः कोणीही उमेदवार जो जाहिरनामा काढतो त्यांत निवळ त्याचींच मतें नसतात, वर लोकमताला अनुसरून आपल्या मतांत थोडाफार फेरफार करून नंतर तो आपला कार्यक्रम ठरवितो. व लोकमताला मान देऊन अशा रीतीनें पालटलेलीं मतें जर बहुजनसमाजाला पटलीं तर हा सौदा ठरतो. लॉवेलनें म्हटलें आहे 'इंग्रजी राज्यधुरीण जे निरनिराळ्या प्रसंगीं लोकमतानुसार वागले ते फारच अल्पांशानें तें लोकमत त्यांनीं बनविलें होतें म्हणून होय. कांहीं अंशीं त्यांचीं मतेंच लोकमतापासून भिन्न नसत; व कांहीं अंशीं ते लोकमताचें अनुकरणच करीत.'

आणखी, ज्यावेळीं एकादा प्रामाणिक पुढारी लोकांतील गुणगुण ऐकून ती स्पष्ट शब्दांत व्यक्त करितो तेव्हां तो त्याच्या सदसद्विवेक बुद्धीला पटतील अशाच सूचना मान्य करितो असें म्हणण्यास हरकत नाहीं.

आणखी पुढें असें म्हटलें आहे कीं, जेव्हां ही दलाली लोकमताला स्पष्ट रूपरेषा देण्याच्या पलीकडे जाते, लोकमताला धाब्यावर बसवून, ज्यावर लोकमत तयार नाहीं अशा सार्वजनिक कृत्यांची अथवा खासगी स्वरूपाच्या कायद्यांची अथवा सरकारी हुद्यांची देवघेव सुरू होते तेव्हां मात्र या दलालीला अगदीं अनिष्ट असें स्वरूप प्राप्त होतें.

एकंदरींत काय कीं पक्षसंघटनेची दलाली करणारे हे राजकीय दलाल हे आजच्या स्थितींत आवश्यक आहेत.

प्रतिनिधिसत्ताक राज्यपद्धतीवर सर **हेन्री मेन** या प्रसिद्ध लेखकानें असा शेरा मारला आहे कीं 'लोकशाहीला कौल लावणाऱ्या भगताची व डेल्फीसारख्या ऑरेकल्ला प्रश्न विचारणाऱ्या ग्रीक लोकांची स्थिति सारखीच असते. ऑरेकल्चा (म्हणजे अंगांत संचार होऊन बोलणाऱ्या भटणीचा) शब्द म्हणजे अगदीं देवाची आकाशवाणी या बाबतींत सर्वांचें ऐकमत्य असे. पण तो जेव्हां बोले तेव्हां तो अगदीं संदिग्ध बोलत असे हें मात्र सर्वजण कबूल करीत.'

निवडणुकीनेंही कोणत्या प्रश्नावर निर्णय दिला हें संदिग्धच राहतें. पण **लॉवेल** म्हणतो त्याप्रमाणें हा घोंटाळा राज-

कीय पक्ष आहेत म्हणून बराच कमी आहे. राजकीय पक्ष, ज्या प्रश्नांवर लोकमतानें निर्णय देणें जरूर आहे, त्या प्रश्नाकडे लोकांचें लक्ष वेधण्याचें अत्यंत महत्त्वाचें काम करितात.

अशा रीतीनें निरनिराळ्या प्रश्नांवर लोकमत एकीकृत करण्याची कामगिरी हे निरनिराळे पक्ष करितात. उदाहरणार्थ मद्यपान थांबविण्याविषयीं उत्सुक असलेल्या लोकांचा तात्काळ एकपक्ष बनेल. हिंदुस्थानाला मद्यपान हितावह आहे कीं नाहीं असा सुटसुटीत प्रश्न हा पक्ष तयार करील. अमका मनुष्य मद्यपाननिषेधाचा कौन्सिलांत पुरस्कार करील असें जाहीर करील व मतदारांना मत देण्यास सोयीचें होईल.

दुसरा एक असाही पक्ष अस्तित्वांत येईल कीं, ज्याला सर्व जातींत सर्रास विवाह व्हावेत असें वाटतें. तिसरा असाही पक्ष निघेल कीं, ज्यांना स्त्रियांना मताधिकार द्यावासा वाटतो. आतां आपण असें समजूं कीं, हे तीन व आणखीही एक दोन अशा पक्षांना आपलीं विवक्षित कार्यें साधावयाचीं आहेत. त्या पक्षानें पुढें आणलेल्या सुधारणांशिवाय बाकीच्यांचें त्याला विशेष कांहीं वाटत नाहीं. म्हणजे तो पक्ष बाकीच्या साऱ्या सुधारणांना सारखाच कबूल किंवा सारखाच विरोधी असेल असें मात्र नाहीं. अशीं पांच निरनिराळ्या गोष्टींचा पुरस्कार करणारीं माणसें पुढें आलीं म्हणजे ज्या लोकांनां या सुधारणांपैकीं दोन तीन चार पसंत असतील त्यांनीं एकालाच मत द्यावें कसें ? असा प्रश्न पुढें येणें शक्य कोटींतलें नाहीं हें सोदाहरण सिद्ध करितां येईल. तरी पण आपण असें समजूं कीं, मतदारानें

आपल्या इच्छांचें तारतम्यभावानें महत्त्व ठरवून एकाला मत दिलें. असें झालें म्हणजे चौघां पांचजणांत साऱ्या मतांची वांटणी होणार. या पांचजणांत ज्याला अधिक मतें मिळालीं असतील तो त्या विभागातर्फे प्रतिनिधि असें समजलें जाणार. पण असा निवडलेला मनुष्य बहुमताचा निदर्शक असेलच असें म्हणतां येणार नाहीं. अशा रीतीनें निवडून आला. पण खरी स्थिति अशी असूं शकेल कीं, तो निवडून येण्यापेक्षां त्याला मत देणाऱ्याशिवाय बाकीच्या मतदारांस बाकीच्या उमेदवारांपैकीं कोणीही पुरवला असता. समजा. जातीजातींतील विवाहांचा पुरस्कार करणाऱ्या अशा निवडून आलेल्या मनुष्यास साधारण सर्व मतांपैकीं $\frac{1}{4}$ मतें मिळालीं असें गृहीत धरलें तरी बाकीचीं $\frac{3}{4}$ मतें त्याच्या विरुद्ध असण्याचा संभव आहे. तेव्हां ही निवडणूक बहुमतनिदर्शक झाली असें म्हणतां येणार नाहीं.

पक्ष जर दोनच असतील तर मात्र अशा रीतीनें बहुमताचा विपर्यास होण्याचा संभव बराच कमी असतो. कारण मतांची विभागणी दोनच प्रकारच्या माणसांत होते. दोनच कार्यक्रम पुढें ठेऊन लोकांनां विचारतां येतें कीं, हा कार्यक्रम पसंत आहे का तो पसंत आहे ? या पक्षाचे हातांत राज्याचीं सूत्रें पुढील कांहीं वर्षे रहावयाचीं का दुसऱ्या पक्षाचे हातांत ? अमका मनुष्य प्रेसिडेंट अगर मुख्य प्रधान व्हावयास पाहिजे कीं दुसरा ? असे सुटसुटीत प्रश्न मतदारसंघाला विचारतां येतात व मतांची वांटणी दोघांतच झाल्यामुळें त्या मतदारसंघापुरतां तरी बहुमताचा विपर्यास झाला असें म्हणतां येत नाहीं. आज ज्या तऱ्हेच्या

बहुमतानें निवडणुकींचा निकाल दिला जातो त्यानें जितक्या प्रमाणांत शक्य आहे तितक्या प्रमाणांत लोकमत खुद्द मध्यवर्ती राजकीय संस्थेपर्यंत पोंचविण्याचें चांगलेंच साधन या द्विपक्ष पद्धतीनें अस्तित्वांत आणलें आहे. निरनिराळे पक्ष होणें हें जरी स्वाभाविक असलें तरी अशा निरनिराळया पक्षांनीं दोनच पक्षांत मिसळून जाणें याला एक तऱ्हेचा स्वेच्छेचा त्याग लागतो. एकाद्या समाजाच्या अंगवळणीं अशा तऱ्हेचा त्याग पडणें हें राजकीय विकासाचें द्योतक आहे असें **लॉवेल**चें मत आहे. देशकल्याणासाठीं आपल्या किरकोळ तक्रारी बाजूला सारून व आपल्या इच्छांचें आकलन करून बऱ्याच जणांस साधारण अशा मतांचा पुरस्कार करण्यास पुढें येणें, हें बरींच वर्षें राजकीय हक्क भोगून अनेक पक्षांचे तोटे व द्विपक्ष पद्धतीचे फायदे लक्षांत आल्यामुळेंच होणें शक्य आहे. **सिज्विक्**च्या मतें दोन पक्षांनींच सर्व राजकीय चळवळींची विभागणी करून घेणें, याचें, ठराविक मुदतीनें होणाऱ्या निवडणुकींत जय मिळवण्याच्या इच्छेशिवाय दुसरें कांहीं कारण नाहीं.

एकदां दोन पक्ष अस्तित्वांत आले म्हणजे त्यांच्यापैकीं कोणालाही जय मिळाला असतां तो पक्ष अधिकारारूढ होतो व त्याला आपल्या इच्छा तडीस नेतां येतात. हेंच नंतर होऊं पाहाणाऱ्या अनेक पक्षांचा पहिल्या दोहोंत अन्तर्भाव होण्याचें कारण असलें पाहिजे. कारण ज्याला आपल्या इच्छेसंबंधानें विशेष कळकळ असेल पण राजकीय दृष्टीनें त्या इच्छेला मूर्त स्वरूप देण्याइतकें मताचें पाठबळ नसेल असा नवीन लोकसमूह, साहाजिकच अस्तित्वांत असलेल्या दोन पक्षांपैकीं जो पक्ष

त्यांच्या नूतन आकांक्षा तत्त्वतः तरी मान्य करील त्याला जाऊन मिळेल. व त्या पक्षाची आपल्या आकांक्षांविषयीं सहानुभूति मिळविण्याचा प्रयत्न करील. व या रीतीनें मताधिक्य कात्रीज करून आपलें धोरण तडीस नेणें, दोन्ही पक्षांशीं प्रथमपासूनच विरोध करून जय मिळविण्यापेक्षां अधिक शक्य आहे. दोघां-शींही विरोध केल्यानें जें शक्य नाहीं तें एकाशीं सहकारिता केल्यानें फारच सुलभतेनें शक्य होतें.

या बाबतींत दुसरी लक्षांत ठेविण्यासारखी गोष्ट अशी कीं, एकदां एकाद्या राजकीय धोरणाविषयीं अतिशय प्रबळ इच्छा अस-लेला एकादा जनसमूह—मग तो त्या संघटित पक्षांपेक्षां संख्या-बलानें कमी कां असेना,— एकाद्या प्रस्थापित पक्षाला जाऊन मिळाला, व त्या पक्षांतच आपल्या मतांचा जोरानें पुरस्कार करूं लागला म्हणजे त्याच्या विरुद्ध जरी प्रथम पुष्कळ लोक असले तरी केवळ इच्छेच्या बळावर तो आपलें कार्य त्या पक्षाच्या द्वाराच साध्य करून घेऊं शकतो. **लॉवेल** म्हणतो, लोकांतील बहुमत जें ठरतें तें संख्याधिक्यावर अवलंबून नसतें तर राजकीय आकांक्षांच्या कळकळीवर अवलंबून असतें. मताधिक्य केवळ संख्येंत असून भागत नाहीं तर तें परिणामकारक असावें लागतें. व असें परिणामकारक लोकमत आपल्या बाजूस मिळविण्याचें काम पुढारी इच्छा बलानें करूं शकतो.

अशा रीतीनें दोन पक्षांच्या घटनेनें, स्वाभाविकतः जे अनेक पक्ष होतात त्यापेक्षां अधिक लोकमतनिदर्शक प्रतिनिधी निवडले

जातात. असें जरी आहे तरी याच पद्धतीच्या अनुषंगानें खालील तोटे उद्भवले आहेत.

१ पक्षभेदानें पूर्वग्रह बळावतात. दोन कायमचे पक्ष देशांत असल्यामुळें कोणाही मनुष्यास, तो ज्या पक्षाच्या वातावरणांत जन्मला असेल व वाढला असेल त्याप्रमाणें त्याला, मतें, तत्त्वें, राजकारण, या काय वस्तु आहेत हें कळण्याच्या पूर्वींच त्यानें पुढील आयुष्यांत घ्यावयाचा पक्ष ठरून जातो.

२ दोन पक्षांच्या योगानें लोकमताचे अगदीं तुटक व अस्वाभाविक असे विभाग होतात. आपण असें पाहातों कीं, जरी कांहीं लोकांचीं मतें एका किंवा दुसऱ्या पक्षाशीं पूर्णपणें निगडित झालेलीं असतात तरी ज्यांना या पक्षाच्या मतांतही बरेंच ग्राह्य आहे, त्या पक्षाचीं तत्त्वेंही कांहीं सारींच टाकाऊ नाहींत असे धड इकडे ना तिकडे, अशा लोकांचीच संख्या कोठल्याही देशांत, फार मोठी असणार. पण ज्या वेळेला त्यांना मत देण्याचा प्रसंग येतो त्या वेळेला एका कोठल्या तरी पक्षाला मत दिलेंच पाहिजे, अशी स्थिति प्राप्त झाली म्हणजे या मोठ्या लोकसमूहापैकीं पुष्कळ लोकांना एका पक्षाला मत देऊन त्यांच्या मनांत नसतांना दुसऱ्या पक्षाला व त्यांच्या कार्यक्रमाला सर्वस्वी विरोध करावा लागतो. अशा रीतीनें दोन्ही पक्षांला विभागणाऱ्या रेषेच्या या बाजूला व त्या बाजूला हेलकावे खाणाऱ्या लोकांना कोठल्या तरी बाजूशीं नसता विरोध स्वीकारावा लागतो.

३ पक्षाच्या पुढारी सभासदांत जे नेमस्त असतील त्यांना दुखवितां येत नाहीं. कारण पक्षाची स्थिरता व महत्त्व हें बरेंचसें

या नेमस्त सभासदांवरच अवलंबून असतें. म्हणून लोकमताचा प्रवाह कितीही जरी जोरानें दुसऱ्या बाजूस ओढीत असला तरी नेमस्त लोकांच्या मताविरुद्ध त्या प्रवाहाबरोबर वाहात जांऊन त्या नेमस्तांना आपल्यांतून जाऊं देऊन पक्षाचें जें नुकसान करून घ्यावयाचें त्यापेक्षां लोकमताला आळा घालणें अधिक श्रेयस्कर असतें.

दुसऱ्या पक्षीं असेंही होण्याचा संभव आहे कीं, जे सभासद अधिक उच्छृंखल असतात त्यांच्या ओढीनेंही पक्ष एकादा पंथ स्वीकारतो पण खरें बहुमत कांहीं त्यांच्या बाजूला नसतें. या दोन्ही रीतींनींही लोकमताचा विपर्यास होतो. पण पक्षाच्या पुढाऱ्यांना पक्षाची बसलेली घडी विसकटण्यापेक्षां असा थोडासा विपर्यास झालेला पत्करतो.

याशिवाय या पक्षघटनेनें लांचलुचपतीला अधिक प्राबल्य आलें आहे. पक्ष अधिकारारूढ झाला म्हणजे त्या पक्षाच्या पुढाऱ्यांवर त्याला अधिकार देण्यांत ज्यांनीं विशेष मदत केली त्या लोकांना बक्षीस देणें हें त्याचें कर्तव्य होऊन बसतें. प्रधानमंडळ ज्या पक्षाचें असेल त्या पक्षाच्या कचेऱ्यांतील तिजोऱ्या त्या मुदतींत भरून वाहात असतात. व फिरून होणाऱ्या निवडणुकीचे वेळीं हा सांठा चांगलाच उपयोगी पडतो. अमेरिकेंत नवीन प्रेसिडेंट निवडला गेला कीं मागचे सारे अधिकारी बडतर्फ करून फिरून सगळ्या जागा नवीन लोकांनीं भरून काढावयाच्या हा जणूं काय रिवाजच होऊन बसला आहे. पण हे तोटे जोंपर्यंत मनुष्यस्वभावांत अगदीं क्रांतिकारक असां

फरक झाला नाहीं तोंपर्यंत कमी होणें शक्य नाहीं. हे प्रत्येक तऱ्हेच्या राज्यपद्धतींत निरनिराळ्या स्वरूपांत चालत आलेलेच आहेत; त्यांबद्दल पक्षसंघटनेसच जबाबदार धरणें केव्हांही रास्त होणार नाहीं.

अमेरिकेंतील लेखक या पक्षघटनेविरुद्ध विशेष जोराची हाकाटी करितात, याचें कारण असें कीं, तेथें निवडणुकीचें तत्त्व अत्यंत क्षुद्र अधिकाऱ्यापासून तो तहत अध्यक्षापर्यंत लाविलें जातें व सारख्या निवडणुकीवर निवडणुकी चालूच असल्यामुळें निवडणूक हाच ज्यांचा धंदा होऊन बसला आहे अशी पुष्कळ मोठी लोकसंख्या तेथें आहे. व या निवडणुकीचीं कामें करून ज्यांना निवडून येण्यांत त्यांनीं साहाय्य केलेलें असतें, त्यांचे-पासून अर्थातच, ते मोबदल्याची अपेक्षा करितात. व यामुळें लांचलुचपती वगैरे प्रकारांना फारच वाव मिळते. **लॉवेल** म्हणतो त्याप्रमाणें अमेरिकन लोकशाही आपल्या आवांक्याच्या बाहेर जबाबदारी आंगावर घेते.

---

५ प्रतिनिधिसभा (अ).

अशा या पक्षभेदाच्या मारामारींतून जे निवडून येतील त्यांची सामान्य प्रतिनिधि सभा—जिला इंग्लंडमध्यें हाउस् ऑफ् कॉमन्स, अमेरिकेंत हाउस् ऑफ् रेप्रेझेंटेटिव्हज्, फ्रान्समध्यें चेंबर ऑफ् डेप्युटीज् म्हणतात ती—बनते. या सभेच्या हातांतच बहुतेक राजकीय सत्ता, जेथें लोकशाही पूर्णत्वास पोंचली असेल तेथें तेथें असते. या सभेनें सारे कायदे पास केलेच पाहिजेत. या सभेंत ज्यांचें मताधिक्य असेल त्यांच्याच अनुरोधानें खरोखर राज्यकारभार चालतो. या सभेचा व पुढें ज्या दुसऱ्या सभेसंबंधीं विवेचन केलें आहे त्या दुसऱ्या सभेचा विरोध झाला असतां, या सभेला खरोखर लोकमताचें पाठबळ आहे हें इंग्लंड व फ्रान्स या दोन्ही देशांत, एक सभा मोडून दुसऱ्या निवडणुकीनें सिद्ध झाल्यास दुसऱ्या सभेला या सभेपुढें मान लववावी लागते. म्हणजे ही सभा खरी लोकमत-निदर्शक आहे असें समजलें जातें व लोकमताचा जोर या सभेच्या द्वारें प्रत्ययास आल्यावर राज्यांतील कोठलीही शक्ति या सभेला विरोध करूं शकत नाहीं.

वर सांगितल्याप्रमाणें सामान्य कायदे तर सारे या सभेला संमत पाहिजेतच, पण इंग्लंडमध्यें पैशासंबंधीं देखरेखीचे सारेच आधिकार मुळीं आज या सभेनें बळकावले आहेत. या सभेनें राजाचेही अधिकार कसे बळकावले आहेत म्हणजे अंमल—बजा-वणी खातें हें केवळ आपलें बाहुलें कसें करून ठेविलें आहे हें

पुढें स्पष्ट होईलच. पण येथें पक्षभेदाच्या तत्त्वावर निवडलेल्या या सभेंतील सभासदांची विभागणीही, त्या पक्षांच्या अनुरोधानेंच होऊन, ती त्या सभेंत कायम व कायदेशीर होऊन रहाते हें लक्षांत ठेवणें, पुढील जबाबदारीच्या कारभाराचीं तत्त्वें समजावून घेण्याच्या दृष्टीनें फार महत्त्वाचें आहे.

दुसरी सभा (ब)

येथपर्यंत पक्ष आणि प्रतिनिधिसभेच्या सभासदांची निवड यासंबंधानें विचार झाला. पण आज स्वराज्य भोगणाऱ्या देशांतून या सामान्य प्रतिनिधिसभेशिवाय कायदे करण्यामध्यें व एकंदर राज्यव्यवस्थेमध्यें थोडाबहुत अधिकार असलेली अशी दुसरीही एक सभा असते. हिला इंग्रजी प्रचाराप्रमाणें 'वरिष्ठसभा' व साधारणपणें दुसरी सभा असें म्हणतां येईल. या सभेला आज प्रचलित असलेल्या युरोपियन राज्यघटनेमध्यें फारसें महत्त्व नाहीं. याचें एक अगदीं ठळक प्रत्यंतर म्हणजे जमाखर्चासंबंधीं एकही ठराव इंग्लंड, अमेरिका किंवा फ्रान्स या तीनही देशांच्या दुसऱ्या सामान्य प्रतिनिधि सभेहून भिन्न अशा सभांतून आणतां येत नाहीं.

बाकीच्या पुष्कळ बाबतींत या तीन देशांच्या या सभांच्या अधिकारांत फरक आहेत; उदाहरणार्थ, अमेरिकेंतील 'सेंनेटला' खालच्या सभेनें म्ह. सामान्य प्रतिनिधीसभेनें कोठलाही पैशासंबंधींचा ठराव विचारासाठीं पाठविला असतां तो ठराव सर्वस्वी नामंजूर करण्याचा अगर त्यावर उपसूचना सुचविण्याचा अधिकार आहे. इंग्लंड-

मधील हाउस् ऑफ् लॉर्डस्‌ला अशा तऱ्हेच्या ठरावावर फक्त एक महिनाभर वादविवाद करण्याचा अधिकार आहे, साधारण कायदे करण्याचे बाबतींत अमेरिकन 'सेनेटला' प्रतिनिधिसभेइतकेच अधिकार आहेत; तर जरी हाउस् ऑफ् लॉर्डस्‌मध्यें कोणचाही कायद्याचा ठराव आणतां येतो तरी कायदा पास करण्यासंबंधांत त्यांच्या नाखुषीचा फारसा परिणाम होत नाहीं. त्यांना एकदां कायदा नको असला तरी दोन वर्षांनंतर पुनः पुनः एकामागून एक अशा तीन बैठकींत तो ठराव हाउस ऑफ् कॉमन्समध्यें पास झाल्यास तो लॉर्डांच्या संमतीशिवायच कायदा होऊं शकतो.

अमेरिकन सेनेटला कायद्याचे बाबतींत असलेल्या या अधिकारांशिवाय अंमलबजावणीचेही कांहीं विशेष अधिकार आहेत. परकीय सत्तेशीं तह करणें, परकीय देशांतील वकिलांची निवड करणें वगैरे कामें अध्यक्षानें सेनेटच्या संमतीनें केलीं पाहिजेत असा नियम आहे, व अध्यक्षाच्या अधिकारांतील सरकारी नोकऱ्यांवर नेमणुकी करणें व बडतर्फ करणें यालाही सेनेटची संमति लागते.

फ्रान्समधील सेनेटला कायद्याचें बाबतींत अमेरिकन सेनेटचेच अधिकार आहेत; पण अंमलबजावणीवर मात्र अमेरिकन सेनेटइतका ताबा नाहीं. अमेरिकन अध्यक्षाला नसलेला व फ्रेंच अध्यक्षाला असलेला असा प्रतिनिधिसभा मोडण्याचा अधिकार आहे; परंतु त्याची बजावणी मात्र फ्रेंच सेनेटच्या संमतीशिवाय अध्यक्षाला करितां येत नाहीं. या बाबतींत इंग्रजी राजाचा म्हणजे प्रधानाचा अधिकार अनियंत्रित आहे.

असो. अशी एकंदर स्थिति आहे. पण येथें प्रश्न असा उपस्थित होतो कीं, लोकमतानुवर्ती प्रतिनिधींची एक कायदासभा निवडलेली असतांना या दुसऱ्या सभेची मुळीं जरूरीच काय? जेथें जेथें सबंध राज्यघटनेची नवीनच रचना झालेली आहे तेथें तेथें या दुसऱ्या सभेची योजना राज्यकारभारांत एक तऱ्हेची स्थिरता आणण्याच्या उद्देशानें हेतुपुरःसर केली गेली आहे. ही योजना अर्थात् जुन्यांत जुन्या इंग्रजी पार्लमेंटांतील हाउस् ऑफ् लॉर्डस्नेंच सुचविली पाहिजे. पण अमेरिकेसारख्या नवीन वसाहतींत परंपरागत उमराव मिळणें शक्य नव्हतें व फ्रान्सनें राज्यक्रांतीच्या वेळीं आपल्या सर्व उमरावांचा धुव्वा उडविला होता म्हणून या दोन्ही देशांनीं ही—स्थिरता व त्याबरोबरचे दुसरेही सामान्य प्रतिनिधिसभेंत दिसून न येणारे गुण ज्याच्यांत असूं शकतील —अशा सभा निर्माण केल्या.

इंग्लंडमधील ही सभा केवळ उमरावांची आहे. वंशपरंपरागत मिळकत व किताब यांच्या अनुषंगानेंच या सभेंतील सभासदत्वाचा मान आपोआप चालत येतो. यांत वंशपरंपरागत इस्टेटीच्या मालकाशिवाय इतर कोणीच लोक नसतात असें नाहीं. कांहीं धर्माधिकाऱ्यांनाही या सभेंत बसण्याचा अधिकार असतो व राजाला नवीन उमरावही बनवितां येतात.

इंग्लंडमधील या सभेची उभारणी कोणच्याही आधुनिक राजकीय तत्त्वावर केलेली नाहीं हें जरी खरें असलें, तरी या सभेच्या अस्तित्वामुळेंच असल्या सभेची कल्पना व कांहीं तींतील गुण पाहून व कांहींसें त्यांतील दोषांनीं सावध होऊनच, हीं दुसऱ्या

सभेसंबंधीं नवीं तत्त्वें बनलीं असल्यामुळें या सभेच्या गुणदोषांचा विचार अप्रस्तुत होणार नाहीं.

प्रथम ही सभा जमीनदारांची असल्यामुळें दुसऱ्या सर्वसाधारण लोकांनीं निवडलेल्या सभेपेक्षां इच्यांत अधिक स्थैर्य असणें स्वाभाविक आहे. क्रांतिकारक सुधारणांना हे लोक एकदम संमति देणार नाहींत.

दुसरें असें कीं, जरी एका घराण्यांतील एकामागून एक सारींच माणसें कर्तबगार निघणें फारसें शक्य नसलें तरी अशीं पुष्कळशीं कुटुंबें एकत्र केलीं असतां वरच्या दर्जांतील लोकांत अशीं कर्तबगार माणसें निपजण्याचें प्रमाण खास अधिक पडेल. एक तर यांना वंशपरंपरागत संस्कार असतात. दुसरें, सर्व गोष्टी अनुकूल असल्यामुळें मानसिक विकासाला जरूर तो पैसा व वेळ त्यांना मिळतो व पहिल्यांदांच मोकळेपणानें उमराव सभेचे सभासद असल्यामुळें ज्यांचा सहजच कायदे करण्याशीं परिचय येतो, अशा लोकांत हिंडल्याफिरल्यानेंही सार्वजनिक कामाची बरीच माहिती होते. त्यांना पैशाची ददात नसल्यामुळें हाउस ऑफ् कॉमन्समध्येंही त्यांची इच्छा असल्यास निवडून येण्यास चांगली मदत होते, व अशा रीतीनें अनुभव घेऊन ते हाउस् ऑफ् लॉर्डस्मध्यें शिरण्याच्या वेळेपर्यंत जबाबदार रीतीनें काम करण्यास समर्थ होतात. याप्रमाणें या सभेंतील सभासदांत स्थैर्य, बुद्धिमत्ता, मनोविकास व अनुभव हीं एकत्रित झालीं असतात.

पण या एकाच वर्गामधून बनलेल्या या संस्थेमध्यें दोषही अनेक आहेत. एकाच वर्गाची ही सभा असल्यामुळें आपल्याच

पोळीवर तूप ओढून घेण्याची या वर्गाची साहाजिकच प्रवृत्ति होणार, पैशानें ज्याप्रमाणें बुद्धिमत्ता, मनोविकास व अनुभव मिळविण्याच्या साधनांच्या बाबतींत मदत होऊं शकते, तसेंच पैशामुळें चैन, वाईट संवई व गुलामी स्वभाव यांचीही वाढ होऊं शकते, पण या गोष्टी जरी सोडून दिल्या तरी अशी बनलेली सभा केवळ एका जातीचीच अशी बनते व त्यामुळें लोकांचा त्या सभेवर विश्वास रहात नाहीं.

या सभेच्या घटनेंत दृग्गोचर होणाऱ्या स्थैर्य, अनुभव वगैरे गुणांनीं, जरी लोकप्रतिनिधिसभेच्या घाईस व क्रांतिकारक व केवळ लोकप्रवाहाच्या लाटेसरशीं अत्यंत महत्त्वाच्या सुधारणा अमलांत आणण्याच्या इच्छेस आळा बसणें हें इष्ट असलें; तरी एका स्वहिततत्पर वर्गाच्या हातांत आपलें नुकसान होईल अशा नवीन लोकहितसाधक सुधारणांना आळा घालण्याचें सामर्थ्य ठेवणें केव्हांही इष्ट होणार नाहीं. तेव्हां प्रतिनिधि—सभेनें पुढें आणलेली नवीन सुधारणांची योजना घाईघाईनें पास न व्हावी, तिचा सर्वबाजूंनीं पूर्ण विचार व्हावा व लोकमताचा जर त्या बाबतींत पूर्ण निश्चयच झाला असेल तर दोन वर्षांनीं म्हणजे नवीन कल्पनांची लाट स्थिरावून लोकांना स्वस्थपणानें विचार करावयाला वेळ मिळून, जर त्यांचा पूर्वींचाच विचार कायम राहील, तर मग लॉर्डांच्या वर्गविशिष्ट विरोधाला धाब्यावर बसविण्याचा अधिकार हल्लींच्या कायद्यानें इंग्लंडांतील प्रतिनिधिसभेला देण्यांत आलेला आहे.

पण लॉर्डांचे अधिकार इतर बाबतींत फारच कमी झालेले आहेत व कोठल्याही देशांतील दोन्ही सभांचे अधिकार सारखे ठेवणें जरी अशक्य असलें तरी लॉर्डांची सभा असावी त्याहून फारच दुर्बल झाली आहे, असें पुष्कळांचें मत आहे, निदान लॉर्डांच्या सभेचा नमुना पुढें ठेऊन बनविलेल्या फ्रान्स व अमेरिका या देशांतील सेनेटांच्यापेक्षां या सभेचे अधिकार पुष्कळच कमी आहेत.

व असें होणें साहाजिक आहे. लॉर्डांची सभा ही वंशपरंपरागत अधिकार अवलंबून असलेल्या एका विशिष्ट वर्गाची आहे. त्यामुळें सर्वसामान्य जनतेचा तिवर विश्वास नाहीं. पण फ्रान्स व अमेरिकेंतील या सभेच्या नमुन्याप्रमाणें बनविलेल्या सभांना निवडणुकीचें तत्त्व बऱ्याचशा प्रमाणांत लागू केलें जातें.

संयुक्त अमेरिकन सेनेटचे सभासद प्रत्येक संस्थानाच्या दोन्ही सभांनीं मिळून दोन दोन असे निवडलेले असतात. व यांपैकीं प्रत्येक दोन वर्षांनीं एकतृतीयांश सभासद कमी केले जाऊन, त्यांचे जागीं नवीन निवडणुकी होतात. पाहिल्या दोन वर्षांच्या शेवटीं कोठल्या तृतीयांश सभासदांनीं जावयाचें व पाहिल्या चार वर्षांनीं बाकीच्या दोन तृतीयांशांपैकीं कोठल्या निम्या लोकांनीं जावयाचें हें सभासदांच्या नांवाच्या चिठ्या टाकून ठरविण्यांत आलें, व पुढें ज्यांचीं सहा वर्षें भरतील अशा एकतृतीयांश सभासदांनीं प्रति दोन वर्षांच्या शेवटीं जावयाचें असें ठरविण्यांत आलें.

अशा रीतीनें प्रत्येक संस्थानच्या प्रतिनिधिकायदेमंडळानें हे सेनेटचे सभासद निवडलेले असतात म्हणजे पर्यायानें हे लोकांनींच निवडलेले असतात. पण प्रतिनिधिसभेचे सभासद जसे प्रत्यक्षतः दर दोन वर्षांनीं लोक निवडतात त्याहून ही निवडणूक जास्ती समंजस लोकांकडून होते. हे लोक आधींच संस्थानच्या कायदासभेंत अनुभव घेतलेले असल्यामुळें प्रतिनिधिसभेच्या सभासदांपेक्षां अधिक अनुभवी, जबाबदार व सूज्ञ असतात. व कायदे करण्यांत व एकंदर राज्यकारभारांत जें स्थैर्य पाहिजे, त्याची तरतूद दर दोन वर्षांनीं फक्त एकतृतीयांश सभासदच निवडावयाचे या योजनेनें बरीच केलेली आहे. या सेनेट सभेंत कोणत्याही वेळीं राज्यकारभाराचें चार किंवा अधिक वर्षांचें धोरण माहीत असलेले एकतृतीयांश सभासद असतातच. तसेंच दोन किंवा अधिक वर्षांची माहिती असलेले एकतृतीयांश असतात व राहिलेले एकतृतीयांश जरी नवीन विचारांचे असले तरी त्यांच्यावर मूळच्या दोनतृतीयांशांचें वजन पडतें. दुसऱ्या रीतीनें जरी या नवीन विचारांच्या एकतृतीयांशांना विरोध करणें लोकहिताला विघातक असलें तरी अशी नवीन सुधारणा लोकमत जर त्या बाबतींत तयार असलें तर आणखी दोन वर्षांहून अधिक दिवस दाबून टाकतां येणार नाहीं.

फ्रान्समधील सेनेटच्या सभासदांपैकीं २२५ सभासदांची ९ वर्षांपुरतीच अप्रत्यक्ष निवडणुकीच्या रीतीनेंच निवड केलेली असते. व बाकीपैकीं ७५ त्या सेनेटसभासद मात्र त्यांच्या हयातीपर्यंत सभासद राहूं शकतात. वरील २२५ निवडलेल्या सभासदांपैकीं

अमेरिकन सेनेटच्या पद्धतीला अनुसरूनच दर तीन वर्षांनीं एक-तृतीयांश या प्रमाणांत बदलतात.

अशारीतीनें लोकमताच्या लहरींबरोबर एकदम राज्यशकट भलतीकडे वाहून नेला जाऊं नये म्हणून, चांगल्या अनुभविक लोकांकडून प्रत्येक नवीन कायद्याच्या योजनेची छाननी नीटपणें केली जावी म्हणून ही सभा स्थापन करण्यांत येते. तरी सुद्धां केवळ लोकांनीं निवडलेल्या सभेशीं समान असे हक्क या सभेस देतां येत नाहींत. कारण असे जर समसमान हक्क दोन्ही सभांना दिले तर प्रत्येक प्रश्नावर खटका उडून मुळीं कशाचाच निकाल लागूं शकणार नाहीं. दुसऱ्या रीतीनें या वरच्या सभेकडे अधिक अधिकार दिल्यास वर्गावर्गांमध्यें पक्षपात होण्याचा फार संभव, तेव्हां मुख्य अधिकार सगळें सामान्य लोकप्रतिनिधिसभेकडे देऊन केवळ देखरेखीचें, विशेष घाई होऊं न देण्याचें, एकाद्या प्रश्नाचें निरनिराळ्या रीतींनीं परीक्षण करण्याचें काम या सभेवर सोंपविलें असतें.

या सभा जरी अशा निरनिराळ्या रीतीनें निरनिराळ्या देशांत बनलेल्या असल्या, तरी त्या सर्वही सभासदांच्या पक्षभेदामुळें होणाऱ्या विभागणीपासून मुक्त नसतात. फ्रान्स व अमेरिका किंवा कोणताही नवीन स्वराज्य मिळविणारा देश असो, तेथें या सभेला कोणत्या ना कोणत्या तरी रीतीनें निवडणुकीचें तत्त्वच लाविलें जाणार व यामुळें जेथें निवडणूक आली तेथें निवडणूक सोईची करण्यासाठीं उत्पन्न झालेला हा पक्षभेद आलाच. या न्यायानें हे पक्षभेद आहेत व ते राहाणारच. आणि पहिल्यापासूनच अस्तित्वांत असलेल्या या लॉर्डांच्या सभेच्या इतिहासाकडे पाहिलें

म्हणजे इंग्लंडांतील पक्षभेद उत्पन्न करण्याचें सारेंच श्रेय मुळीं या लॉर्डांकडे आहे हें लक्षांत येईल. प्रथम इंग्लंडमध्यें सारीच सत्ता या लॉर्डांच्या हातांत असल्यामुळें निवडणुकींत जय मिळविण्याच्या इच्छेनें नव्हे तर अधिकार सूत्रें बळकावण्याच्या इच्छेनें यांनींच हे पक्ष रूढ केले. आणि आजही त्याच दृष्टीनें लॉर्डांच्या सभेंत हे पक्ष अस्तित्वांत आहेत यांत नवल नाहीं.

---

६ कायदासभा व अंमलबजावणी.

अशा रीतीनें कांहीं तरी एका विवक्षित दर्जाच्या मतदार-संघानें निवडलेलें सामान्य प्रातिनिधिमंडळ व त्यांतल्यात्यांत अधिक स्थैर्य, जबाबदारी, समजूतदारपणा, शिक्षण, अनुभव इत्यादि गुणांचा ज्यांत समावेश होईल अशी दुसरी सभा या दोहोंची मिळून एक कायदासभा होते. पण कायदे करण्यांत तिसऱ्याही एका व्यक्तीचा अगर व्यक्तिसमूहाचा हात असतो.

इंग्लंडमध्यें कायदे करण्याचा मुख्य अधिकार 'पार्लमेंट'चा आहे. व इंग्लिश पार्लमेंट ही एक सर्वसमर्थ संस्था आहे. पण हें 'पार्लमेंट ' तीन घटकावयवांचें बनलेलें असतें. हे तीन अवयव म्हणजे राजा, हाउस् ऑफ कॉमन्स व लार्डांची सभा होत. साधारणतः राज्यकारभारांतील अधिकाराची विभागणी या दोन सभांत कशी केली आहे हें वर आलेलेंच आहे, पण कोठलाही कायदा हा या दोन सभांतून पास होऊन किंवा वर सांगितल्याप्रमाणें लॉर्डांच्या नकाराला धाब्यावर बसविल्यानंतर सुद्धां राजाच्या संमतिदर्शक सहीशिक्यावांचून त्याला कांहीं कायद्याचें स्वरूप प्राप्त होत नाहीं.

यांतील राजा हा खरोखर अंमलबजावणीचा कायदेशीर मुख्याधिकारी असतो. व तो ही अंमलबजावणी आपल्या प्रधानांच्या द्वारा करितो. पार्लमेंटच्या दोन्ही सभांनीं कायदे करावयाचे, कर बसवावयाचे, खर्च करण्यास परवानगी द्यावयाची

व राजानें या सर्व गोष्टी पार्लमेंटच्या आज्ञेबरहुकूम आपल्या प्रधानांकरवीं करवावयाच्या असा इंग्लंडच्या आजच्या पद्धतीचा कायदेशीर अर्थ सांगतां येईल.

हीच पद्धति अमेरिकेंतही चालू आहे. तेथील हाउस् ऑफ रेप्रेझेंटाटिव्हज् व सेनेट यांनीं पास केलेले ठराव हे प्रेसिडें-टच्या संमतीनें कायद्याच्या स्वरूपांत येतात व मग त्यांची अंमल-बजावणी प्रेसिडेंटनें आपल्या प्रधानाकरवीं करावयाची.

पण इंग्लंडमधील व अमेरिकेंतील या अंमलबजावणी खात्यावर जी लोकमताची देखरेख ठेविली जाते त्यांत फार मह-त्त्वाचा फरक आहे. इंग्लंडमध्यें राजा हा जरी अंमलबजावणीचा मुख्य अधिकारी असला तरी तो अंमलबजावणींतल्या बऱ्यावाईटा-बद्दल कायदेशीररीत्या मुळींच जबाबदार नसतो. कायदेशीर जबा-बदारी सारी प्रधानमंडळवर असते व या प्रधानमंडळाला आपल्या कोणत्याही कृत्याबद्दल प्रतिनिधिसभेस जाब द्यावा लागतो व त्यांची प्रधानकीही प्रतिनिधिसभेच्या खुषीवर अवलंबून असते. हीच स्थिति बऱ्याच अंशीं फ्रान्समध्ये प्रचलित आहे. पण अमेरिकेंतील प्रेसिडेंटची जबाबदारी याहून फार निराळ्या प्रकारची असते व त्याच्याशीं प्रधानमंडळाचा व कायदासभेचा मुळीं संबंधच येत नाहीं. प्रेसिडेंट हा कायदेशीर रीत्या कांहीं विशेष अपराधाबद्दल सेनेट सभेला जबाबदार असतो पण इतर बाबतींत या सभेला किंवा दुसऱ्या सभेलाही त्याच्यावर देखरेख ठेवितां येत नाहीं व त्याला साधारणपणें एकदां निवडणूक झाल्यापासून चार वर्षांपर्यंत विचारता पुसता कोणीच नसतो. मात्र

त्याला फिरून निवडून न देण्यानें लोक आपली नापसंती दाखवूं शकतात. त्याचे प्रधान हे तर केवळ त्याचे नोकर असतात. त्यांना कसलाही विशेष अधिकार नसतो व त्यांच्यावर जबाबदारीही पण नसते.

याचें मुख्य कारण असें आहे कीं, इंग्लंडमध्यें अंमलबजावणीचा कायदेशीर अध्यक्ष जो राजा, तो जरी जबाबदारींतून अलिप्त असला तरी वस्तुतः जो अध्यक्ष व जबाबदार मुख्य प्रधान तो या सभांपैकीं एकना एक सभेचा सभासद असतो. व त्याचे सहाय्यकर्ते इतर प्रधानही कोणत्या तरी एका सभेचे सभासद असतात. व अमेरिकेंतील प्रेसिडेंट किंवा त्याचे नोकर हे या सभांपकीं एकाही सभेंत बसत नाहींत. यामुळें एका देशांत अंमलबजावणीच्या अधिकाऱ्यांना प्रत्यक्ष जाब विचारतां येतो व दुसऱ्या देशांत तसें करितां येत नाहीं. या अमेरिकेंतील अंमलबजावणी व कायदासभा यांच्यासंबंधीं कायदे करण्याच्या बाबतींत आणखी एक खोड राहून गेली आहे तिचा उल्लेख पुढें येईलच.

अशा रीतीनें हें जें इंग्लंडांतील आपल्या कोणत्याही कृतीबद्दल जाब देण्यास बांधलेलें व या सभांच्या विशेषतः प्रतिनिधिसभेच्या खुषीवर ज्यांचें अधिकार अवलंबून आहेत अशा प्रधानमंडळाला जबाबदार प्रधानमंडळ व अशा राज्यघटनेस जबाबदार राज्यघटना असें म्हणतात.

वर ज्या दोन सभा सांगितल्या त्यांतील एक प्रतिनिधिसभा व दुसरी उमरावसभा किंवा पहिलीहून कमी प्रातिनिधिक

अशी सभा असते, हें वर आलेंच आहे. व जर या दोन्ही सभांच्या मर्जीवर प्रधानमंडळाची कारकीर्द अवलंबून असेल तर या राज्य-पद्धतीस केवळ प्रतिनिधिसत्ताक जबाबदार राज्यघटना कसें म्हणतां येईल ? या प्रश्नाचा उलगडा जसा वर 'दुसऱ्या' सभेचे अधिकार कमी असतात असें सांगितलें आहे, त्यानें काहीं अंशीं झाला आहे, तसा प्रधानमंडळावरील हा दाब इंग्लंडमध्यें कोणत्या रीतींनीं या कायदा-सभांकडे आला हें पाहिलें म्हणजे अधिक उघड होईल.

कायद्याच्या भाषेंत बोलावयाचें म्हणजे प्रधानं हे राजाचे नोकर व त्यांना काढून टाकणें न टाकणें हे केवळ राजाच्या मर्जीवर अवलंबून. पण राजाला पैसे लागतील त्या त्यावेळीं नवीन कर बसविण्याचा अधिकार पार्लमेंटचा असल्यामुळें, ज्या ज्या वेळीं कोणतेंही अन्यायाचें कृत्य राजा करी त्या त्या वेळीं राजाला जबाबदार न धरितां, जर राजा, ज्या प्रधानांकरवीं तें कृत्य झालें असेल त्याला बळी द्यावयाला कबूल असेल, तरच नवीन कर बसवून पैशाची तरतूद करण्याची परवानगी देण्याचा परिपाठ हळुहळू पार्लमेंटनें पाडिला, व या रीतीनें राजाच्या कोणत्याही कृत्याबद्दल पार्लमेंट प्रधानास जबाबदार धरूं लागलें. असें होतां होतां ज्या प्रधानाला पार्लमेंटमध्यें बहुमत नसेल त्या प्रधानाला मुख्य पदावर ठेवून राज्यकारभार चालविणें कठिण पडूं लागलें व तिसऱ्या वुइल्यमच्या कारकीर्दीत जो पक्ष दोनही सभांत-त्यांतल्या त्यांत ज्यांतील सभासद वरचेवर बदलतात व ज्यांच्या हातांतच पूर्वीपासून पैशाच्या देवघेवीचे विशेष अधिकार असत अशा

कॉमन्ससभेंत-प्रबळ असेल त्या पक्षाचा प्रधान नेमण्याचा परिपाठ पडला. व अशा रीतीनें प्रत्येक नव्या निवडणुकीच्या वेळीं लोकमताला संमत असतील अशा लोकांचेंच प्रधानमंडळ बनविणें भाग होऊन बसलें. म्हणजे पर्यायानें राजाकडून इंग्लंडांतील मतदारच प्रत्येक नव्या निवडणुकीचे वेळीं अधिकारारूढ प्रधानमंडळांत इष्ट ते फेरफार घडवून आणतात; अगर जुनेंच प्रधानमंडळ कायम रहावें असा निकाल देऊन त्याची कारकीर्द पसंत करितात. या गोष्टी चांगल्या रीतीनें पार पडाव्या म्हणून अशा जबाबदार पद्धतींत पक्षभेदाला या कायद्यासभांतून सुद्धां एक विशेष तऱ्हेचें महत्त्व देण्यांत येतें. इंग्लंडच्या कायदेवजा असलेल्या राज्यघटनेच्या नियमांनीं दोन पक्षांचें अस्तित्व गृहीत धरलेलें आहे. म्हणजे देशांत किंवा निवडणुकीनंतर या सभांतून दोहोंतून आधिक पक्ष नसतातच असें नाहीं, तर हे दुसरे जे पक्ष असतात त्यांना या नियमांनीं कांहीं मान दिलेला नसतो व हे पक्ष एका नाहीं तर दुसऱ्या प्रबळ पक्षांत मिसळून जातात, अगर मिसळून न गेले व स्वतंत्र राहिले तरी राज्यव्यवस्थेच्या सुरळीतपणास बाध न आणण्याइतके दुर्बल असतात. किंवा फारच झालें तर आपला कांहीं विशिष्ट हेतु साधीपर्यंत अधिकारारूढ पक्षास त्रास देत राहातात.

हे जे दोन पक्ष घटनानियमांनीं मान्य केलेले असतात ते देशांतील दोन प्रबळ पक्ष होत. यांपैकीं एक पक्ष ज्याचें प्रतिनिधिसभेंत बहुमत असेल तो अधिकारारूढ असतो व दुसरा पक्ष कायदेशीर 'विरोधी पक्ष' असतो. या दोन्ही पक्षांच्या प्रतिनिधिसभेंतील बसण्याच्या जागा समोरासमोर असतात. मुख्य प्रधान किंवा

मुख्य प्रधान उमराव असेल तर प्रतिनिधिसभेंतील प्रधानमंडळाचा पुढारी व विरोधी पक्षाचा पुढारी हे एकमेकांच्या कृतींची अगदीं बारकाईनें तपासणी करीत असतात. विरोधी पक्षाचा हेतु अगदीं सांगून संवरून राज्यकारभारांतील चुका दाखवून अधिकारारूढ पक्षाला पदच्युत करून आपण अधिकार मिळविण्याचा असतो. व यामुळें पक्ष नेहमीं अत्यंत सावधागिरीनें असतो. विरोधी पक्षही ज्यावेळीं बराच प्रबळ असेल त्याच वेळीं राज्यकारभार फारच लक्षपूर्वक चालतो. जर का प्रधानमंडळाच्या बाजूला बरेंच मोठें बहुमत असेल व विरोधी पक्ष कमकुवत असेल तर प्रधानमंडळ हलगर्जी होण्याचा फारच संभव असतो. निवडणुकीच्यावेळीं जो पक्ष बहुमत मिळवील त्या पक्षाच्या पुढाऱ्याला राजा प्रथम मुख्य प्रधान नेमतो व आजच्या स्थितींत राजाचें काम येथेंच संपतें, किंवा कांहीं असलेंच तर तें तो प्रधान ज्या अवश्य गोष्टी करावयास सांगेल तेवढ्या मुकाट्यानें करण्यापुरतें असतें. यानंतर हा मुख्य प्रधानच आपल्याला पाहिजे असतील म्हणजे पक्षाच्या किंवा त्याच्या निरनिराळ्या समूहांच्या विश्वासास जे पात्र झाले असतील त्यांचें प्रधानमंडळ बनवितो. या प्रधानमंडळांतील विशेष अधिकारी लोकांची एक कॅबिनेट या नांवाची सभा बनलेली असते, व ही सभा सर्वराज्यकारभार चालविते. साधारणतः या सभेलाच राजाचे सर्व अधिकार प्राप्त होतात. पण विशेष रीतीनें ते अधिकार मुख्य प्रधानच उपभोगितो व तो एका पक्षाचा मुख्य असल्यानें व त्या पक्षाला साऱ्या देशाचें पाठबळ असल्यामुळें ते अधिकार पर्यायानें लोकच उपभोगितात.

उदाहरणार्थ, प्रत्येक पार्लमेंटच्या सुरवातीस ‘ राजाचें भाषण’ होत असतें. हल्लींचें हें राजाचें भाषण म्हणजे अधिकारारूढ पक्ष आपल्या निवडणुकीच्या—लोकांस पसंत पडलेल्या जाहिर-नाम्यापैकीं कोणत्या सुधारणा त्या वर्षांत अमलांत आणूं इच्छितो याची कार्यकर्मपात्रिका असते. प्रतिनिधिसभा बरखास्त करण्याचा राजाचा अधिकार मुख्य प्रधानाला प्रतिनिधिसभेंत विरोध व्हावयाला लागून, निदान लोकमत तरी आपल्या पाठी-शीं आहे किंवा नाहीं, हें पाहाण्याची पाळी येईपर्यंत अमलांत येत नाहीं.

अंमलबजांवणी खात्यांचे अधिकार याप्रमाणें त्यांना प्रतिनिधिसभेंत अनुकूल असलेल्या बहुमतावर अवलंबून असतात, व या बहुमताला, विरोधी वर्तन जर प्रधानमंडळाच्या हातून घडेल तर प्रधानमंडळाला मतदारांना प्रधानमंडळ ज्या मताचें असेल, त्या मताला बहुमत घेऊन प्रधानमंडळ कायम करण्याचा अधिकार आहे. पण जर ही पुनर्निवडणूकही प्रधानमंडळाला प्रतिकूल झाली तर प्रधानमंडळाला राजीनामा द्यावा लागेल. या रीतीनें प्रधानमंडळ नेमण्याचें काम जसें मतदार राजाच्या हातून करवितात त्याप्रमाणें त्याला काढून टाकण्याचेंही करितात.

पण त्या अधिकारारूढ पक्षाच्या कारकीर्दींतही दोन्ही कायदा सभांतील सभासदांची सक्त देखरेख राज्यकारभारावर असते. कोठल्याही प्रधानाच्या कारभाराबद्दल, त्या प्रधानाला सभेंतल्या सभेंत प्रश्न विचारण्याचा अधिकार कोणत्याही सभासदाला आहे. अशा विचारल्या जाणाऱ्या सगळ्याच प्रश्नांचा उपयुक्त परिणाम

होतो असें नाहीं. पण साधारणपणें, अशा रीतीनें एकाद्या गोष्टी-संबंधीं विचारणें एवढीच त्यासंबंधीं कशी काय व्यवस्था झाली हें सरकारकडून काढून घेण्याची युक्ति असल्यामुळें, या रीतीला फार महत्त्व येतें व त्यामुळें या प्रश्नांपैकीं कांहीं जरी निवळ खोडसाळपणें विचारलेले असले तरी हा प्रश्न विचारण्याचा अधिकार काढून घेतां येत नाहीं. निरनिराळ्या खात्यांचे रिपोर्ट मागविणें ही एक राज्यकारभारावर देखरेख ठेवण्याची रीत आहे व या दोन्हींसही राजकारणी गुन्ह्याच्या सबबीवर नकारार्थी जबाब देणें सरकारच्या हातांतलें असतें.

राज्यकारभारावर टीका करण्याचे प्रसंग निरनिराळ्या वेळीं निरनिराळ्या प्रकारांनीं साधण्यांत येतात. प्रत्येक पार्लमेंटच्या बैठकीच्या सुरवातीला राजाचा जाहीरनामा प्रसिद्ध होतो म्हणून वर सांगितलेंच. त्याला उत्तर देतांना प्रधानांच्या कृत्यावर टीका करण्यांत येते. जमाखर्चाचा खर्डा विचारास आला असतां प्रजेच्या तक्रारींचा निकाल झाल्याशिवाय राजाला पैशाचा पुरवठा करावयाचा नाहीं, या जुन्या वहिवाटीस अनुसरून प्रधान-मंडळाच्या कृत्यांवर टीका करण्याची संधि मिळते. त्याशिवाय प्रत्येक सभासदाला प्रत्यक्षपणें सरकारी कृत्याबद्दल नापसंती दर्शक व त्यावेळच्या प्रधानमंडळासंबंधानें अविश्वास–प्रदर्शक असा ठराव आणण्याचा अधिकार असतोच. असा ठराव पास झाला म्हणजे त्यावेळच्या प्रधानमंडळाची त्या पार्लमेंटांतील सत्ता नष्ट झाली असें सिद्ध होतें व प्रधानांवर निदान मतदारांचा तरी विश्वास आहे किंवा नाहीं याचा तपास लावण्याचा प्रसंग येतो.

असा ठराव साधारणपणें विरोधी पक्षाकडून किंवा त्याच्या प्रेरणेनें पुढें आणण्यांत येतो. ज्यावेळीं तो खरोखर विरोधी पक्षाकडूनच पुढें येतो त्यावेळीं जर प्रधानमंडळाचा पराजय झाला तर नवीन प्रधानमंडळ बनविण्याची जबाबदारी त्या विरोधी पक्षावर येऊन पडते. व विरोधी पक्षाकडून असला ठराव पुढें आल्यास दुसऱ्या सामान्य मनुष्याच्या या तऱ्हेच्या ठरावापेक्षां, वादविवादाची संधि शक्य तितकी लवकर देण्याचा शिरस्ता आहे.

मागें पक्षभेदाचें विवेचन केलें. तेथें दोनच प्रबळ पक्ष असणें हें जसें त्या देशाच्या राजकीय परिणतीचें लक्षण आहे तसेंच जबाबदार राज्यपद्धतीच्या दृष्टीनेंही असें दोनच पक्ष असणें महत्त्वाचें आहे असें सांगितलें. असें दोनच पक्ष म्हणजे एकपक्ष बराच प्रबळ, दुसरा कांहीं अगदींच दुर्बळ नाहीं, अशी प्रतिनिधिसभेंतील स्थिति असणार. व अशी स्थिति असली म्हणजे अधिकारी पक्षानें कांहीं विशेष चूक केली तरच अनधिकारी पक्षाची लोकप्रियता वाढेल व त्या स्थितींतच तो अनधिकारीपक्षही अधिकारीपक्षास उलथून टाकण्याचा प्रयत्न करणार नाहीं. त्यामुळें एकदां नेमलें गेलेलें प्रधानमंडळ निदान कांहीं काल तरी स्वस्थपणें व आपल्या मनाप्रमाणें म्हणजे मागच्या निवडणुकींत जाहीर झालेल्या लोकमताप्रमाणें काम करूं शकतें.

पण जेथें अनेक पक्ष आहेत अशा देशांत या जबाबदार राज्यपद्धतीचा फारच बोजवारा उडतो. फ्रान्समध्यें दोन प्रबळ असे पक्षही नाहींत व अर्थात् तेथील राज्यव्यवस्थेच्या रचनेंत द्विपक्ष पद्धतीला जें मानाचें स्थान इंग्लंडमध्यें आहे तेंही नाहीं.

त्यामुळें तेथील प्रधानमंडळाला स्थिरता अशी बिलकूल नसते, अनेक प्रतिनिधिसमूहांपैकीं कोठले समूह कोणच्या कारणासाठीं केव्हां अधिकारी–प्रधानमंडळाविरुद्ध एक होतील हें कांहींच सांगतां येत नाहीं. यामुळें प्रधानमंडळाला नेहमीं निरनिराळ्या समूहांच्या तब्येतीकडे लक्ष पोंचवावें लागतें. व त्यामुळें राजधोरणांत बराचसा थिल्लरपणा माजतो. व प्रधानमंडळाच्या पालटापालटीही अनेकवार होतात व अशा पालटापालटी करावयाच्या वेळेला लोकमताला पूर्णपणें बाजूस सारतां येतें. कारण प्रधानमंडळाच्या घडामोडी ज्या व्हावयाच्या त्या त्या प्रतिनिधिसभेंतील सभासदसमूहांच्या लहरीवर. इंग्लंडमधील ही घडामोड, मतदारांचा पहिल्या प्रतीचा विश्वास असलेला पक्ष व दुसऱ्याप्रतीचा विश्वास असलेला पक्ष यांच्या व खुद्द मतदारांच्या इच्छेवर अवलंबून असतात. याच कारणानें इंग्लंडमधील प्रधानमंडळ एका पक्षाचें व साधारणपणें एक प्रकारच्या धोरणाच्या लोकांचें बनलेलें असतें. फ्रान्समध्यें निवड अनेक भिन्नमतांच्या समूहांतून होते. या सर्व गोष्टींनीं मुख्य दोन पक्षांत बाकीच्या मतमतांतरांचा अन्तर्भाव होणें जबाबदार राज्यपद्धतीच्या दृष्टीनें किती महत्त्वाचें आहे हें लक्षांत येईल.

---

७ कायदा व न्याय.

मागच्या प्रकरणाच्या सुरवातीस कायद्याला पूर्णत्व प्राप्त होण्यास आज जबाबदारीचें स्वराज्य भोगणाऱ्या देशांतून निरनिराळ्या तीन घटकांची संमति लागते हें सांगितलेंच आहे. या तीन घटकांपैकीं इंग्लंडमधील अंमलबजावणीचा परंपरागत अधिकारी जो राजा, त्याचे सर्व अधिकार आज मुख्य प्रधानच भोगीत असल्यामुळें व त्याच्या व प्रधानमंडळांतील त्याच्या इतर भागीदारांच्या, म्हणजे प्रतिनिधिसभेंतील त्याच्या पक्षाच्या प्रतिनिधींच्या, संमतीवांचून कोठलाही कायदा पास होऊं शकत नसल्यामुळें, अशा पास झालेल्या कायद्याला राजानें संमति देणें हा केवळ औपचारिक विधि होऊन बसला आहे. राजा हा जसा त्याच्या कोणत्याही कृत्याबद्दल जबाबदार नाहीं तसे त्याला कोणत्याही बाबतींत आज स्वतंत्र अधिकारही नाहींत. अमेरिकेंतील प्रेसिडेंट हा निदान शेवटीं तरी लोकांना जबाबदार असल्यामुळें त्याला संमती–असंमतीचे बरेच अधिकार आहेत. पण अमेरिकन संयुक्त संस्थानांचा अध्यक्ष हा जरी अंमलबजावणीचा इंग्लंडमधील नांवाचाच नव्हे, तर वस्तुतःही मुख्य असतो तरी इंग्लंडमधील वस्तुतः अंमलबजावणीचे सारे अधिकार भोगणारे मुख्यप्रधान व त्याचे सहकारी यांच्या इतकी कायदे करण्याच्या बाबतींत त्याला ढवळाढवळ करितां येत नाहीं.

अमेरिकेंतील हा अंमलबजावणीचा मुख्य अधिकारीही कायदासभांच्या बैठकींच्या सुरवातीस आपल्याला कोणते कायदे

पास होणें इष्ट आहे वगैरेसंबंधीं एक ' निरोप ' सेनेट सभेला पाठवितो. याप्रमाणेंच ब्रिटिश प्रधानमंडळाचे हेतु जाहीर करणारें राजाचें भाषण प्रत्येक पार्लमेंटच्या बैठकीच्या सुरवातीस वाचलें जातें असें वर आलेलेंच आहे. फक्त या दोन्ही बाबतींत फरक मात्र एवढाच कीं, ब्रिटिश प्रधानमंडळाच्या योजनांना कायद्याचें स्वरूप देणें त्याच्या हातांतलें असतें व अमेरिकन अध्यक्ष हा त्याच्या योजनांना कायद्याचें स्वरूप प्राप्त करून देण्याचें ज्यांच्या हातांत अशा दोन्ही सभांच्या बाहेरचा असल्यामुळें त्याला या बाबतींत सर्वस्वी या सभांवर अवलंबून राहावें लागतें. म्हणजे ब्रिटिश प्रधानमंडळाला राज्यकारभाराच्या बाबतींत ज्या अडचणी येतील त्या तावडतोब कायद्याची योजना करून दूर करिता येतात व अमेरिकेंतील कारभार कायदासभांच्या सहानुभूतीच्या अभावीं नडण्याचा बराच संभव असतो. याचें यंदांच्या वर्षांतील ढळढळीत उदाहरण, म्हणजे अमेरिकेंत जर्मन तह व लीग ऑफ् नेशन्सची घटना यांसंबंधीं चाललेला बखेडा हें आहे.

इंग्लंडमध्यें कायद्याचा मसुदा कोणच्याही सभेंत लॉर्डांच्या बाबतींत जमाखर्चाचा विषय सोडून कोणाही सभासदाला सादर करण्याचा अधिकार आहे. पण अशा रीतीनें पुढें आलेल्या मसुद्यांना प्रधानमंडळाच्या कामकाजाच्या गर्दीपुढें वेळ मिळण्याचीच मारामार पडते. पुढें असा वेळ मिळाला तरी अधिकारारूढपक्ष अनुकूल असला तर बरें, नाहींतर अशा कायद्याच्या मसुद्याची धडगत राहाणार नाहीं हें उघड आहे. दुसरें असें कीं, कोठलीही

सुधारणा कायद्यानें घडवून आणावयाची म्हणजे प्रचलित कायद्यांचे तोटे काय आहेत, त्या नव्या सुधारणेचें तत्त्व जरी बरोबर असलें तरी नव्या कायद्याची रूपरेखा कशी असावी वगैरे गोष्टी ठरवितांना जी माहिती लागते, ती सरकारी खात्यांच्या मदतीवांचून मिळणें शक्य असत नाहीं.

दुसरें असें कीं, कायद्याची साधारण ठेवण ठरविणें जरी एकाद्या सामान्य सभासदाला शक्य झालें, तरी त्यांतील शब्दरचना ठरविण्यास कायद्याचें बरेंच ज्ञान लागतें आणि असे अधिकारी जसे सरकारच्या पदरीं असतात तसे ते खाजगी सभासदाला अनुकूल असणें शक्य नाहीं. अशा रीतीनें बऱ्याच दृष्टींनीं खाजगी सभासदांनीं पुढें आणावयाच्या कायद्यांत बऱ्याच उणीवा असतात. अशामुळें व प्रधानांच्या अधिकाराच्या वाढीमुळें हे कायद्याचें मसुदे तयार करण्याचें कामही बहुतांशीं प्रधानमंडळाकडेच आलेलें आहे.

यायोगानें नवीन बनणाऱ्या कायद्यांत उणीवा फारशा राहात नाहींत. ज्या ज्या गोष्टी नसल्यामुळें खाजगी मसुदा लंगडा पडतो म्हणून वर सांगितलें त्या त्या गोष्टी या प्रधानमंडळाला अनुकूल असतात. अशा तऱ्हेचा अंमलबजावणीच्या खात्यावर कायदे करण्यांत मुख्य भाग घेणारांचा तांबा अमेरिकेंतहीं नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें प्रेसिडेंट व त्याचे नोकर कायदे करणाऱ्या दोन्ही सभांपासून अलिप्त असतात. तेथें कायद्याचे मसुदे तयार करण्याचें काम निरनिराळ्या कमिट्यांवर सोंपविलेलें असतें.

दोन्ही सभांत निरनिराळ्या कमिट्या बनवून त्यांचेकडे निरानिराळ्या विषयांवर कायदे करण्याचें काम दिलेलें असतें, व या कमिट्यांचा तर प्रत्यक्ष अंमलबजावणी खात्यांशीं कांहीं संबंध नसतो, त्यामुळें त्यांना जरूर ती माहिती मिळत नाहीं.

जबाबदार प्रधान खुद्द कायदा सभांचे सभासद असल्यामुळें कायदे करण्याचें महत्त्वाचें काम इंग्लंडमध्यें फारच सुलभ रीतीनें पार पडतें.

पण कायदे करण्यामधील या मोठ्या सभांमधील कमिट्यांचेंही महत्त्व विसरतां कामा नये. इंग्लंडमध्येंही या तऱ्हेच्या कायम कमिट्या अस्तित्वांत आल्या आहेत. नवीन सभांपैकीं निवडक सभासद घेऊन एकाद्या कायद्याकरितांच, हिंदुस्थानच्या सुधारणांच्या कायद्याचा विचार करण्याकरितां गतवर्षीं बसलेल्या कमिटीप्रमाणें एकादी कमिटी नेमतात, किंवा सबंध सभाच कमिटीच्या स्वरूपांत नवीन कायद्याच्या मसुद्याचा विचार करिते. अर्थात् या शेवटच्या कमिटीपेक्षां लहान लहान कमिट्यांतच त्या कायद्याचा विचार होणें, त्यांतील प्रत्येक कलमाची बारकाईनें दाटाघाट होण्याच्या दृष्टीनें जरूर असतें व शेवटच्या प्रकारची कमिटीची चर्चाही अगदीं खाजगी स्वरूपाची असल्यामुळें व तेथें नेहमींच्या सभेच्या बैठकींतल्याप्रमाणें लांब लांब व वक्तृत्वपूर्ण भाषणें करण्यास वाव नसल्यामुळें खरोखर उपयुक्त व जरूरीच्या गोष्टींकडे लक्ष दिलें जातें. दोन्ही सभांच्या कमिट्या साधारणपणें त्या भावी कायद्याचे बाबतींत साक्षी वगैरे घेण्याकरितां नेमण्यांत येतात

व त्यांनीं आपल्या चौकशीचा रिपोर्ट दोन्ही सभांना सादर करावयाचा असतो.

या कमिट्या बनून कायद्याच्या मसुद्याचा जो विचार होतो तो ज्याला दुसरें वाचन म्हणतात तें झाल्यानंतर होतो. प्रथम कोणत्याही सभेंत मसुदा सादर करण्याची सूचना देऊन अगर परवानगी घेऊन तो मसुदा सभेपुढें औपचारिक रीत्या आणण्यांत येतो. म्हणजे त्या सभेच्या कारकुनाला फक्त त्याचा विषय कळविण्यांत येतो. याला पहिलें वाचन म्हणतात. दुसऱ्या वाचनाचे वेळीं त्या मसुद्याच्या साधारण स्वरूपासंबंधीं चर्चा होते व जर पसंत असेल तर तो मसुदा वर सांगितलेल्या एकाद्या कमिटीकडे विचाराकरितां पाठविण्याकरितां येतो. वरील प्रकारच्या विचारानंतर सूचना उपसूचना वगैरेनीं बऱ्याच विकृत अशा स्वरूपांत तो मसुदा पुनः सबंध सभेला सादर करण्यांत येतो. हें तिसरें वाचनही केवळ औपचारिक असतें. या नंतर तो मसुदा दुसऱ्या सभेकडे पाठाविण्यांत येतो. तेथे त्याचीं याच रीतींनें तीन वाचनें झाल्यानंतर किंवा मागें उल्लेख केल्याप्रमाणें लॉर्डांच्या नापसंतीला दाद न देतांही या मसुद्यावर राजाची सही झाली म्हणजे त्याला पूर्ण कायद्याचें स्वरूप प्राप्त होतें.

येथपर्यंत प्रतिनिधिसत्ताक जबाबदार राज्यपद्धतींतील ज्या ज्या निरनिराळ्या घटकांनीं स्वतंत्रपणें अगर एकोप्यानें जीं जीं राज्यकारभाराचीं कामें करावयाचीं त्यांचा विचार करून या सर्वांचीं सूत्रें जबाबदार राज्यघटनेंत पार्लमेंटमधील, विशेषतः सामान्य प्रतिनिधिसभेमधील, बहुमत पाठीशीं असणाऱ्या प्रधानमंडळाच्या हातांत एकवटलीं असतात हें आपण पाहिलें. पण देशांत राज्य-

कारभार सुव्यवस्थित रीतीनें चालण्यास कायदा हें जें आवश्यक अंग आहे तो कायदाही फक्त असून भागत नाहीं. त्याची बजावणी करण्याकरितां एक निराळें खातें नेमिलेलें असतें व जबाबदार प्रधानमंडळ तरी बाकीच्या बाबतींत बरेंच प्रबळ-अर्थात् पार्लमेंटचा पाठिंबा असेल तरच--असलें तरी या न्याय खात्यावर त्याचा फारसा अधिकार चालत नाहीं. आणि हें इंग्लंडमधील न्याय खात्याचें स्वातंत्र्य हेंच त्या देशांतलि व्यक्तिस्वातंत्र्याचा व त्या व्यक्तिस्वातंत्र्यावर रचलेल्या राज्यघटनेचा पाया होय असें **डायसीनें** सिद्ध केलें आहे.

हें न्याय खातें स्वतंत्र आहे. याचा अर्थ एवढाच कीं, न्यायकोर्टांच्या न्यायधीशांच्या हयातींत त्यांना काढून टाकणें झाल्यास तें दोन्ही सभांनीं पास केलेल्या ठरावाशिवाय करितां येत नाहीं. प्रधानमंडळाला यांना आपल्याच जबाबदारीवर काढून टाकण्याचा अधिकार नाहीं व कोणताही कायदा एकदां पास झाला म्हणजे त्याचा अर्थ करण्याचें काम यांच्याकडे असतें. न्यायखात्याचें अंमलबजावणीच्या मुख्य अधिकाऱ्यापासून स्वातंत्र्य दुसऱ्या-रीतीनेंही प्रस्थापण्यांत आलें आहे. कोठलाही अधिकारी कितीही मोठा असला तरी तो सामान्य मनुष्याला लागू असणाऱ्या कायद्यांतून मुक्त असूं शकत नाहीं. यामुळें अगदीं बिकटप्रसंगींही प्रधानाला गैरकायदा वर्तन करितां येत नाहीं. वाटेल त्या सामान्य कोर्टांत त्याला आरोपी म्हणून उभें करितां येईल.

अधिकारी किती जरी प्रातिनिधिक तत्त्वाप्रमाणें लोकांना जबाबदार असले तरी अधिकाराच्या भरांत त्यांची कळत म्हणा

किंवा देशाच्या संरक्षणाच्या सदिच्छेनें म्हणा व्यक्तिस्वांतत्र्यावर गदा येणें अगदीं स्वाभाविक असतें. व या व्यक्तिस्वातंत्र्याच्या रक्षणाच्या दृष्टीनें हें न्यायकोर्टांचें स्वातंत्र्य अत्यंत महत्त्वाचें आहे.

पण इंग्लंडमधील या न्यायकोर्टांच्या स्वातंत्र्यापेक्षां अमेरिकेंतील न्यायकोर्टांचें स्वातंत्र्य फारच मोठें आहे. इंग्लंडमध्यें पार्लमेंटमध्यें रीतसर कायदा पास होऊन राजाची संमति मिळाली म्हणजे त्या कायद्याचा फक्त अर्थ करण्याचा तेवढाच अधिकार न्यायकोर्टांचा असतो; तर अमेरिकेंतील 'संयुक्त संस्थानां'च्या कोर्टांना अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांच्या दोनही सभांनीं पास करून अध्यक्षाची संमति मिळालेल्या कायद्याच्याही युक्तायुक्ततेचा विचार करण्याचा अधिकार आहे. हा युक्तायुक्ततेचा विचार जो साऱ्या संस्थानांचा मिळून 'संयुक्त' होण्यासंबंधीं तहनामा ठरला त्याच्या अटींस अनुसरून करावयाचा असतो. इंग्लंडमध्यें न्यायकोर्टें कायदा करणाऱ्या सभेच्या अंकित असतात तर अमेरिकेंत तीं या सभेच्या जोडीचीं असतात. अमेरिकेंतील राज्यघटनेंत हा जो विशेष गुण आहे तो दोन गोष्टींमुळें उत्पन्न झालेला आहे. यांतील पहिली गोष्ट म्हणजे अमेरिकेंतील राज्यघटना एका लेखी तहावर उभारली आहे. ही गोष्ट केवळ 'जबाबदार राज्यपद्धती'चा विचार करितांना जरी अप्रस्तुत असली-कारण अमेरिकेंतील राज्यपद्धति मुळीं जबाबदार राज्यपद्धतिच नव्हे-तरी ती जबाबदार राज्पद्धति हिंदुस्थानसारख्या विस्तृत देशाला अगदीं नव्यानें व वरचेवर जाहीर होणाऱ्या लेखी सनदांच्या अनुरोधानें लागू करावयाची असल्यामुळें या गोष्टीचा येथें विचार करणें जरूर आहे.

---

८ एकावयवी राज्यघटना व संयुक्त राज्यघटना.

हिंदुस्थानच्या विस्ताराच्या योगानें उत्पन्न होणाऱ्या जरूरीमुळें अमेरिकेंतल्याप्रमाणें हिंदुस्थानांतही न्यायकोर्टें इंग्लंड-पेक्षां अधिक महत्त्वाची जागा पटकावतील असें सांगितलें.

याचा उलगडा होण्यासाठीं अमेरिकेंतील व इंग्लंडमधील राज्यघटनांची आणखी एका दृष्टीनें तुलना करणें जरूर आहे. इंग्लंडमधील राज्यघटना जिला वर एकावयवी (Unitary) म्हटलें आहे तशा प्रकारची आहे व अमेरिकेंतील राज्यघटना संयुक्त राज्यघटना म्हणून प्रसिद्ध आहे. एकावयवी राज्यघटनेंत एकच मध्यवर्ती कायदेमंडळ (तें दोन सभांचें असो) प्रधान-मंडळ सर्व भागांवर सर्व प्रकारचा सारखा अधिकार चालवितें; तर संयुक्त घटनेंत कांहीं ठराविक नियमांना अनुसरून कांहीं अधिकार संयुक्त सरकारच्या वांटणीला दिलेले असतात व बाकीचे अधिकार तें राज्य ज्यांचें 'संयुक्त' बनलें असेल त्यांपैकीं प्रत्येक घटक आपापल्यापुरते बजावतो.

अमेरिकेंत ज्यावेळीं वसाहती स्थापन झाल्या त्या वेळीं प्रत्येक वसाहत आपला राज्यकारभार वेगळा चालवीत असे. निरनिराळ्या वसाहतींना ब्रिटिश सरकारकडून निरनिराळ्या सनदा मिळाल्या होत्या व त्या सनदांना अनुसरून त्यांचे इंग्लंडच्या मध्यवर्ती पार्लमेंटशीं संबंध असत. हीं संस्थानें ज्यावेळीं स्वतंत्र झालीं, ज्यावेळीं त्यांनीं इंग्लंडचें वर्चस्व व त्याबरोबरच दुसऱ्या शत्रूं-पासून होणाऱ्या उपसर्गाचे वेळीं मिळणारी मदत झुगारून दिली

त्यावेळीं प्रत्येक वसाहतीला आपापल्या पुरतें निराळें राहून स्वातंत्र्य राखणें अशक्य झालें. यावेळीं ज्या 'काँग्रेस' सभेच्या द्वारां अमेरिकन लोकांनीं स्वातंत्र्ययुद्धाचे वेळीं आपला कारभार चालविला होता त्या काँग्रेसच्या द्वारांच पुढेंही सर्व संस्थानांच्या वतीनें जो कारभार चालवयाचा तो चालावा असें ठरविण्यांत आलें. पण या ठरावाबरहुकूम कांहीं नियमबद्ध घटना नसल्यामुळें संयुक्त सरकारच्या कारभाराची वांटणी नीट रीतीनें होत नसे; संयुक्त सरकारचे हुकूम निरनिराळ्या संस्थानांना मानावयास लावणें कठीण पडत असे व अन्यही बऱ्याच अडचणी येत असत.

या सर्व गोष्टी सुरळीत रीतीनें व्हाव्या म्हणून अमेरिकन संयुक्त संस्थानांची घटना १८८७ सालीं आंखण्यांत आली.

अमेरिकेंतील इंग्लंडशीं लढलेल्या संस्थानांना जरी संरक्षणार्थ एकीची जरूर वाटली तरी तीं संस्थानें आपलें अन्तर्गत स्वातंत्र्य गमावण्यास कबूल नव्हतीं; म्हणजे सर्व संस्थानांच्या प्रजेवर सर्व बाबतींत सत्ता असलेलें एक मध्यवर्ती राज्य स्थापण्याची त्यांची इच्छा नव्हती. असें असल्यामुळें हीं सर्व संस्थानें 'देशांतील अन्तर्गत शांतता राखण्यापुरतीं,' सर्वांच्या संरक्षणाकरितां व कल्याणाकरितां स्वातंत्र्याच्या रक्षणाकरितांच फक्त 'संयुक्त' झालीं. बाकीच्या बाबतींत प्रत्येक संस्था स्वतंत्र आहे व त्यांच्या व्यवस्थेकरितां प्रत्येक संस्थानाच्या निराळ्या राज्यसंस्था आहेत.

या निरनिराळ्या राज्यसंस्था मागें संयुक्त अमेरिकन राज्यसंस्थेची जी माहिती दिली आहे त्याच नमुन्यावर साधारणतः बनविल्या आहेत. म्हणजे प्रत्येक संस्थानांत एक प्रतिनिधि व

एक सेनेट अशांनीं बनलेली द्विदळ कायदासभा व सबंध संस्थानांतील मतदारांनीं निवडलेला ' गव्हर्नर ' म्हणजे संस्थानांतील अंमलबजावणीचा मुख्य अधिकारी अशी घटना आहे.

अर्थात् संयुक्त अमेरिकेचें अशाच तऱ्हेनें बनलेलें सरकार व प्रत्येक संस्थानचेंही तितकेंच प्रातिनिधिक सरकार यांच्या अधिकारांची वांटणी करणें, हें अन्तर्गत व्यवस्था व्यक्तिशः संस्थानांकडे ठेवून सर्वांस सामान्य असें राजकीय कामकाज संयुक्त सरकारनें करावें ' म्हणजे वर सांगितल्याप्रमाणें संस्थानांसंस्थानांतील संबंध, परराष्ट्रीय संबंध वगैरेंवर संयुक्त सरकारनें देखरेख ठेवावी असें सांगणें जरी सोपें असलें तरी संस्थानी स्वातंत्र्य शक्य तितकें करून संभाळावयाचें, संयुक्त सरकार हें अगदीं आपद्धर्म म्हणून बनविलेलें सरकार व त्याच्या अधिकाराची कक्षा वाढूं देणें हें संस्थानी स्वातंत्र्याला विघातक अशा भावनांनीं या अमेरिकन संयुक्त संस्थानांच्या घटनेकडे पाहाणाऱ्या संस्थानी मुत्सद्यांना, स्पष्टतेसाठीं व पुढें होणारे भांडणतंटे टाळण्यासाठीं कोणकोणत्या बाबी फक्त संस्थानसरकारकडे असाव्या, कोणकोणत्या संयुक्त सरकारकडे असाव्या व कोणकोणत्यांबद्दलची एकदमच कायमची व्यवस्था लावून त्यांमध्यें ढवळाढवळ करण्याला व्यक्तिशः एकाही संस्थानाला किंवा संयुक्त सरकारलाही वाव ठेऊं नये, हें ठरविणें जरूर झालें. अशा तऱ्हेनें ठरलेल्या या लेखी करारनाम्यावरच आज अमेरिकन राज्यघटनेची एकंदर उभारणी केलेली आहे. जेथें अस निरनिराळे घटक एकत्र झालेले असतात. तेथें अशा लेखी करारनाम्याची जरूरी स्पष्टच आहे.

पण असा लेखी करारनामा जरी केला तरी त्याच्या अर्थासंबंधानें वाद उपस्थित होणारच. एवढेंच नव्हे तर सांगितल्याप्रमाणें हा करारनामा तयार करणाऱ्यांनीं कांहीं कांहीं गोष्टींत ढवळाढवळ करण्याचा अधिकार कोणाही साधारणपणें अमेरिकेवर राज्य चालविणाऱ्या संस्थेस नसावा असें ठरविलें आहे. पण याही गोष्टीचें अल्पस्वल्प प्रमाणांत उल्लंघन होणें अगदीं स्वाभाविक आहे.

असें जर ठराविक कायदे करण्याच्या अधिकाराच्या रूपरेखेचें उल्लंघन झालें, तर किंवा तसा संशय आला तर त्याचा निवाडा कोणीं करावयाचा ? साधारणपणें यांचें उत्तर संयुक्त संस्थानच्या कॉँग्रेसनें अथवा अध्यक्षानें असें सुचेल. पण ज्या कॉँग्रेसनें किंवा अध्यक्षानें हा निकाल द्यावयाचा तें संयुक्त सरकारच या बाबतींत अपराधी असेल तर गुन्हेगारालाच न्यायाधीश बनविलें असें होईल, आणि एकादा प्रश्न संयुक्त सरकारच्या अधिकारांतला आहे किंवा संस्थानी सरकारच्या अधिकारांतला आहे हाच वाद वरचेवर उपस्थित होणार.

तेव्हां अशा स्थितींत मूळ अमेरिकन राज्यघटनेच्या कराराचा अर्थ करून त्याच्याविरुद्ध संयुक्त सरकारनें केलेला, अगर इतर कोणींही केलेला कायदा, अगर कृत्य आहे किंवा कसें हें ठरविण्याचें काम संयुक्त राज्याधिकाऱ्यांशिवाय इतर कोणावर तरी सोंपविणें जरूर आहे. म्हणून मुख्यतः हें काम करण्याकरितां मूळ राज्यघटना ठरविणाऱ्यांनीं संयुक्त न्यायखातें निर्माण केलें. अर्थात् या खात्याला संयुक्त संस्थानांच्या मुख्य कायदा-

सभेनें केलेल्या कायद्यावर किंवा अध्यक्षानें केलेल्या कृत्यावर न्यायान्यायतेचा शिक्का मारण्याचा अधिकार असल्यामुळें हें खातें त्या सभेपेक्षां व अध्यक्षापेक्षांही एका अर्थी अधिक समर्थ आहे.

तरी पण या खात्याचें सामर्थ्य त्यांच्या अंमलबजावणीच्यासंबंधांतील कमकुवतपणामुळें बरेंच उणें पडतें. या न्यायाधिशांनीं दिलेले न्याय सर्वांनीं मानिले पाहिजे हें खरें, पण त्या निकालाची अंमलबजावणी करणें सर्वस्वी दुसऱ्या स्वतंत्र खात्याच्या मर्जीवर अवलंबून असतें.

असल्या न्यायकोर्टांतले न्यायाधीश हे, अशा रीतीनें मुख्य कायदा सभेच्या बरोबरीचे अधिकारी; व त्यांचें स्वातंत्र्य कायम राहाण्यावरच मूळ घटनेबरहुकूम राज्यव्यवस्था चालणें अवलंबून असल्यामुळें त्यांना शक्य तेवढें स्वतंत्र ठेवण्याची खबरदारी घेण्यांत येते. तरीसुद्धां या न्यायाधीशांच्या नेमणुकी करण्याचें अध्यक्षाच्या हातांत असल्यामुळें अध्यक्षानें आपल्याच मताच्या लोकांना निवडण्याची बरीच भीति असते.

संयुक्त राज्यघटनेचा करारनामा जसा लेखी असला पाहिजे, तशीच त्याची फिरवाफिरव करण्याचा अधिकारही—नेहमींचे त्या घटनेनें आंखून दिलेले,—कायदे करण्याचा अधिकार ज्यांस आहे अशा संस्थांना देतां येणार नाहीं. अशा सामान्य कायदासभांना जरूरीच्या वेळींही कोणतीही घटना सुधारण्याचें काम देतां येत नाहीं. कारण अशा सुधारणा करण्याचें ज्या संस्थेच्या म्हणजे अर्थात् मध्यवर्ती संस्थानांच्या संयुक्त कायदासभेच्या हातांत ठेवावें ती संस्था शिरजोर बनणार व बाकीच्या संस्थांना

अशा संस्थेचीं केवळ बाहुलीं होऊन राहावें लागणार. व हीं स्थिति निरनिराळीं संस्थानें म्हणा, निरानिराळे प्रांत म्हणा, निरनिराळे देशविभाग म्हणा फक्त कांहीं कांहीं बाह्यदेशहिताच्या बाबीसाठीं जेव्हां संयुक्त होऊन अन्तर्गत स्वातंत्र्य ठेवूं इच्छितात अशा प्रसंगीं असह्य होते. याकरितां असें सामर्थ्य, त्या घटनेला अनुसरूनच कायदे करण्याचा साधारण अधिकार असलेल्या, कोणत्याही संस्थेला देतां येत नाहीं.

ही घटना सुधारण्याकरितां कांहीं तरी निराळी व विशेष योजना करण्यांत येत. अमेरिकन संस्थानांत अशी मूळ घटनेंत सुधारणा करावयाची असल्यास खालील गोष्टी कराव्या लागतात. प्रथम अशी सुधारणा अवश्य असल्याबद्दल संयुक्त कायदेमंडळाच्या दोन्ही सभांच्या दोनतृतीयांश सभासदांनीं अगर निरानिराळ्या संस्थांनीं, कायदेमंडळांपैकीं दोन तृतीयांश कायदेमंडळांनीं संयुक्त कॉंग्रेसकडे म्हणजे कायदेमंडळाच्या दोन्ही एकत्र बसलेल्या सभांकडे शिफारस करावी लागते. व ती सूचना कॉंग्रेस सभेला पसंत पडली म्हणजे ती संस्थानांच्या तीनचतुर्थांश कायदेमंडळांनीं अगर तीनचतुर्थांश संस्थानांच्या कन्व्हेशननें मान्य करावी लागते.

इतक्या घोटाळ्याची ही योजना शक्य तेवढी कमी उपयोगांत आणण्यांत येते व ती वरचेवर उपयोगांत आणण्यांत येऊं नये म्हणूनच ती अशी घोटाळ्याची करण्यांत आली आहे. त्यामुळें कालमानाप्रमाणें जरूर त्या सुधारणांचा घटनेंत अन्तर्भाव होऊं शकत नाहीं ही एक या पद्धतींत उणीव आहे.

पण या गोष्टी कोठल्याही संयुक्त घटनेंत अपरिहार्य आहेत. न्यायकोर्टांना अधिक सामर्थ्य हें द्यावें लागणारच व घटनेंतच करावयाच्या सुधारणांचे बाबतींत हा त्रासही सोसावा लागणारच. पण हें सर्व सुरळीत चालावयाला म्हणजे संयुक्त राज्यघटना यशस्वी व्हावयाला सर्वांत अत्यंत जरूरीची गोष्ट म्हणजे लोकांचे मनांत कायदा व न्यायकोर्टें यासंबंधीं दृढ विश्वास असला पाहिजे.

९ हिंदुस्थान.

मॉँटेग्यू चेम्सफर्ड रिपोर्टांत हिंदुस्थानाच्या भविष्य कालासंबंधीं म्हटलें आहे कीं, हिंदुस्थानच्या राजकीय विकासाचें पर्यवसान स्थानिक अगर प्रांतिक प्रश्नांबद्दल पूर्ण स्वातंत्र्य भोगणाऱ्या व कांहीं ठिकाणीं हल्लीं आंखल्याप्रमाणें व कांहीं ठिकाणीं लोकांच्या आर्थिक व स्वाभाविक हितास अनुसरून नवीन बनल्या गेलेल्या प्रांतांत होईल. या सर्व प्रांतांच्या लोकांचें अधिकाधिक प्रातिनिधिक व त्यांना अधिकाधिक जबाबदार असें एक मध्यवर्ती सरकार या निरनिराळ्या संस्थानांच्या शिरोभागीं असेल; हें मध्यवर्ती सरकार संबंध हिंदुस्थानच्या हितसंबंधांच्या अन्तर्गत व परराष्ट्रीय प्रश्नांवर देखरेख ठेवील; संस्थानांच्या बाबतींत न्याय देईल व स्वराज्य भोगणाऱ्या ब्रिटिश साम्राज्यांतील इतर घटकांशीं समतेच्या नात्यानें हिंदुस्थानच्या हितसंबंधांचा पुरस्कार करील.

अशा रीतीनें हिंदुस्थानची राजकीय वाढ निदान या बाबतींत तरी अमेरिकन संयुक्त संस्थानांच्या नमुन्याबरहुकूम होणार हें उघड आहे. या दृष्टीनें अमेरिकन संयुक्त राज्यघटनेच्या विचाराचें महत्त्व तावडतोब लक्षांत येईल.

पण येथें दुसरीही एक गोष्ट विसरतां कामा नये; ती ही कीं, अमेरिकन संयुक्तराज्यसंस्थेंत किंवा संस्थानांच्या राज्यसंस्थांतूनही जबाबदार राज्यपद्धति चालू नाहीं. ज्या अर्थानें

इंग्लंडमधील प्रधानमंडळ कायदे मंडळाला, त्या द्वारा मतदार-संघाला कोणच्याही क्षणीं जबाबदार म्हणजे केव्हांही कायदा सभेंतील कोणत्याही सभासदाला, अर्थात् मतदारांच्या हितासाठीं, कोणत्याही कृत्याबद्दल जाब विचारतां येतो अगर त्यांना काढून टाकण्यांसंबंधींही खटपट करायला येते तसें अमेरिकन पद्धती प्रमाणें येत नाहीं. हिंदुस्थानांत ही जबाबदार पद्धातिच अल्प प्रमाणांत सुरू होणार आहे. हिंदुस्थानांत अमलांत येणाऱ्या नवीन सुधारणांप्रमाणें अबकारी, शिक्षण, आरोग्य शेतकी, अशासारखे कांहीं विषय ज्यांच्या हवालीं केले आहेत असे सामान्यतः प्रत्येक प्रांतांत प्रांतिक कौन्सिलला जबाबदार असे प्रधान नेमण्यांत येणार आहेत. या रीतींनें त्यांना जबाबदार राज्यपद्धतीचा ओनामा कळला म्हणजे इतर विषयही त्यांचे स्वाधीन हळूहळू करण्यांत यावेत व प्रत्येक प्रांताचें अंतर्गत बाबींपुरतें जबाबदार पद्धतीनें शासित असें स्वतंत्र संस्थान बनावें अशी योजना आहे.

शांतता, सुव्यवस्था व सुराज्य यांबद्दलच्या त्यांचेवर असले त्या जबाबदारीच्या दृष्टीनें जें जें करणें हिंदुस्थान सरकारला योग्य वाटेल, त्या त्या गोष्टी करण्याची हिंदुस्थानसरकारला पूर्ण मुभा असावी; या गोष्टींबद्दल जाब विचारण्याचा अधिकार फक्त पार्लमेंटला आहे. अशी ही योजना प्रांतांमध्यें जबाबदार शासनपद्धतीची वाढ होईपर्यंत करण्यांत आली आहे. जोंपर्यंत पूर्ण जबाबदार पद्धति हिंदुस्थानांत अमलांत आली नाहीं तोंपर्यंत हिंदुस्थान सरकार हेंच हिंदुस्थानांत शांतता वगैरे राखण्यापुरतें

ब्रिटिश पार्लमेंटला जबाबदार असल्यामुळें अशा शांतता, सुव्यवस्था वगैरे राखण्याकरितां जरूर गोष्टी कोणत्या हें ठरविण्याचा अधिकार त्यांचेकडेच ठेवण्यांत आलेला आहे. याचा अर्थ असा कीं, जबाबदार पद्धतीचा पूर्ण विकास झाल्यानंतर हिंदुस्थान सरकार लोकप्रातिनिधींनांच पूर्णपणें जबाबदार राहील. व जरूर बाबी कोणत्या हेंही कायम ठरविण्यांत येईल. व हल्लींही जरी प्रांतिक सरकार पूर्णपणें लोकमतास जबाबदार नसलें तरी 'प्रांतिक सरकारें हीं आपापल्या अधिकारांतले कायदे करण्यापुरतीं स्वतंत्र' असलीं पाहिजेत या योजनेच्या सीमा स्पष्टपणें आंखण्यांत येतील.

असो, अशा रीतीनें अंतर्गत बाबींत स्वतंत्र अशा जबाबदार राज्यसंस्थांनीं शासित संस्थानांचें सामान्य संरक्षण व कल्याण या दृष्टीनें जें करणें योग्य ठरेल तेवढें करण्यापुरतें संयुक्त हिंदुस्थान सरकार अशी हिंदुस्थानसंबंधीं भावी योजना आहे.

अमेरिकेंतील संयुक्त संस्थानांतील प्रत्येक संस्थानांत संयुक्त राज्यसंस्थेच्या नमुन्याच्याच संस्था आहेत असें वर सांगितलेंच. तशाच हिंदुस्थान सरकारच्या नमुन्याबरहुकूम प्रत्येक स्वतंत्र प्रांतांतही हिंदुस्थान पूर्ण स्वतंत्र होईल त्यावेळीं राज्यसंस्था स्थापल्या जाण्याचा संभव आहे. म्हणजे जसें इंग्लंडमध्यें आज कायदे करण्याचे व कर बसविण्याचे अधिकार एक प्रतिनिधींची सभा, एक उमरावांची सभा, व राजा यांनीं बनलेल्या पार्लमेंटमध्यें एकवटले आहेत तसे येथेंही ते अधिकार फक्त साऱ्या हिंदुस्थानाला साधारण बाबींपुरतें, एक प्रतिनिधि सभा, लेजिस्लेटिव्ह

असेंब्ली, एक उमराव सभेच्या ऐवजीं बसणारी दुसरी सभा कौन्सिल ऑफ् स्टेट, व गव्हर्नर जनरल किंवा व्हाइसरॉय यांच्या हातीं राहातील व या बरहुकूमच प्रांतिक बाबींपुरते अधिकार असलेल्या निरनिराळ्या तीनदळी संस्था अस्तित्त्वांत येतील.

अशा संस्था निरनिराळ्या प्रांतांत आज नाहींत. तरी या बाबतींतही हें ध्येय पुढें ठेवण्यांत आलें आहे. नवीन प्रांतिक सरकारें फक्त प्रतिनिधि सभा व गव्हर्नर व त्याच्या हाताखालीं काम करणारे अधिकारी—प्रधान किंवा कौन्सिलर—यांचींच बनावयाचीं आहेत. तरी या तऱ्हेच्या दुसऱ्या सभांची जरूरी पुढें जसजशीं प्रांतिक सरकारें अधिक वाढत्या प्रमाणानें पार्लमेंटच्या पद्धतीनें चालविलीं जातील तसतशी या संशोधन करणाऱ्या सभांची जरूरी भासूं लागेल व या प्रश्नांचा विचार प्रत्येक दहा वर्षांनीं जें कमिशन बसणार आहे, त्यानें करावा अशी शिफारस मॉंटेग्युचेम्सफर्ड रिपोर्टांत केलेली आहे.

तेव्हां लवकरच प्रत्येक प्रांतांत ही दोन सभांची घटना अमलांत येईल असें म्हणण्यास हरकत नाहीं.

अशा तऱ्हेची घटना ही अर्थातच लेखी असावयाला पाहिजे, व ती लेखी असण्याबरोबरच लेखी घटनेचे गुणदोषही हिंदुस्थानांत दृग्गोचर होतील, पण अशी घटना हिंदुस्थानासारख्या विस्तृत देशांत जरूरच आहे. व या दृष्टीनें हिंदुस्थानांतील लोकांनीं कायदा व न्यायकोर्टें यांसंबंधीं आदर बाळगण्यास व वाढविण्यास

शिकलें पाहिजे; कारण ही अशा पद्धतीला अगदीं अवश्य अशी गोष्ट आहे.

पण हिंदुस्थानांत अमलांत येणाऱ्या जबाबदार पद्धतीच्या योगानें आणखी एका गोष्टीची विशेष जरूरी आहे. ती म्हणजे हिंदुस्थानांतील पक्षांचा अनेक शक्य तितका दोन मुख्य पक्षांत अन्तर्भाव होणें. जरी देशांत तीन अगर चार पक्ष असले तरी त्यांतील दोनच पक्ष बरेच प्रबळ असल्याकारणानें व असतील तेव्हांच ही पद्धति इंग्लंडमध्यें अत्यंत यशास्वितेनें चालविली जाते, तर फ्रान्समध्यें पक्षभेदांना सुमारच नसल्यामुळें या पद्धतीचा कसा बोजवारा होतो हें आपण पाहिलेंच. या करितां हिंदुस्थानांतील राजकीय व सामाजिक मतमतांतरांच्या लोकांनीं सार्वजनिक कार्याकरितां स्वार्थत्याग करण्यास शिकणें अत्यंत अवश्यक आहे.

अशा रीतीनें पक्षांची घटना राजकीय संस्थांतर्गत व्यवहाराच्या दृष्टीनें चोख झाली म्हणजे ती तितक्याच प्रमाणांत लोकमतनिदर्शक होईल. अनेक पक्षांमुळें किंवा पक्षच नसल्यामुळें होणारा लोकमताचा विपर्यास व त्यासारखे इतर दोष टळतील.

या पक्षभेदांस अनुसरून प्रत्येक विभागांत उमेदवार उभे राहिले म्हणजे मतदार आपल्या आवडीनिवडीप्रमाणें त्यांना निवडून देतील. हिंदुस्थानांत प्रांतिक निवडणुकीपुरता साधारणतः जिल्हा हा विभाग धरलेला आहे. मुंबई, पुणें, सुरत, अहमदाबाद, नागपूर अशा मोठ्या शहरांचेही निरनिराळे विभाग कल्पिले आहेत. प्रत्येक विभागांत साधारणपणें दहा हजार मतदारांना एक प्रतिनिधि अशी वांटणी केली आहे. जितके प्रतिनिधि एकाद्या विभागातर्फे निवडून

द्यावयाचे असतील तितकीं मतें प्रत्येक मतदाराला असावयाचीं आहेत, व मतें देण्याची पद्धति बॅलटची म्हणजे 'गुप्त मतदान पद्धति' आहे. मतदाराला त्याच्या मताची वाटेल तशी वांटणी करण्याची मुभा आहे. मतदारीचा हक्क मागें सांगितल्याप्रमाणें मुंबई इलाख्याचे बाबतींत रत्नागिरी व पंचमहाल जिल्ह्यांत १६ रुपये व इतर प्रांतांत ३२ रुपये साऱ्याची ज्याची जमीन असेल, अगर मुंबई शहरांत वर्षास १२० रुपये, कराचीस ६० रुपये, किंवा जेथें घरपट्टी घरभाड्याच्या प्रमाणानें बसविली जात असेल अशा म्युनिसिपालिटी कँटोन्मेंट अगर नोटिफाइड एरिया मध्यें ३६ रुपये (पंचमहाल रत्नागिरी जिल्ह्यांत २४ रुपये) वार्षिक भाड्याच्या घरांत जो राहात असेल अगर असें घर ज्याच्या मालकीचें असेल, जेथें कर घराच्या किंमतीवर अवलंबून असेल तेथें ज्याची किंमत १५०० रुपये (रत्नागिरी व पंचमहालांत १००० रुपये) असेल, तेथें घरपट्टी लादली जात नसेल तेथें अशा घराचा उपभोग घेणारा ३ रुपये वार्षिक जकात देत असेल तर, प्राप्तीवरील कर देत असेल तर, पेन्शन घेतलेला सैन्यांतील अधिकारी असेल अशांस आहे. हें साधारण मतदारसंघासंबंधानें झालें; याशिवाय युनिव्हर्सिटीच्या ज्यांना डिग्री घेऊन सात वर्षें झालीं आहेत अशा ग्रॅजुएटांचा प्रतिनिधी निवडून देणारा, मुंबई शहारातर्फे एक व बाकीच्या इलाख्यातर्फे एक असे प्रतिनिधि निवडून देणारे दोन युरोपीयन मतदारसंघ; १८६७ च्या मुंबई सरकारच्या ठरावाप्रमाणें सरदारांच्या यादींत असलेले

दक्षिणेंतील सरदारांचा, १९०९ च्या मुंबई सरकारच्या ठरावाप्रमाणें गुजराथेंतील सरदारांच्या यादींत नांव असलेल्यांचा, व सिंधमधील पहिल्या वर्गाचे व दुसऱ्या वर्गाचे जहागिरदार व मतदारांच्या याद्या प्रसिद्ध होण्यापूर्वी तीन वर्षें तरी १००० रुपये सारा देत असलेले, सिंधमधील जमीनदार यांनीं बनलेला असे प्रत्येकीं एकेक प्रतिनिधी निवडून देणारे तीन मतदारसंघ; दोन प्रतिनिधी निवडून देणारें मुंबई चेंबर ऑफ् कॉमर्स, १ प्रतिनिधी निवडून देणारें कराची चेंबर ऑफ् कॉमर्स, एक प्रतिनिधीचा अधिकार असलेली मुंबईची ट्रेडस् असोसिएशन, मुंबई व अहमदाबाद येतील प्रत्येकीं एक प्रतिनिधि निवडून देणाऱ्या सभा, हिंदी चेंबर ऑफ् कॉमर्स-एक प्रतिनिधि व कापसाचाच व्यापार करणारांचा एक प्रतिनिधि निवडून देणारा संघ, असे विशेष संघ केलेले आहेत. साधारण संघांत मतदानाचा हक्क असूनही, युरोपीयन संघ वगळून बाकीच्या विशेष संघांत एकादा मनुष्य येत असेल तर त्याला तेथेंही मत देण्याचा अधिकार आहे.

याशिवाय स्त्रिया, एकवीस वर्षांखालील मनुष्य, संस्थानी प्रजा व कोर्टानें वेडे ठरविलेले लोक यांना मतदारीचा हक्क नाहीं असें ठरविण्यांत आलें आहे.

प्रतिनिधित्वाच्या उमेदवारीची लायकी उमेदवार ज्या संघातर्फे व साधारण संघातर्फे असेल तर ज्या भागातर्फे निवडणुकीस उभा असेल त्या संघांत अगर भागांत त्याचें नांव मतदार म्हणून दाखल झालें असलें पाहिजे; सरकारी नोकर नसला पाहिजे; पंचवीस

वर्षे वयाचा असला पाहिजे, दिवाळखोर नसला पाहिजे, कांहीं गुन्ह्याबद्दल सरकारी नोकरींतून कमी झाला नसावा किंवा फौजदारी खटल्यांत शिक्षा झालेला नसावा, किंवा एकाद्या कोर्टानें त्याची वकिलीची सनद रद्द केलेला वकील नसावा.

सबंध हिंदुस्थानची त्यांतल्या त्यांत अधिक प्रातिनिधिक सभा जी लेजिस्लेटिव्ह असेंब्ली तिच्यांत १०२ सभासद निवडले जाणार आहेत. त्यांपैकीं मुंबई इलाख्याच्या वांटणीला १६ सभासद आलेले आहेत; याकरितां दक्षिणभाग, मध्यभाग, उत्तर भाग म्हणजे साधारणतः कर्नाटक, महाराष्ट्र, गुजराथ व सिंध, असे चार विभाग केलेले आहेत. हें साधारण संघासंबंधानें झालें; याशिवाय युरोपियन व्यापारी संघ वगैरे विशेष संघ आहेत ते निराळेच.

कौन्सिल ऑफ् स्टेटच्या–सबंध हिंदुस्थानच्या दुसऱ्या सभेंतील एकंदर ६० सभासदांपैकीं ३३ सभासद निवडले जावयाचे आहेत. त्यांपैकीं मुंबई इलाख्याच्या वांटणीला ४ जागा आल्या आहेत.

या बाबतींत लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट अशी कीं, हिंदुस्थान सरकारला मदत करणाऱ्या दोन्ही सभांचे सभासद निवडण्याचा अधिकार कौन्सिलचे सभासद निवडण्याचा अधिकार ज्यांस आहे त्यांहून अधिक दर्जाच्या लोकांच्या ताब्यांत ठेवण्यांत आलेला आहे.

लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या साधारण मतदारसंघांत नांव दाखल होण्यास उत्तम सिंध प्रांतांत मनुष्य ३७ रु. ८ आणे साऱ्याची जमीन करणारा लागतो व इतर प्रांतांतून ७५ रुपये सारा भरणारा लागतो. ग्रामीवरील कर भरणारांसही हा अधिकार असतो.

कौन्सिल ऑफ् स्टेटचा मतदार असावयाला मनुष्य दोन हजार रुपये सान्याच्या जमिनीचा मालक ३०००० रुपयांवरची प्राप्तीवरील कर देणारा, पूर्वीच्या एकाद्या कौन्सिलचा सभासद, युनिव्हर्सिटीचा फेलो, म्युनिसिपालिटीचा प्रसिडेंट अगर व्हाइस प्रेसिडेंट किंवा या प्रकारचाच कांहीं विशेष दर्जाचा मनुंष्य असावा लागतो.

समाप्त.

श्री सयाजी साहित्यमाला.

छापलेलीं पुस्तकें.	किंमत.
१ विज्ञानगुच्छः—	
२ भूपृष्ठविचार. (सचित्र)	०-१०-०
११ देहधर्म विद्यानां तत्त्वो.	१-०-०
१२ विज्ञानप्रवेशिका.	०-११-०
१३ जिंदगीनो विमो.	०-११-०
१७ उद्भिज्जविद्यानुं रेखादर्शन. (सचित्र)	१-०-०
१८ करोळिया. (सचित्र)	०-१३-०
२२ प्राणीविद्यानुं रेखादर्शन. (सचित्र)	१-०-०
२५ मनुष्यविद्यानां तत्त्वो.	१-०-०
३५ जीव-विद्या. (सचित्र)	१-०-०
३८ तुलनात्मक भाषाशास्त्र.	१-४-०
४६ राजनीतिनो संक्षिप्त इतिहास.	१-४-०
४७ समाजशास्त्रप्रवेशिका.	०-१४-०
४८ बाळउछेर.	१-८-०
५० बाळस्वभाव अने बाळउछेर.	१-८-०
५१ शरीरयंत्रनुं रेखादर्शन. (सचित्र)	१-४-०
७० रसायनप्रवेशिका. (सचित्र)	१-४-०
७५ वडोदरानुं अर्थशास्त्र.	०-१२-०
२ चरित्रगुच्छः—	
८ प्रेमानंद. (सचित्र)	१-०-०
१४ दयाराम.	०-११-०

२० मिरांबाई.	०–११–०
३० गिरधर.	०–१४–०
३३ भालण. (सचित्र)	१– ० –०
४१ महाराणा शिवाजी. (सचित्र)	१– ६ –०
४५ विष्णुदास.	१– ० –०
४८ वीर शिवाजी. (सचित्र)	१– ० –०
५३ मणिशंकर.	१– ६ –०
६२ दलपतराम.	१– २ –०

३ इतिहासगुच्छः—

१ संस्कृत वाङ्मयाचा इतिहास.	२– ८ –०
९ जगतनो वार्तारूप इतिहास ग्रंथ १ लो.	३– ८ –०
१९ ब्रिटिश राष्ट्रीय संस्थाओ.	०–१३–०
२४ पॅलेस्टाइननी संस्कृति.	०–१२–०
२६ जगतनो वार्तारूप इतिहास ग्रंथ २ जो.	३– ० –०
३१ पार्लामेंट. (गुजराती)	१– ४ –०
३४ इतिहासनुं प्रभात.	१– ४ –०
४३ नवीन जापाननी उत्क्रांति.	१– ४ –०
५५ चीननी संस्कृति.	१– ६ –०
६५ हिंदुस्थानचा अर्वाचीन इतिहास; मराठी रियासत (मध्यविभाग)	२–१२–०

४ वार्तागुच्छः—

३ आपणा लघुबंधु अंग्रेज.	१– ० –०
४ अलकानो अद्भुत प्रवास. (सचित्र)	१– ६ –०
१६ वीर पुरुषो	०–१२–०

श्री सयाजी बालज्ञानमाला.

छापलेलीं पुस्तकें.

१ गिरनारनुं गौरव. (सचित्र)	०–६–०
२ ऋतुना रंग. (त्रीण आवृत्ति)	०–६–०
३ शरीरनो संचो. (सचित्र)	०–६–०
४ महाराणा प्रताप. (सचित्र)	०–६–०
५ कोषनी कथा. (सचित्र)	०–६–०
६ पाटण–सिद्धपुरनो प्रवास.	०–६–०
७ पावागढ.	०–६–०
८ औरंगझेब. (सचित्र)	०–६–०
९ मधपुडो. (सचित्र)	०–६–०
१० रणजीतसिंह. (सचित्र)	०–६–०
११ सुखी शरीर.	०–५–०
१२ श्रीहर्ष.	०–६–०
१३ सूर्यकिरण. (सचित्र)	०–६–०
१४ वातावरण.	०–६–०
१५ ग्रहण. (सचित्र)	०–६–०
१६ बाल नेपोलीअन.	०–६–०